पुणे, मंगळवार, २९ एप्रिल २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 151 • वर्ष ४ थे, अंक १५१ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर उडाण कॅफे सुरू P३



१२ टीम इंडियाची तिरंगी मालिकेत दणक्यात सुरुवात

# सिंहगड रस्त्यावर अभूतपूर्व वाहतूक कोंडी

## आठवड्याच्या पहिल्याच दिवशी पुणेकरांना मनस्ताप; धायरी पर्यंत वाहनांच्या रांगा



**पुणे :** सिंहगड रस्त्यावर अभूतपूर्व वाहतूककोंडी झाली असून पुणेकरांना आठवड्याच्या पहिल्याच दिवशी मनस्तापाला सामोरे जावे लागले. पुणेकर या वाहतूक कोंडीत चार तास अडकून पडले. वाहनांच्या रांगा दूर-दूर पर्यंत लागल्या होत्या. कोथरूड कर्वेनगर कडे जाणारा राजाराम पुलाचा एक भाग देखभाल दुरुस्तीसाठी बंद केल्याने सिंहगड रस्त्यावर वाहतुकीचा बोजवारा उडाला. कालव्यालगतचा पर्यायी रस्ता आणि मुख्य सिंहगड रस्ता या सर्व भागात वाहतूक कोंडी होती. सकाळी साडेआठ पासून ते अकरा वाजेपर्यंत वाहतूक कोंडी होती. कालव्या रस्त्याला मोठ्या प्रमाणात गाड्या अडकल्या होत्या. यात रुग्णवाहिका देखील अडकल्या होत्या. राजाराम पुल येथे बंद केल्यामुळे थेट धायरी पर्यंत वाहनांच्या रांगा होत्या. वाहतूक कोंडीचा विचार लक्षात घेता सध्या पूर्ण झालेला विठ्ठलवाडी ते फन टाईम थिएटर दरम्यानचा उड्डाणपूल सकाळच्या वेळी विठ्ठलवाडीकडे जाणाऱ्या बाजूसाठी सुरू करावा; तर सायंकाळी विठ्ठलवाडीकडून वडगावकडे जाणाऱ्या बाजूसाठी सुरू करण्यात यावा, एकाच पुलाचा वापर वेगवेगळ्या वेळात वेगवेगळ्या वाहतुकीसाठी करण्यात यावा, अशी मागणी येथील स्थानिक रहिवासी बापू निंबाळकर यांनी केली आहे.

### उड्डाणपूलाला मूहूर्त कधी?

● सिंहगड रस्ता हा शहरातील अत्यंत महत्त्वाचा रस्ता समजला जातो; गेल्या काही वर्षांच्या कालावधीत या भागात मोठ्या प्रमाणावर नागरीकरण वाढले आहे. मात्र; हे वास्तव असतानाच या भागात अद्यापही पुरेशा सुविधा देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे याठिकाणी सातत्याने वाहतूक कोंडी होत आहे, ही वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी फन टाईम ते हिंगणे असा उड्डाणपूल उभारण्यात आला असून त्याची एक लेन पूर्ण तयार आहे. परंतु हा पूलच उदघाटनाच्या प्रतिक्षेत असल्याने आजच्या या वाहतूक कोंडीत आणखीनच भर पडली.

"राजाराम पूल येथे देखभाल दुरुस्तीचे काम सुरू आहे. हे काम किमान एक महिना सुरू राहील. आत्ता कोथरूड कर्वेनगर कडे जाणाऱ्या भागाचे काम सुरू आहे. त्यानंतर पुढील महिना कर्वेनगर कडून सिंहगड रस्ता परिसरात येणाऱ्या भागाचे काम करण्यात येईल."
**— राजकुमार बरडे,** सहाय्यक पोलीस निरीक्षक, सिंहगड रोड वाहतूक विभाग

# महाराष्ट्र देशाचे नेतृत्व करेल

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विश्वास

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांचा विकासाची कामे सुरू आहे. त्यामध्ये रस्ते, रेल्वे, बुलेट ट्रेन, जलमार्ग आदींसह बंदर आणि विमानतळ विकासाच्या कामांचा समावेश आहे. या संपूर्ण विकासाच्या इकोसिस्टीममुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत असल्याने महाराष्ट्र विकासाच्या बाबतीत देशाचे नेतृत्व करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

हॉटेल फोर सीजन येथे इंडिया मिडल ईस्ट युरोप इकॉनॉमिक कॉरिडर समिट २०२५ चे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेनचे काम गतीने सुरू आहे. या ट्रेनने २०२८ पर्यंत प्रवास करणे शक्य होणार आहे. वाढवण बंदराजवळ बुलेट ट्रेनचे स्थानक निर्माण करण्यात येणार आहे. मुंबई शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर पायाभूत सोयी सुविधांच्या विकासाची कामे सुरू आहेत.

सागरी किनारा रस्ता, अटल सेतू, विविध मेट्रो मार्गांचे कामे ही त्यातली ठळक उदाहरणे आहेत. या सर्व विकास कामांमुळे मुंबईत गुंतवणूक ५० बिलियन डॉलर पर्यंत जाणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे प्रकल्प गेम चेंजर ठरणारे आहेत. यासोबतच पुणे नवीन विमानतळ, शिर्डी, नागपूर विमानतळाच विकास, नदी जोड प्रकल्प, बुलेट ट्रेन प्रकल्प महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत.

सागरी किनारा रस्ता विरारपर्यंत वाढविण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले, वाढवण बंदर हे सध्या अस्तित्वात असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्टपेक्षा तीन पट मोठे आहे. या बंदराला प्रवेश नियंत्रित असलेल्या महामार्गाने नाशिकपर्यंत जोडण्यात येऊन पुढे समृद्धी महामार्गाला जोडण्यात येईल.वाढवण बंदराजवळ नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ निर्माण करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच या परिसरात चौथ्या मुंबईचेही निर्माण करण्यात येणार आहे. कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात पुरामुळे » पान ७ वर

### ईव्हीमध्ये देशाची राजधानी

● मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेद्वारे ३००० रोहित्र सौर ऊर्जेवर आणण्यात आले आहे. सार्वजनिक वाहतूक आणि परिवहन सेवेमध्ये अमलाग्र बदल करण्यात येत आहे. इलेक्ट्रिक वाहनांची मोठी मागणी राज्यात आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतही इलेक्ट्रिक वाहनांचा समावेश करण्यात येत आहे. इलेक्ट्रिक वाहनांमध्ये महाराष्ट्र हे देशाची राजधानी आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.



## स्पेन, फ्रान्स, पोर्तुगालमध्ये वीजपुरवठा खंडित

**नवी दिल्ली :** सोमवारी स्पेन, फ्रान्स आणि पोर्तुगालमध्ये त्यांच्या राजधान्यांसह मोठ्या प्रमाणात वीजपुरवठा खंडित झाल्याची नोंद झाली. स्पॅनिश जनरेटर रेडइलेक्ट्रिकाने सांगितले की इबेरियन द्वीपकल्प प्रभावित झाला आहे आणि या घटनेचे मूल्यांकन केले जात आहे आणि त्यावर कारवाई केली जात आहे. या देशांची एकत्रित लोकसंख्या ५ कोटींहून अधिक आहे. किती लोक प्रभावित झाले आहेत हे लगेच स्पष्ट झालेले नाही. तथापि, वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे महत्त्वाच्या पायाभूत सुविधा विस्कळीत झाल्याचे स्थानिक माध्यमांनी वृत्त दिले आहे. प्रभावित झालेल्या प्रमुख शहरांमध्ये माद्रिद, बार्सिलोना, लिस्बन, सेव्हिल आणि पोर्टो सारखी औद्योगिक केंद्रे होती.

# राज्यात 'हाय अलर्ट'!

## सार्वजनिक ठिकाणांची सुरक्षा वाढविली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**मुंबई :** काश्मीर खोऱ्यातील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण देशात हाय अलर्ट असून ठिकठिकाणी सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. राज्यातील सार्वजनिक ठिकाणांवरील सुरक्षा व्यवस्थाही अधिक कडक करण्यात आली आहे. लोकमान्य टिळक टर्मिनसवर गावी जाणाऱ्या प्रवाशांची तोबा गर्दी झाली आहे, त्या अनुशंगाने सुरक्षा वाढवण्यात आली असून, विषेश व्यवस्था करण्यात आली आहे.

गेल्या आठवड्यात मंगळवारी दि. २२ एप्रिल रोजी दुपारी जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे फिरायला गेलेल्या पर्यटकांवर काही दहशतवाद्यांनी गोळीबार करत क्रूर हल्ला केला. या हल्ल्यात २६ पर्यटकांनी जाव गमावला तर अनेक जखमी झाले. दहशतावाद्यांच्या या नृशंस कृतीमुळे संपूर्ण देशात संतापाचे वातावरण असून जगभरातूनही या हल्ल्याचा निषेध होतोय. हल्ल्यानंतर भारताने कडक पावल उचलत कठोर भूमिका घेतली.

भारतात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना त्यांच्या देशात पाठवण्याची प्रक्रियाही सुरू झाली असून, पाकिस्तानातील भारतीयांना १ मे पर्यंत मायदेशी » पान ७ वर

# भारताचं पहिलं स्वदेशी एआय

## 'सर्वम' स्टार्टअपची सरकारने केली निवड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बंगळुरू :** भारत सरकारने देशातील पहिले स्वदेशी एआय लार्ज लँग्वेज मॉडेल (एलएलएम) मॉडेल विकसित करण्यासाठी बंगळुरू स्थित स्टर्टअप आधारित 'सर्वम'ची निवड केली आहे. चीनच्या डीपसीकची वाढती लोकप्रियता पाहता भारताने हे पाऊल उचलले आहे.

देशातील पहिले स्वदेशी एआय तयार करण्यासाठी आलेल्या ६७ अर्जांमधून केंद्र सरकारने 'सर्वम' ची निवड केली आहे. स्वदेशी एआयचे मॉडेल बनवण्यासाठी सरकारकडून 'सर्वम'ला संगणकीय संसाधनांच्या स्वरूपात मदत मिळणार आहे.

'सर्वम' ही भारताच्या महत्त्वकांक्षी १० हजार ३७० कोटी रुपयांच्या 'इंडिया एआय' मिशन अंतर्गत अधिकृतपणे मान्यता मिळालेली पहिली स्टार्टअप कंपनी आहे. सरकार सध्या इतर अन्य शेकडो प्रस्तावांचे देखील मूल्यांकन करत आहे. यावर 'सर्वम'ने » पान ७ वर

### पहिल्या स्वदेशी एआयची वैशिष्ट्ये

● भारताचे पहिले स्वदेशी एआय मॉडेल ७० अब्ज पॅरामीटर्ससह तयार केले जाईल. आयटी मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, या मॉडेलमध्ये प्रोग्रामिंग आणि अभियांत्रिकी क्षेत्रासंबंधी अनेक नवोपक्रम असतील. ज्यामुळे ते जगातील सर्वोत्तम मॉडेल्सना टक्कर देऊ शकेल. हे मॉडेल विशेषतः भारतीय भाषांसाठी सुधारित केले जाईल आणि ते ओपन-सोर्स केले जाणार नाही, असेही अश्विनी वैष्णव यांनी म्हटले आहे.



## भारतविरोधी १६ यूट्यूब चॅनेलवर बंदी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताकडून पाकिस्तान विरूद्ध विविध स्तरांवर कारवाई सुरू आहेत. अशातच आता भारत सरकारच्या गृह मंत्रालयाकडून १६ पाकिस्तानी युट्युब चॅनेल्सवर बंदी घालण्यात आली आहे. यात पाकिस्तानचा क्रिकेटपटू शोएब अख्तर,आरजू काजमी आणि सय्यद मजम्मिल शाह यांच्या चॅनेल्सचाही समावेश आहे. या सर्व चॅनेल्सचे एकत्रितपणे ६३ दशलक्षांहून अधिक सबस्क्रायबर्स् आहेत.

२२ एप्रिल रोजी पहलगाममधील बैसरन पठारावर » पान ७ वर

# भारताशी युद्ध करू नका

## माजी पंतप्रधान नवाज शरीफ यांचा सल्ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**कराची :** पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तान भारतासोबत युद्धाची तयारी करत आहे. अरब देश, चीन आणि ब्रिटनकडे पाकिस्तान अब्जावधी रुपयांची मागणी करत आहे. अशातच पाकिस्तानने तुर्कीकडून अद्ययावत शस्त्रास्त्रे मिळविण्यात यश मिळविले आहे. या देशांनी जर पाकिस्तानला पैसा दिला, तर तो देखील पाकिस्तान शस्त्रास्त्रे खरेदी करण्यासाठीच वापरणार आहे. पाकिस्तानी नेते भारतासोबत युद्धाची भाषा करत आहेत. परंतू, माजी पंतप्रधान नवाझ शरीफ यांनी पंतप्रधान असलेला भाऊ शाहबाज शरीफ यांना भारतासोबत युद्ध न झालेलेच बरे, असा सल्ला दिला आहे.

भारताविरोधात युद्धाच्या दिशेने पाऊले टाकू नका, त्या ऐवजी कुटनितीने तनाव कमी करण्यावर भर द्यावा, असा सल्ला नवाझ शरीफ यांनी दिला आहे. पाकिस्तानी नेते एकीकडे भारतासोबत युद्ध करण्याची, मंत्री अणुबॉम्ब वापरण्याची धमकी देत आहेत. परंतू शाहबाज शरीफ कात्रीत सापडले आहेत.

भारताने केलेली कारवाई, पाकिस्तानने त्यावरून केलेली कारवाई तसेच पाकिस्तानच्या बैठकीत घेतलेल्या » पान ७ वर

## वडेट्टीवारांचे वादग्रस्त व्यक्तव्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** पहलगाम हल्ल्याबाबत महाराष्ट्रातील काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी वाद निर्माण करणारे वक्तव्य केले आहे. दहशतवाद्यांनी धर्म विचारुन पर्यटकांची हत्या केल्याचा दावा चुकीचा असल्याचे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. दहशतवाद्यांकडे इतका वेळ कुठे आहे की, कोणाच्या कानात जाऊन तुमचा धर्म कोणता आहे? असे विचारतील. काही जण दहशतवाद्यांनी धर्म » पान ७ वर

### शिवाजीनगर पोलिसांकडून टोळीचा पर्दापाश

# २८ लाखांच्या बनावट नोटा जप्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** बनावट नोटा छापणाऱ्या टोळीचा शिवाजीनगर पोलिसांनी पर्दापाश केला आहे. टोळीकडून तब्बल २८ लाख ६६ हजार १०० रुपयांच्या बनावट नोटा आणि २ लाख ४ हजार रुपयांच्या खऱ्या नोटा तसेच नोटा छापण्याचे अत्याधुनिक साहित्य जप्त केले आहे. याप्रकरणी ५ जणांना अटक करीत शिवाजीनगर पोलिसांच्या सायबर पथकाने मोठे जाळे उध्वस्त केले आहे.

कोटक महिंद्रा बँकेच्या सीडीएम मशिनमध्ये २०० रुपयांच्या ५५ बनावट नोटा जमा झाल्याचे १७ एप्रिलला उघडकीस आले होते. त्यानुसार शिवाजीनगर पोलीस ठाण्यात भा.दं.वि. कलम १७८, १७९, १८० नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. तांत्रिक विश्लेषणाद्वारे पोलिसांनी आरोपी मनिषा स्वप्निल ठाणेकर (रा. येरवडा), भारती गवंड (रा. चिंचवड), सचिन रामचंद्र यमगर (रा. गहुंजे) यांना १८ एप्रिलला ताब्यात घेतले.

आरोपींनी चौकशीत बनावट नोटांचा मुख्य पुरवठादार नरेश भिमप्पा शेट्टी (रा. लोहगाव) असल्याचे उघड झाले. पथकाने नरेशच्या घरी धाड टाकून २०० रुपयांच्या २० बंडल बनावट नोटा, ५०० रुपयांच्या » पान ७ वर

## युक्रेनमध्ये तात्पुरत्या युद्धबंदीची घोषणा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** एका महत्त्वपूर्ण घडामोडीत, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी दुसऱ्या महायुद्धात नाझी जर्मनीच्या पराभवाचे प्रतीक असलेल्या विजय दिनानिमित्त ८ मे ते १० मे पर्यंत युक्रेनमध्ये पूर्ण तीन दिवसांचा युद्धविराम जाहीर केला आहे. ८ मे च्या मध्यरात्रीपासून लागू होणारा आणि १० मे च्या अखेरपर्यंत चालणारा हा युद्धविराम सोमवारी रशियाने जाहीर केला. युक्रेनमधील युद्ध संपवण्यासाठी शांतता करार करण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सुरू असलेल्या राजनैतिक प्रयत्नांनंतर » पान ७ वर

# पाकव्याप्त काश्मीर भारतात घ्यावा - आठवले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जगभरातून पर्यटक जम्मू-काश्मीरमध्ये पर्यटनासाठी येत असतात. मात्र, दहशतवाद्यांकडून पहलगाम येथे पर्यटकांवर हल्ला करण्याची ही पहिलीच वेळ आहे. विविध उद्योग काश्मीरमध्ये येत असल्याने हा हल्ला करण्यात आला आहे. हे दहशतवादी पाकव्याप्त काश्मीरमधून येत असल्याने दहशतवाद्यांचा कायमचा नायनाट करायचा, असेल तर पाकव्याप्त काश्मीर भारतात » पान ७ वर



"आमचे सरकार पाकिस्तानबरोबर युद्ध करण्याचा विचार करीत नाही. मात्र, केंद्र सरकारकडून इतर मार्गाने पाकिस्तानला धडा शिकविला जात आहे. महाराष्ट्रातील जनतेने २८८ पैकी २६७ जागा महायुतीला दिल्या आहेत. मविआ ला फक्त ४६ जागा मिळाल्या. मात्र, राहुल गांधी अमेरिकेत जाऊन महाराष्ट्रातील निवडणुकीबाबत भाष्य करीत आहेत."
**— रामदास आठवले** केंद्रीय मंत्री

# पुरंदर विमानतळ प्रकल्पाच्या विरोधात शेतकऱ्यांचे आंदोलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील पुरंदर विमानतळ प्रकल्पाच्या विरोधात शेतकऱ्यांनी तीव्र आंदोलन पुकारले आहे. शेतकऱ्यांनी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला आहे. यावेळी त्यांनी पुरंदर तालुक्यातील पारगावसह सात गावांतील जमीन विमानतळासाठी देण्यास विरोध व्यक्त केला आहे. पुणे विमानतळासंदर्भात राज्य सरकारने अधिसुचना काढल्या आहेत. मात्र, शेतकऱ्यांनी जमीन देण्यास विरोध केला आहे. हे आंदोलन सुरू असून, अधिक चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

राज्य सरकारने पुणे विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी अधिसूचना काढली आहे. मात्र, शेतकऱ्यांचा पूर्वीपासून या विमानतळाला विरोध आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, त्यांना त्यांच्या शेतीच्या जमिनीचे समर्पण करणे परवडत नाही, कारण यामुळे त्यांचा मुख्य उत्पन्नाचा स्रोत नष्ट होईल. त्यामुळे त्यांनी आतापर्यंत उपोषण आणि मोर्चासारखे विविध मार्ग वापरून आपला विरोध दर्शवला आहे.

पुरंदर विमानतळ प्रकल्पाला विरोध करण्यासाठी ७ गावातील नागरिकांनी सासवडमधील प्रशासकीय इमारतीसमोर एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आंदोलन केलं होतं.

# दंतचिकित्सा क्षेत्रात भारती विद्यापीठ दंत महाविद्यालयाची क्रांती

### रोबोटिक तंत्रज्ञानाद्वारे जगातील पहिली दंतशस्त्रक्रिया

"दात काढणे, बसवणे इतकेच नाही, तर वेडेवाकडे दात सरळ करणे, हिरड्यांचे विविध आजार बरे करणे, जीभ, पडजीभ, ओठ, गाल यांच्या आरोग्याबाबत भारती हॉस्पिटलमध्ये उपचार होत आहेत यातच या तंत्रज्ञानाचा फायदा सर्वसामान्य रुग्णाला होणार आहे."
**— डॉ. राजेश क्षीरसागर**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दात हा आपल्या शरीरातील महत्वाचा भाग आहे. तर दाताटदुखले तर ते सरळ मेंदूशी निगडीत असते. त्यामुळे दाताची शस्त्रक्रिया फार सावध पद्धतीने करावी लागते. मात्र आता दंतशस्त्रक्रिया करण्यासाठी रोबोटिक तंत्रज्ञानाचा वापर सुरु करण्यात आला आहे. पुण्यातील भारती विद्यापीठ दंत महाविद्यालयाने फ्रान्समधील लुपिन डेंटलच्या सहकार्याने रोबोटिक हातांचा वापर करून व्हीनियर्सवरील क्लिनिकल चाचणी यशस्वीरित्या पूर्ण झाली. हा एक अभूतपूर्व प्रकल्प दंतचिकित्सा क्षेत्रातील एक महत्त्वाचा टप्पा असून जगातील पहिली दंतशस्त्रक्रिया भारती हॉस्पिटलमध्ये पार पडली असल्याची माहिती भारती विद्यापीठ मेडिकल फाउंडेशनच्या कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिता जगताप यांनी दिली.



● दातांच्या रुग्णांची काळजी आणि उपचारांचे परिणाम वाढविण्यात रोबोटिक तंत्रज्ञानाची क्षमता या तंत्रज्ञामुळे वाढली गेली आहे.

● आज दंतशास्त्राने मोठी झेप घेतली आहे.

● लेसरपासून मायक्रोस्कोप, कॅड कॅम, स्कॅनर अशी अत्याधुनिक साधने, उपचार उपलब्ध आहेत.



भारती विद्यापीठ आरोग्य विज्ञान कार्यालयाच्या संचालिका डॉ. अरुंधती पवार, » पान ७ वर



**‘जिवंत’ कलेचा अफलातून ‘नजारा’...!** शैक्षणिकसह सर्वच क्षेत्रात आघाडीवर असलेल्या खराडी येथील सुंदरबाई मराठे विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.खराडी येथील गेनबा सोपानराव मोझे संस्थेच्या सुंदर बाई मराठे विद्यालयाने सलग दुसऱ्या वर्षी इंडियन रेड क्रॉस सोसायटी तर्फे देण्यात येणारी "सर्वोत्कृष्ट शाळा "म्हणून ची एन .के .महाजन ट्रॉफी जिंकली. त्यांच्या या अफलातून यशाबद्दल सर्व स्तरातून विद्यालयाचे, शिक्षकांचे आणि विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

# पथनाट्यातून व्यसनाधीनांच्या डोळ्यात ‘अंजन’

## खराडीच्या मराठे विद्यालयाची अफलातून कामगिरी; एन. के. महाजन ट्रॉफीवर कोरले नाव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे:** शैक्षणिकसह सर्वच क्षेत्रात आघाडीवर असलेल्या खराडी येथील सुंदरबाई मराठे विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.खराडी येथील गेनबा सोपानराव मोझे संस्थेच्या सुंदर बाई मराठे विद्यालयाने सलग दुसऱ्या वर्षी इंडियन रेड क्रॉस सोसायटी तर्फे देण्यात येणारी "सर्वोत्कृष्ट शाळा "म्हणून ची एन .के .महाजन ट्रॉफी जिंकली. या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी समाज माध्यमांचे दुष्परिणाम, व व्यसनाधीनता या ज्वलंत विषयावर सादर केलेल्या पथनाट्य सादर करत समाजासमोर एक नवा आदर्श निर्माण केला असून व्यसनाधीन नागरिकांच्या डोळयात झणझणीत अंजन घातले आहे.

इंडियन रेड क्रॉस सोसायटी तर्फे प्राथमिक ,माध्यमिक ,उच्च माध्यमिक, वरिष्ठ महाविद्यालयातील मुलांसाठी समूहगीत,वकृत्व,निबंध,चित्रकला,पथनाट्य नृत्य,गायन अश्या विविध आंतरशालेय स्पर्धांचे आयोजन केले जाते..या सर्व स्पर्धांमध्ये सुंदरबाई मराठे विद्यालयातील बहुसंख्य मुलांनी सहभाग घेऊन प्रथम, द्वितीय ,तृतीय बक्षीस मिळविले.

दरवर्षी इंडियन रेड क्रॉस सोसायटी तर्फे आंतरशालेय विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. ,तसेच शाळेत वर्षभर घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा रेड क्रॉस सोसायटी ऑफ पुणे यांचे बॅनर खाली घेतल्या जातात.त्याचाच परिपाक म्हणून विद्यालयास या वर्षी पुन्हा एन के महाजन ट्रॉफी ने सन्मानित करण्यात आले . दिनांक २६ एप्रिल २०२५ रोजी चितळे हॉल ,आपटे प्रशाला आपटे रोड पुणे येथे वार्षिक पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आला ,त्या वेळी प्रमुख पाहुणे गिर्यारोहक उमेश झिरपे , आपटे प्रशालेचे चेअरमन अभय आपटे यांचे हस्ते विद्यालयात ट्रॉफी देण्यात आली.. या वेळी विद्यालयातील मुलांनी समाज माध्यमांचे दुष्परिणाम, व व्यसनाधीनता या ज्वलंत विषयावर सादर केलेल्या पथनाट्या बद्दल उपस्थितांनी मुलांचे भरभरून कौतुक केले.

या सर्व स्पर्धा करिता विद्यालयातील पर्यवेक्षक सुनील वळसे, रोहन खैरे,श्रीमती मीनाक्षी शहापूरे व शिक्षक वर्ग यांनी मार्गदर्शन केले ,या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रामभाऊ मोझे,उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मोझे शाळा समिती अध्यक्ष अलका पाटील विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय सोमवंशी यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले.

## वेश्याव्यवसायावर खराडी पोलिसांच्या पथकाचा छापा

**पुणे :** मसाज सेंटरच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायावर खराडी पोलिसांच्या पथकाने छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी थायलंडमधील तिघींसह सहा तरुणींची सुटका केली. तरुणींना वेश्याव्यवसायास प्रवृत्त केल्याप्रकरणी मसाज सेंटरच्या व्यवस्थापकाला अटक करण्यात आली. मालकाविरुद्ध अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायद्यान्वये (पीटा) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी व्यवस्थापक लेनखौके किपगेन (३०, रा. मणीपूर) याला अटक करण्यात आली आहे. मसाज सेंटरचा मालक विकास किशोर ढाले (३०, रा. अमरावती) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस कर्मचारी पूजा हडाळे यांनी खराडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खराडी-मुंढवा रस्त्यावर मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय चव्हाण यांना मिळाली होती. त्यानंतर बनावट ग्राहक पाठवून खातरजमा करण्यात आली. तेथे वेश्याव्यवसाय सुरू असल्याचे उघडकीस आले. पोलिसांच्या पथकाने तेथे छापा टाकला.

## विद्यापीठाच्या वसतिगृहात ढेकणांचा सुळसुळाट

**पुणे :** मागील काही दिवसापासून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात ढेकणांचा त्रास विद्यार्थ्यांना सहन करावा लागत आहे. ऐन परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना या त्रासाला सामोरे जाव लागत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्याकडून संताप व्यक्त केला जात आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र परीक्षा सध्या सुरू आहेत. ऐन परीक्षेच्या काळात विद्यापीठाच्या वसतिगृहात ढेकणांचा सुळसुळाट असल्यामुळे विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. विद्यापीठ प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असेल तर त्याला जबाबदार कोण? असा प्रश्न विद्यार्थी संघटनांकडून उपस्थित करण्यात येत आहे.दरम्यान, याबाबत विद्यापीठ वसतीगृह प्रमुख यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही. दरम्यान रात्री झोपेत असलेल्या अनेक विद्यार्थ्यांना ढेकणांनी चावा घेतल्याने त्यांना शारीरिक इजा झाल्याचे मत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले आहे. विद्यापीठ प्रशासनाने वेळीच दखल घेतली नाही तर आंदोलन करण्याचा इशारा विद्यार्थी संघटनांकडून देण्यात आला आहे.

## पहलगाम हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली

**पुणे :** काश्मीर मधील पहलगाम येथे अतिरेक्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना कॅंडल मार्च काढून धायरी ग्रामथ्यांच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. धायरी गावातील शिवकालीन श्री काळभैरव मंदिरापासुन सिंहगड रस्त्यावरील धायरी येथील उंबऱ्या गणपती चौका पर्यंत नागरिकांच्या श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी रांगा लागल्या होत्या. धायरी ग्रामस्थांच्या वतीने श्रद्धांजली शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. आम आदमी पक्षाचे शहराध्यक्ष धनंजय बेनकर, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग चव्हाण पाटील,अँड .राजेश मिडे, किशोर पोकळे, मिलिंद पोकळे निलेश दमिष्टे ,सनी रायकर, विजय लायगुडे, तुषार पोकळे, गंगाधर बडावळे ,जयश्री पोकळे स्वाती पोकळे ,सुरेश गायकवाड, पांडुरंग रायकर, महेंद्र भोसले, सुनील भोसले ,दीपक चव्हाण, बाबा जोरे संजय पोकळे आदी उपस्थित होते.

गेल्या वर्षी केवळ शहरावरच नव्हे तर संपूर्ण राज्यावर पावसाने चांगलीच कृपा केली आहे; विशेष म्हणजे शहराला पाणीपुरवठा करत असलेल्या धरण साखळीत समाधानकारक पाऊस झाला आहे. परिणामी या धरणक्षेत्रातून तब्बल पंधरा ते सोळावेळा विसर्ग सोडावा लागला होता; हा गेल्या काही वर्षातील विक्रम समजला जात आहे. त्यामुळे यंदा शहराला पाणी कमी पडण्याची सुतरामही शक्यता होत नव्हती, त्यामुळे पुणेकर निर्धास्त होते. मात्र; गेल्या काही महिन्यांपासून बांधकाम व्यवसायिकांनी पाण्याच्या याच मुबलकतेचा गैरफायदा घेण्यास सुरुवात केली आहे. पिण्याचे पाणी बांधकामास पाणी वापरण्यास मनाई आहे.

# बिल्डर पालिकेवरच ‘वरचढ’...!

## ऐन उन्हाळयात पाण्याचा ठणठणाठ: बांधकामांवर पाण्याचा ‘फवारा’

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे बांधकाम व्यावसायिक थेट पिण्याचे पाणी वापरत असल्याच्या काही तक्रारी मिळाल्या आहेत. बांधकाम प्रकल्पासह शहरातील वॉशिंग सेंटरवर देखील गाड्या धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर केला जातो. मात्र, उन्हाळ्यात पाण्याची मागणी वाढल्याने पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी व्यस्त असल्याने बांधकाम व्यावसायिकांवर कारवाई करण्यास पालिका असमर्थ आहे.



**पिण्याचे पाणी बांधकामासाठी वापरु नये, असा नियम आहे. मात्र; गेल्या काही महिन्यांच्या कालावधीत राजकीय आणि प्रशासकीय हस्तक्षेप यामुळे बांधकाम व्यवसायिकांचे चांगलेच फावले आहे. परिणामी त्याचा फटका नागरिकांना सहन करावा लागत आहे.** **-योगेश घोरपडे देशमुख,** जिल्हा प्रमुख शिवसेना सहकार सेना

उन्हाळ्यामुळे शहरात पाण्याची मागणी वाढली आहे. ही मागणी पूर्ण करताना पालिकेची दमछाक होत आहे. काही भागांत तर अघोषित पाणीटंचाई असून, नागरिकांना टॅंकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ आली आहे. काही भागांत दोन ते तीन दिवस पाणीच येत नसल्याच्या नागरिक तक्रारी करीत आहेत. असे असताना शहरात सुरू असलेल्या विविध बांधकामांसाठी प्रक्रिया केलेले पाणी वापरणे बंधनकारक असताना बिनदिक्कत पिण्यायोग्य पाणी वापरले जात आहे. अनेक बांधकाम व्यावसायिक थेट टॅंकरने हे पाणी आणत आहेत, तर काही ठिकाणी पालिकेच्या योजनेतून पाणी वापरले जात आहे.

पुण्यातील बांधकामांसाठी राजरोसपणे पिण्याचे पाणी वापरले जात असून, अशा बांधकाम प्रकल्पांवर कुठलीच कारवाई होत नसल्याचे समोर आले आहे. एकीकडे उन्हाळ्यामुळे शहरात तीव्र पाणीटंचाई जाणवत असताना पाण्याची ही उधळपट्टी रोखण्यासाठी कडक पावले उचलण्याची गरज आहे. मात्र, पालिकेकडे यंत्रणा नसल्याने नुसती बघ्याची भूमिका घेतली जात आहे.

मात्र, कर्मचारी नसल्याने अशा बांधकामांवर कारवाई करता येत नसल्याची माहिती समोर आली आहे. पुण्याचे वेगाने शहरीकरण होत आहे. मोठ्या प्रमाणात पुण्यात गृहप्रकल्प उभे राहत आहेत. पुणे महापालिकेतील समाविष्ट गावांमध्ये पाण्याची मोठी ओरड आहे. येथे प्रामुख्याने कोणतीही पाणी योजना नसल्याने प्रामुख्याने टॅंकरने पाणीपुरवठा केला जातो. समाविष्ट गावांसह कोथरूड, कर्वेनगर, वारजे माळवाडी, हडपसर, येरवडा, खराडी यासह चंदननगर परिसरात देखील मोठे गृहप्रकल्प सुरू आहेत. येथील प्रकल्पांना देखील महापालिकेच्या वतीने पुरविण्यात येणारे पिण्याचे पाणी बांधकामांसाठी वापरले जात आहे.

# अल्पवयीन तरुणाच्या आईला जामीन मंजूर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यातील पोर्शे कार अपघात प्रकरणात एक मोठी अपडेट समोर येतेय. आरोपी अल्पवयीन तरुणाच्या आईला जामीन मंजूर करण्यात आलाय. तरुणाचे रक्त बदलल्या प्रकरणी आई शिवानी अगरवाल यांच्यावर कारवाई करण्यात आली होती. येरवडा कारागृहात त्या शिक्षा भोगत होत्या. जवळपास १० महिन्यांनी शिवानी अगरवाल यांना जामीन मिळालाय.

पुण्यात गेल्या वर्षी भयंकर कार अपघात झाला होता. या अपघाताला कारणीभूत ठरलेल्या आरोपी मुलाच्या आईला पोलिसांनी अटक केली होती. तिची शनिवारी तुरुंगातून सुटका झाली. सुप्रीम कोर्टाने चार दिवसांपूर्वीच तिला जामीन दिला होता. शिवानी अगरवाल या १० महिने तुरुंगात होत्या.

पोर्शे अपघातातील आरोपी अल्पवयीन मुलाचे रक्त बदलल्याचा आरोप त्यांच्यावर होता. या प्रकरणी त्यांना अटक झाली होती. सुप्रीम कोर्टाकडून जामीन मिळाल्यानंतर आज, शनिवारी दुपारच्या सुमारास त्यांची पुण्यातील येरवडा मध्यवर्ती कारागृहातून सुटका झाली. त्यानंतर त्या पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पोलीस ठाण्याकडे रवाना झाल्या होत्या.



**पुणे** खराडी येथील सुंदरबाई शाळे शेजारील झोपडपट्टीला आग लागून अनेक झोपड्या भस्मसात झाल्या होत्या. कुटुंबे बेघर झाली होती;या कुटुंबांना घरगुती साहित्याचे वाटप.. वडगाव शेरी मधील धनलक्ष्मी सोसायटी मधील शांती महिला बचत गटातर्फे अध्यक्ष संगीता ओव्हाळ, नाझिया शेख, जयश्री सातकर, सविता जाधव यांचे तर्फे करण्यात आले. यावेळी अखिल मांजराईनगर नागरी कृती समितीचे अध्यक्ष राजेंद्र साळवे, तसेच कणघरे उपस्थित होते.

# प्रेक्षक आणि श्रोते हीच माझी श्रीमंती : संकर्षण कऱ्हाडे



**द. मा. मिरासदार प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी दिला जाणारा 'द. मा. मिरासदार पुरस्कार' आज चतुरस्त्र अभिनेते आणि कवी संकर्षण कऱ्हाडे यांना प्रदान करताना प्रसिध्द ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी. यावेळी (डावीकडून) वसंत मिरासदार, हरीभाऊ मिरासदार, जोशी, कऱ्हाडे, सुनेत्रा मंकणी, रवींद्र मंकणी आणि प्रसाद मिरासदार.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** माझ्या नाटकाचा प्रयोग असला की, मी त्या नाट्यगृहाच्या खिडकीवर जाऊन तिकीट विकण्याचा आनंद मी घेतो. एकमेकांना वेळ न देण्याच्या जमान्यात पाचशे रूपये खर्च करून, गजरा माळून परभणीच्या मुलाचे नाटक पहायला रसिक मायबाप तीन तास खर्ची घालतात. हे प्रेक्षक आणि श्रोते ही माझी खरी श्रीमंती आहे, असे मत चतुरस्त्र अभिनेते आणि कवी संकर्षण कऱ्हाडे यांनी व्यक्त केले.

प्रसिद्ध ग्रामीण कथा लेखक द. मा. मिरासदार यांच्या जन्मदिनानिमित्त गेल्या दोन वर्षांपासून द. मा. मिरासदार प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी दिला जाणारा 'द. मा. मिरासदार पुरस्कार' चतुरस्त्र अभिनेते आणि कवी संकर्षण कऱ्हाडे यांना प्रसिध्द ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी प्रसाद मिरासदार यांनी प्रकट मुलाखतीव्दारे संवाद साधला, त्यावेळी कऱ्हाडे बोलत होते.

दिनांक १४ एप्रिल हा द.मा. मिरासदार यांचा जन्मदिवस आहे. द. मा. मिरासदार हे कथालेखक, चित्रपटकथा व संवाद लेखक, कथाकथनकार होते. तसेच सुमारे २६ वर्षे ते अभाविपचे अध्यक्ष व लोकप्रिय प्राध्यापकही होते. अनेक विविध सामाजिक आणि कलाक्षेत्रातील उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग असायचा. त्यामुळे हा पुरस्कार त्यांच्याशी संबंधित असलेल्या क्षेत्रात त्यांचा वारसा पुढे नेणाऱ्या तरुण कलाकारास द. मा. मिरासदारांच्या नावाने देण्यात येतो. मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी मानपत्राचे वाचन सुनेत्रा मंकणी यांनी केले.

या प्रसंगी व्यासपीठावर वसंत मिरासदार, हरीभाऊ मिरासदार, प्रसिध्द ज्येष्ठ अभिनेते रवींद्र मंकणी, सुनेत्रा मंकणी आणि प्रसाद मिरासदार आदी उपस्थित होते.



द.मा. मिरासदार हे उत्तम लेखक आणि उत्तम माणूस होते. आजचे तरूण पुरस्कारार्थी संकर्षण कऱ्हाडे हे द.मा. मिरासदारांच्या पावलावर पाऊल ठेवून पुढे जात आहेत, याचा अभिमान वाटतो.

**— मोहन जोशी,** ज्येष्ठ अभिनेते

# पूरस्थितीबाबत महापालिकेच्या 'गटांगळ्या'...!

## 'पब्लिक अ‍ॅड्रेस सिस्टीम' यंत्रणा बासनात; प्रशासन भागविणार दूधाची तहान ताकावर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नागरिकांना पुराबाबतचा संदेश एकावेळी देता यावा, यासाठी पुणे महापालिकेकडून 'पब्लिक अ‍ॅड्रेस सिस्टीम' ही अद्ययावत यंत्रणा बसविली जाणार होती. आता पावसाळा तोंडावर असताना अद्याप यंत्रणा बसविलेली नाही. पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने यंत्रणा टप्प्याटप्प्याने किंवा 'आयसीसीसी'समवेत करून दुधाची तहान ताकावर भागविण्याचा प्रकार महापालिकेकडून सुरू असून भीषण पूरपरिस्थिती नियत्रंणात आणण्याच्या ऐवजी प्रशासन 'गटागंळया' खात असल्याचे स्पष्ट झाले आहे.




शहरात मागील वर्षी झालेल्या मुसळधार पावसामुळे मुठा नदीला पूर आला. खडकवासला धरणातून पाण्याचा अचानक विसर्ग केल्याने मुठा नदीकाठच्या सोसायट्या, वस्त्यांना मोठा फटका बसला. या पार्श्वभूमीवर नदीकाठच्या नागरिकांना पुराची माहिती तत्काळ मिळावी, यासाठी महापालिकेने नदीकाठच्या परिसरात अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त 'पब्लिक अ‍ॅड्रेस सिस्टिम' बसविण्याचे निश्चित केले आहे. मागील वर्षी पुराचा फटका बसल्यानंतरही आणि अवघ्या एक-दीड महिन्यावर पावसाळा येऊन ठेपला असतानाही यंत्रणा बसविलेली नाही.

नागरिकांना पुराबाबतचा संदेश एकावेळी देता यावा, यासाठी पुणे महापालिकेकडून 'पब्लिक अ‍ॅड्रेस सिस्टीम' ही अद्ययावत यंत्रणा बसविली जाणार होती. आता पावसाळा तोंडावर असताना अद्याप यंत्रणा बसविलेली नाही. पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने यंत्रणा टप्प्याटप्प्याने किंवा 'आयसीसीसी'समवेत करून दुधाची तहान ताकावर भागविण्याचा प्रकार महापालिकेकडून सुरू आहे.

खडकवासला ते खराडीपर्यंत पुराचा फटका बसणाऱ्या ५० हून अधिक ठिकाणी यंत्रणा बसविली जाणार होती. या कामासाठी आपत्ती व्यवस्थापन विभागाने आर्थिक तरतुदीची मागणीही केली होती. प्रत्यक्षात केवळ ५० लाखांचा निधी आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या पदरात पडला. पुरेशा निधीअभावी यंत्रणा बसविणे शक्य होणार नाही. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापन विभागाने आता पारंपरिक पद्धतीने वाहनांद्वारे पुराच्या स्थितीबाबत नागरिकांना सतर्क करणे, तसेच 'इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटर'द्वारे (आयसीसीसी) तयार केल्या जाणाऱ्या फायबर नेटवर्क सिस्टिमचा वापर करून यंत्रणा सुरू करण्याचा मार्ग निवडला आहे. किरकोळ कामांवर कोट्यवधींची उधळपट्टी करणाऱ्या महापालिकेला नागरिकांच्या जिवाशी निगडित यंत्रणेवर खर्च करताना हात आखडता घ्यावा लागत असल्याची सद्यःस्थिती आहे.

**पब्लिक अ‍ॅड्रेस सिस्टीम बसविण्यासाठी ५० लाखांची तरतूद केली आहे. या निधीतून अद्ययावत यंत्रणा बसविण्याचे काम होईल. तसेच 'आयसीसीसी' यंत्रणेचाही त्यात वापर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.**

**- महेश पाटील,** अपर आयुक्त, आपत्ती व्यवस्थापन विभाग, पुणे मनपा

कोल्हापूरच्या पंचगंगा नदीला काही वर्षांपूर्वी पुराचा मोठा फटका बसला. त्याची गांभीर्याने दखल घेत कोल्हापूरचे तत्कालीन पालकमंत्री सतेज पाटील यांच्या संकल्पनेतून देशात पहिल्यांदाच कोल्हापूरमध्ये 'पब्लिक अ‍ॅड्रेस सिस्टिम' बसविण्यात आली. कोल्हापूर जिल्ह्यातील ६०० हून अधिक गावे व शहरातील ६० ठिकाणी यंत्रणा बसवून कार्यान्वित केली आहे. जर कोल्हापूर महापालिकेला एकावेळी यंत्रणा बसविणे जमू शकते; तर पुणे महापालिकेला का शक्य नाही? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### अशी करते यंत्रणा काम...!

- पूरस्थिती, नैसर्गिक आपत्ती, हवामान खात्याकडून मिळणाऱ्या धोक्याच्या इशाऱ्याबाबत एकाचवेळी अनेकांना सूचना
- सरकारच्या महत्त्वाच्या योजनांचीही माहिती एकावेळी देणे शक्य
- मोबाईलमधून एक कॉल केल्यानंतर एकावेळी यंत्रणा बसविलेल्या ठिकाणी संदेश
- सौरऊर्जेवर चालणाऱ्या यंत्रणेसाठी विशिष्ट प्रणालीचा वापर
- यंत्रणेचे नियंत्रण जबाबदार व महत्त्वाच्या अधिकाऱ्यांच्याच हाती
- १५ ते २० फूट उंचीवरील पुलावर लोखंडी बॉक्समध्ये यंत्रणा
- बॉक्समध्ये ॲम्प्लिफायर व मोबाईल सीम बसणारे 'जीएमएस'चे एक युनिट समाविष्ट
- शहरातील विशिष्ट परिसरात संदेश देण्याचाही पर्याय यंत्रणेत उपलब्ध



## 'कलास्पंदन आर्ट फेअर' चे शुक्रवारपासून आयोजन

**पुणे :** इंडियन आर्ट प्रमोटर्स यांच्या संकल्पनेमधून आयोजित करण्यात येणारे 'कला स्पंदन आर्ट फेअर' शुक्रवार दि. २ मे ते रविवार दि. ४ मे २०२५ दरम्यान एरंडवणे येथील डी पी रस्त्यावरील सिद्धी बँक्वेट्स या ठिकाणी संपन्न होणार आहे. हे आर्ट फेअर २ मे ते ४ मे दरम्यान दुपारी १२:०० ते रात्री ९:०० वाजेपर्यंत खुले असून हे सर्वांसाठी विनामूल्य खुले आहे, असे आयोजकांतर्फे कळविण्यात आले आहे. कलास्पंदन आर्ट फेअर हे एक भारतामधील आघाडीचे आर्ट फेअर असून किफायतशीर दरात कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे याबरोबरच कला रसिकांना थेट कलाकारांशी संवाद साधत, त्यांची कला समजून घेता यावी, कलाकृती खरेदी करता यावी या उद्देशाने आम्ही हे उपक्रम सुरु केल्याचे सुदीप चक्रबर्ती यांनी सांगितले. प्रतिथयश व नवोदित कलाकार यामध्ये दुवा साधणे हे या आर्ट फेअरचे एक प्रमुख उद्दिष्ट्य असल्याचेही त्यांनी सांगितले. या आर्ट फेयर चे उद्घाटन शुक्रवार दिनांक २ मे रोजी दुपारी २ वाजता होणार असून मराठी सिनेअभिनेते अशोक कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत. तसेच ज्येष्ठ ३डी कलाकार - रामजी शर्मा आणि रेलीकॉन शेल्टर्स प्रा. ली. चे व्यवस्थापकीय संचालक, धनंजय निंबाळकर हे मान्यवर उपस्थित असणार आहेत.

## पोहण्यासाठी गेलेल्या तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू

**पुणे :** पुण्यातील मुळशी धरणात बुडून एका तरूणाचा मृत्यू झालाय. मित्रांसोबत तो पोहण्यासाठी गेला होता, त्यावेळी तरूणाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. कृष्णा संतोष सोळंके, वय २४ वर्षे रा.पिंपळे सौदागर असे मुळशी धरणाच्या पाण्यात बुडून मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी सुमित सुनिल लांडे (वय २४, रा. केशव नगर, मुंडवा, पुणे) यांनी पौड पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कृष्णा, सुमित आणि त्यांचे काही मित्र रविवारी सकाळी फिरण्यासाठी मुळशी धरण परिसरात गेले होते. त्यावेळी पळसे येथील जलाशयात पोहण्यासाठी मित्र उतरले. पोहताना कृष्णाला पाण्याचा अंदाज आला नाही अन् तो बुडाला. घटनास्थळाजवळच राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन दलाची (एनडीआरएफ) टीम सराव करत होती. एनडीआरएफच्या जवानांनी तातडीने शोधमोहीम राबवून कृष्णाला पाण्याबाहेर काढले आणि त्याला सीपीआर दिला. मात्र, त्याची कोणतीही हालचाल होत नव्हती. त्याला तातडीने पौड येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. तिथे डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे घोषित केले.

# डांबरीकरणाला 'काळीमा'...!

## दुरुस्तीनंतर चार दिवसातच खोदला रस्ता; लाखोंचा खर्च 'पाण्यात'

महापालिकेत गेल्या तीन वर्षांपासून प्रशासकराज असल्याने आणि प्रशासनाचा कोणताही वचक नसल्याने नागरिकांना रान मोकळे मिळाले आहे, त्यातच काही मस्तवाल नागरिकांना प्रशासन आणि राजकीय नेत्यांचा वरदहस्त मिळत आहे. त्यातूनच महापालिकेच्या आणि लाखो नागरिकांच्या मिळकतकरातून करण्यात आलेल्या विकासकामांवर हातोडा मारण्याचे काम हे समाजकंटक करत आहेत, परिणामी प्रशासनाला लाखो रुपयांचा भुर्दंड सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे अवघ्या चार दिवसांपूर्वीच डांबरीकरण केलेला रस्ता खोदण्याचा प्रताप एका खासगी ठेकेदाराने केला आहे, त्यावर आता महापालिका प्रशासनाला उशीरा शहाणपण सुचले असून या ठेकेदाराच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. मात्र; हा ठेकेदार प्रशासनाला दाद देणार का हे पाहाणे महत्त्वाचे ठरणार आहे.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** धायरी ते डीएसके विश्वला जोडणाऱ्या रस्त्यावर महापालिकेच्या पथ विभागाने चार दिवसांपूर्वीच डांबरीकरण केले होते. मात्र, आज (ता. २८) खासगी ठेकेदाराने एका इमारतीला सांडपाणी वाहिनी जोडण्यासाठी बेकायदेशीरपणे हा रस्ता जेसीबीने खोदलाच, शिवाय जुनी सांडपाणी वाहिनी फोडून टाकली. नागरिकांनी जाब विचारल्यानंतर हे काम बंद पाडण्यात आले. दरम्यान महापालिकेच्या पथ विभागाकडून संबंधित ठेकेदार, बिल्डर आणि हे काम करायला लावणाऱ्या व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे सांगितले.

धायरी परिसरातील रस्त्यांची अवस्था वाईट आहे, या भागातील रस्ते चांगले व्हावेत यासाठी प्रशासनाकडे कायम पाठपुरावा सुरु असतो. धायरी गावातून डीएसके विश्वकडे जाणाऱ्या रस्त्यावर चामुंडा हॉटेल ते डीएसके विश्व कमान या दरम्यानचा रस्ता चार दिवसांपूर्वी करण्यात आला. आज सकाळी याठिकाणी जेबीसीने रस्ता खोदण्याचे काम सुरु केले. नागरिकांनी तेथील कामगारांकडे चौकशी केली असता भाजपच्या एका माजी नगरसेवकाच्या पीएचे काम आहे एवढेच सांगितले जात होते. नागरिकांना हे महापालिकेचे काम आहे असे वाटत असल्याने 'आत्ताच रस्ता केलाय लगेच खोदला का?' अशा शब्दात जाब विचारत होते.

या ठिकाणी महापालिकेच्या पथ, मलनिःसारण विभागाचे अभियंते उपस्थित नव्हते. पथ विभागाचे उप अभियंता नरेश रायकर, मलनिःसारणचे निशिकांत छापेकर, शुभम देशमुख यांच्याकडे चौकशी केली असता रस्ता खोदण्यासाठी परवानगी दिली नसल्याचे सांगण्यात आले. तसेच किशोर पोकळे यांच्या पाठपुराव्याने झालेला आहे, त्यांना हा प्रकार कळताच त्यांनी घटनास्थळी येऊन ठेकेदाराला जाब विचारला व काम बंद पाडले. हे काम महापालिकेसाठी नाही तर एका बांधकाम व्यावसायिकाच्या इमारतीला अनधिकृतपणे सांडपाणी वाहिनी जोडण्यासाठी सुरु होते.

**नवीन रस्ता बेकायदेशीरपणे खोदल्याचे खपवून घेतले जाणार नाही. संबंधित सर्वांवर गुन्हा दाखल केला जाईल. तसेच संबंधित बांधकाम व्यावसायिकाची तक्रार बांधकाम विभागाकडेही केली जाईल.**

**-अनिरुद्ध पावसकर,** प्रमुख, पथ विभाग, पुणे मनपा

## पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर उडाण कॅफे सुरू



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**पुणे :** पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर आज उडाण कॅफे सुरू झाले असून, प्रवाशांना आता अत्यंत माफक दरात चहा, कॉफी आणि अल्पोपहार घेता येणार आहे. केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी ही घोषणा केली आहे.

या नवीन उपक्रमामुळे, पुणे विमानतळावरील प्रवाशांना आता चहा आणि पाण्याची बाटली प्रत्येकी केवळ १० रुपयांना मिळणार आहे. त्याचबरोबर कॉफी, समोसा आणि मिठाई यांसारखे पदार्थ फक्त २० रुपयांमध्ये उपलब्ध असतील. सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात विमान प्रवासासोबत चांगल्या सुविधा मिळाव्यात, हा यामागील उद्देश आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'उडे देश का आम नागरिक' या संकल्पनेतून प्रेरणा घेऊन आणि केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. विशेषतः बजेटमध्ये प्रवास करणारे, ज्येष्ठ नागरिक आणि वारंवार प्रवास करणाऱ्यांसाठी हा निर्णय अत्यंत सोयीचा ठरणार आहे.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आपल्या सोशल मीडिया घोषणेत सांगितले की, कोलकाता, अहमदाबाद आणि चेन्नई विमानतळांवर 'उडाण कॅफे'ला मिळालेल्या प्रचंड प्रतिसादानंतर आता पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरही ही सेवा सुरू होत आहे. यामुळे भारतीय विमानतळे अधिक प्रवासी-स्नेही बनवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे.

पुणे विमानतळावरून दर महिन्याला लाखो प्रवासी प्रवास करतात. त्यांच्यासाठी वाजवी दरात दर्जेदार खाद्यपदार्थ उपलब्ध करून देणारी 'उडाण कॅफे' ही एक स्वागतार्ह आणि वेळेवर सुरू झालेली सुविधा मानली जात आहे. प्रवाशांनी आणि वारंवार प्रवास करणाऱ्यांनी या उपक्रमाचे स्वागत केले असून, भारतीय विमानतळांना अधिक समावेशक बनवण्यासाठी हे 'अत्यंत आवश्यक पाऊल' असल्याचे म्हटले आहे.



## मार्केट यार्डात पालेभाज्यांची आवक वाढली

**पुणे :** मार्केट यार्डात पालेभाज्यांची आवक मागील आठवड्याच्या तुलनेत वाढली आहे. त्यामुळे मेथीच्या भावात घाऊक बाजारात जुडीमागे २ रुपये, तर अंबाडीच्या भावात १ रुपयांनी घट झाली आहे. तर आवकच्या तुलनेत मागणी जास्त असल्याने शेपूच्या भावात जुडीमागे २ रुपये आणि कांदापात, चाकवतच्या भावात प्रत्येकी १ रुपयांनी वाढ झाली आहे. मागणी आणि पुरवठा यातील समतोलामुळे उर्वरित पालेभाज्यांचे भाव स्थिर असल्याची माहिती व्यापारी निखिल भुजबळ यांनी दिली. येथील घाऊक बाजारात रविवारी कोथिंबिरीची सुमारे सव्वा लाख जुडींची आवक झाली. ही आवक मागील आठवड्यात 70 हजार जुडी होती. तर मेथीची मागील आठवड्यात ४० हजार जुडी आवक झाली होती. त्यामध्ये वाढ होऊन आज ६० हजार जुडींची आवक नोंदविण्यात आली. सध्या सर्व प्रकरच्या पालेभाज्यांना चांगली मागणी असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

## लक्ष्मीबाई दगडूशेठ दत्तमंदिरात २५ लाख फुलांची आरास

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रंगीबेरंगी फुलांनी सजलेला सभामंडप... शोभिवंत फुलांची आरास... सुवासिक फुलांनी साकारलेले विविध हार... मोग-याच्या फुलांचा पोशाख आणि गुलाब, झेंडू, चाफा यांसारख्या तब्बल २५ लाख फुलांची सजावट बुधवार पेठेतील लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिरात करण्यात आली. वासंतिक पुष्पोत्सवानिमित्त सत्तू अमावस्येला करण्यात येणारी फुलांची आरास पाहण्याकरिता पुणेकरांनी मोठी गर्दी केली.

कै.श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टतर्फे संस्थापिका लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुष्पोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यावेळी दत्तमंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र बलकवडे, कार्यकारी विश्वस्त अ‍ॅड. प्रताप परदेशी, खजिनदार अ‍ॅड. रजनी उकरंडे, उत्सव प्रमुख सुनिल रुकारी, उत्सव उप प्रमुख अक्षय हलवाई, विश्वस्त महेंद्र पिसाळ, अ‍ॅड. शिवराज कदम जहागिरदार, डॉ. पराग काळकर, युवराज गाडवे आदी उपस्थित होते. चैत्र महिन्यातील विशेष प्रसाद म्हणून कैरीची डाळ, पन्हे वाटप करण्यात आले. हलवाई परिवारातर्फे पारंपरिक लघुरूद्र करण्यात आले.

पुष्पोत्सवाबाबत माहिती देताना अध्यक्ष राजेंद्र बलकवडे म्हणाले, मंदिरात यंदा २५ लाख फुलांची आरास करण्यात आली आहे.



**पुणे** कै.श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टतर्फे सत्तू अमावस्येला मंदिराच्या संस्थापिका लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई यांच्या पुण्यतिथी निमित्त दत्तमंदिरात वासंतिक पुष्पोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यावेळी २५ लाख फुलांची केलेली आकर्षक सजावट.

# जय परशुराम... च्या जयघोषात मध्य पुण्यात भव्य शोभायात्रा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भगवान परशुराम की जय... जय परशुराम.. सियावर रामचंद्र की जय.. जय श्रीराम... च्या जयघोषात आणि ढोल-ताशा, टाळ-मृदूंगाच्या गजरात हिंदूंचे आराध्य दैवत व भगवान विष्णूंचे सहावे अवतार श्री भगवान परशुराम यांच्या जन्मोत्सवानिमित्त मध्य पुण्यात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. सर्व हिंदू समाजाला सोबत घेऊन ही शोभायात्रा काढण्यात आली असून यामध्ये सर्व जाती बांधव सहभागी झाले होते.

भगवान परशुराम जन्मोत्सव समिती पुणे च्या वतीने श्री भगवान परशुराम यांच्या जन्मोत्सवानिमित्त केसरी वाडा ते शनिवारवाडा अशी शोभायात्रा काढण्यात आली. केसरीवाडा येथून शोभायात्रेचा प्रारंभ झाला. यावेळी खासदार मेधा कुलकर्णी, राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, राजेश पांडे, रोहित टिळक, शैलेश टिळक, संदीप खर्डेकर, समितीचे प्रमुख पदाधिकारी भालचंद्र कुलकर्णी, सूर्यकांत पाठक, विश्वजीत देशपांडे, मकरंद माणकीकर यांसह चैतन्य जोशी, मनोज पंचारिया, मयुरेश अरगडे, विश्वनाथ भालेराव, श्रीकांत जोशी, श्यामराव कुलकर्णी आदी उपस्थित होते.

शोभायात्रेत अग्रभागी चौघडा रथ त्यापाठोपाठ जगदंब वाद्य पथक, बाल व युवा वारकऱ्यांचे पथक, पारंपरिक वेशातील महिला आणि मुख्य भगवान श्री परशुराम रथ सहभागी झाला होता. ठिकठिकाणी शोभायात्रेचे स्वागत मोठ्या उत्साहात करण्यात आले. संपूर्ण शोभायात्रा मार्गावर रांगोळी व पायघड्या घालण्यात आल्या होत्या.



भगवान परशुराम जन्मोत्सव समिती पुणे च्या वतीने श्री भगवान परशुराम यांच्या जन्मोत्सवानिमित्त शोभायात्रा काढण्यात आली. या यात्रेत उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील, खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, रोहित टिळक, क्रिएटिव्ह फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संदिप खर्डेकर सहभागी झाले होते.

मेधा कुलकर्णी म्हणाल्या, हिंदूंनी एक झाले पाहिजे. जातीभेदाच्या भिंती तोडून आपण एकत्र यायला हवे. पहलगाम सारख्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर प्रत्येकाने सर्तक राहायला हवे. आपल्यातील जाती विसरून आपण हिंदू आहोत हे लक्षात ठेवले पाहिजे. देशासाठी आपण एकत्र येण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

चंद्रकांत पाटील म्हणाले, नुकत्याच झालेल्या दुर्दैवी घटनेमुळे आपण एकत्र राहिलो तर सुरक्षित राहू हा भाव सगळ्यांमध्ये येत आहे. जात माना हे कुठेही म्हटलेलं नाही. आपण सगळे एकत्र आलो, तर आपल्याकडे पाहण्याची कोणाचीही हिमंत होणार नाही, असेही ते म्हणाले.

भगवान परशुराम जन्मोत्सव समिती पुणे च्या अंतर्गत ३० हून अधिक संस्था व संघटना यामध्ये सहभागी झाल्या. त्यामध्ये महाराष्ट्र ब्राह्मण सभा, देवस्था ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था, शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन महाराष्ट्रीय ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ, अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था (नाशिक) पुणे केंद्र, परशुराम हिंदू सेवा संघ, आम्ही सारे ब्राह्मण, ब्राह्मण व्यावसायिक पत्रिका, ब्राह्मण जागृती सेवा संघ, ब्राह्मण महासंघ, ब्राह्मण सेवा संघ वाघोली, याज्ञवल्क्य आश्रम, सर्व शाखीय ब्राह्मण महासंघ पुणे, चित्पावन अस्तित्व संस्था, क-हाडे ब्राह्मण महासंघ/ संघ, महाराष्ट्र चित्पावन संघ, कृष्ण यजुर्वेदी तैतरीय संघ, चित्पावन कट्टा, याज्ञवल्क्य उद्योजक विकास अभियान, अखिल ब्राह्मण संघ, राष्ट्रीय सेवा संघ, पौरोहित्य पुरोहित फाऊंडेशन, विप्र फाऊंडेशन, गौड ब्राह्मण संघ, गौडा सारस्वत ब्राह्मण संघ, चित्पावन मित्र असोसिएशन, श्री राजस्थानी छ:न्याति विप्र मंडल पुणे, विप्र फाऊंडेशन १२ बी झोन पुणे, अखिल भारतीय पेशवा संघटना यांसह अनेक संस्था व संघटनांचा सहभाग होता.

## ऑनलाईन सरकारी बाजारपेठ प्रशिक्षणाचे आयोजन

**पुणे :** सरकारी संस्था/विभाग/सार्वजनिक संस्था खरेदी करत आलेल्या विविध वस्तू आणि सेवांच्या खरेदीसाठी एक डिजिटल ई-कॉमर्स पोर्टल आहे, ते म्हणजेच जीईएम पोर्टल. यावर सरकारी संस्था/विभाग/सार्वजनिक संस्था यांना लागणाऱ्या वस्तू, एखादा इच्छुक व्यक्ती त्याच्या व्यवसायाची नोंदणी करून त्याच्या सेवा व वस्तूंची थेट विक्री करू शकतो. हे प्लॅटफॉर्म केंद्र व राज्य सरकारातील मंत्रालये/विभाग, केंद्र व राज्याचे सार्वजनिक उपक्रम, स्वायत्त संस्था आणि स्थानिक संस्थांना सामान्य वापराच्या वस्तू आणि सेवा पारदर्शक आणि कार्यक्षम पद्धतीने खरेदी करण्यासाठी आरंभापासून अखेरपर्यंत ऑनलाइन मार्केटप्लेस उपलब्ध करून देते. याबाबतच मार्गदर्शन करणारे १० दिवस चालणारे ऑनलाइन प्रशिक्षण ५ मेपासून सुरु होत आहे.



## ‘ पीएमपी’ बसमध्ये चोरट्यांचा सुळसुळाट

**पुणे :** पीएमपी बसने प्रवास करणाऱ्या महिलांचे दागिने हिसकावल्याच्या तीन घटना उघडकीस आल्या आहेत. कात्रज ते अरण्येश्वर मार्गावरून प्रवास करणाऱ्या महिलेच्या गळ्यातील ७५ हजारांचे सोन्याचे मंगळसूत्र चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. याबाबत एका महिलेने सहकारनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला शुक्रवारी पीएमपी बसने कात्रज परिसरातून निघाल्या. अरण्येश्वर येथील थांब्यावर उतरल्या. तेव्हा त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरीला गेल्याचे लक्षात आले. स्वारगेट स्थानक परिसरात ज्येष्ठ महिलेच्या हातातील ५० हजारांची सोन्याची पाटली चोरट्यांनी चोरून नेली. याबाबत महिलेने स्वारगेट पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला ११ एप्रिलला सायंकाळी स्वारगेटवरून निगडीला निघाल्या होत्या. बसमध्ये प्रवेश करताना चोरट्यांनी कटरचा वापर करून महिलेच्या हातातील सोन्याची बांगडी कापून नेली. निगडी ते पुणे स्टेशन मार्गावरील बसमधून प्रवास करणाऱ्या एका ३३ वर्षीय महिलेच्या पिशवीतून एक लाख १७ हजार रुपयांचे दागिने चोरून नेण्यात आले. १८ एप्रिलला ही घटना घडली. याबाबत महिलेने बंडगार्डन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला निगडीत राहायला आहेत. बस प्रवासात चोरट्याने दागिने चोरल्याचा प्रकार पुणे स्टेशन स्थानकात उघडकीस आला.

## बांधकाम क्षेत्रात करिअरसाठी प्रशिक्षण शिबीर

**पुणे :** वेगाने वाढणाऱ्या बांधकाम क्षेत्रात योग्य कौशल्यांनी सज्ज उमेदवारांसाठी नोकरीच्या भरपूर संधी आहेत. स्थापत्य अभियांत्रिकीची कोणतीही पार्श्वभूमी नसलेली व्यक्ती योग्य प्रशिक्षणानंतर बांधकाम उद्योगात आपला व्यवसाय सुरू करू शकते अथवा करिअर घडवू शकते. या पार्श्वभूमीवर २० दिवसांचे प्रगत बांधकाम पर्यवेक्षक (कन्स्ट्रक्शन सुपरवायजर) प्रशिक्षण १० मेपासून सुरु होत आहे. यामध्ये बांधकाम उद्योगात नोकरी मिळण्याची शक्यता वाढवणारे, स्थापत्य अभियांत्रिकीचे प्रगत ज्ञान देणारे, प्रात्यक्षिकावर आधारित प्रशिक्षण देणार आहे. बांधकाम क्षेत्र व साहित्याचा परिचय, रेखाचित्राचे वाचन व प्रत्यक्ष साइटवर त्याचा सराव, क्षेत्र भेटी, प्रकल्प पूर्वतयारी, कंत्राटदाराच्या कामाची पद्धत, अंदाज व खर्च नियोजन, बांधकाम उद्योगातील १४ महत्त्वाच्या पायऱ्या, सुरक्षिततेसाठी घ्यायची खबरदारी व वेळेचे व्यवस्थापन इत्यादी विषयांवर मार्गदर्शन होणार आहे.

## मेडिकल कोडिंग प्रमाणपत्र प्रशिक्षण १५ मे पासून

**पुणे :** वैद्यकीय क्षेत्रात करिअरसाठी मेडिकल कोडिंग हे तीन महिन्यांचे प्रमाणपत्र प्रशिक्षण ‘एसआयआयएलसी’ व टेक महिंद्रा यांच्या वतीने १५ मेपासून सुरू होत आहे. यामध्ये सीपीसी (सर्टिफाइड प्रोफेशनल कोडर) प्रमाणपत्र तयारीचे मार्गदर्शन तसेच केपीओ (नॉलेज प्रोसेस आउटसोर्सिंग) व बीपीओ (बिझनेस प्रोसेस आउटसोर्सिंग) साठीचे मार्गदर्शन होणार आहे. मेडिकल शब्दावलीची ओळख, शरीर विज्ञान आणि शारीरिक रचना, कोडिंग प्रणाली : आयसीडी-१०, सीपीटी आणि एचसीपीसीएस कोडिंग, वैद्यकीय सेवा नियमावली (एचआयपीएए), कोडिंग नियम व मार्गदर्शक तत्त्वे, कोडिंग सराव इ. चा समावेश आहे. विज्ञान विषयातील २१ ते २५ वयोगटांतील पदवीधारक, व्यावसायिक, मेडिकल कोडिंगमध्ये करिअर करू इच्छिणारे प्रवेशास पात्र आहेत.

## सहजिल्हा निबंधक कार्यालयाच्या वेळा निश्चित

**पुणे :** नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागातील सहजिल्हा निबंधक कार्यालयामध्ये नागरिकांना भेटण्यासाठी सोमवार ते शुक्रवार दुपारी तीन ते पाच अशी वेळ निश्चित केली आहे. मात्र दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक आणि संरक्षण सेवेतील नागरिकांना वेळेची मर्यादा लागू नाही. राज्य सरकारच्या सूचनेवरून सहजिल्हा निबंधक संतोष हिंगाणे यांनी हा आदेश काढला आहेत. सकाळच्या सत्रातील दुय्यम निबंधक कार्यालय तसेच नियमित वेळेतील कार्यालयात आणि विवाह अधिकारी पुणे यांना भेटीसाठी येणाऱ्या नागरिकांसाठी दुपारी दोन ते तीन ही वेळ निश्चित केली आहे. तसेच दुपारच्या सत्रातील दुय्यम निबंधक कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसाठी दुपारी ४.३० ते ५ ही वेळ निश्चित केली आहे. दुय्यम निबंधक हवेली १ ते ९ कार्यालयातील जुन्या दस्तांच्या बाबतीत भेटीसाठी प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सकाळी ११ ते दुपारी २ ही वेळ निश्चित केली आहे.

## कृपासिंधू श्री स्वामी समर्थ...!



**पुणे** भवानी पेठेत श्री अक्कलकोट स्वामी समर्थ, ट्रस्ट, पुणे यांच्यातर्फे श्री अक्कलकोट स्वामी समर्थ बाल उद्यानात श्री अक्कलकोट स्वामी समर्थ यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या अक्कलकोट स्वामी यांच्या मंदिराच्या ३० व्या वर्धापनदिनानिमित्त सांस्कृतिक महोत्सवाचे उदघाटन उल्हास पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी विविध मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

## सेवाभावी संस्थांमुळे माणुसकी जिवंत: उल्हास पवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सेवाभावी संस्था समाजात सामाजिक कार्य करताना माणसे जोडण्याचे कार्य करतात. या सेवाभावी संस्थामुळे माणुसकी जिवंत आहे. असे मत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व सामाजिक कार्यकर्ते उल्हास पवार यांनी एका कार्यक्रमात भाषण करताना व्यक्त केले.

भवानी पेठेत श्री अक्कलकोट स्वामी समर्थ, ट्रस्ट, पुणे यांच्यातर्फे श्री अक्कलकोट स्वामी समर्थ बाल उद्यानात श्री अक्कलकोट स्वामी समर्थ यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या अक्कलकोट स्वामी यांच्या मंदिराच्या ३० व्या वर्धापनदिनानिमित्त सांस्कृतिक महोत्सवाचे उदघाटन उल्हास पवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

या सांस्कृतिक महोत्सवाच्या उदघाटनाच्या कार्यक्रमास कोल्हापूरचे प्रसिद्ध सचिन महाराज, आमदार हेमंत रासने, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मोहन जोशी, माजी उपमहापौर आबा बागुल, माजी नगरसेवक संजय बालगुडे, अविनाश साळवे, डॉ सत्यशिल नाईक, डॉ सतीश देसाई, सुनिल रुकारी, अनिल गाडवे, माजी नगरसेवक सदानंद शेट्टी, गुरुजी तालीम मंडळाचे अध्यक्ष प्रवीणसिंग परदेशीं, रविंद्र माळवदकर,विपीन गुपचूप आदी उपस्थित होते.

# पाण्याची नासाडी कराल तर याद राखा

## पालिका प्रशासनाचा निर्वाणीचा इशारा: थेट नळजोडच तोडणार

पाणी वाया घालवणाऱ्यांवर आता दंडात्मक कारवाई करण्यात येणार असून, प्रसंगी नळजोडणी तोडण्याचा इशारा पुणे महापालिके द्वारे देण्यात आला आहे. पुणे शहरात अनेक ठिकाणी पाण्याची मोठ्या प्रमाणात नासाडी होत असल्याचे निदर्शनास आल्याने, पुणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने कठोर पाऊले उचलण्याचा निर्णय घेतला आहे.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील अनेक सोसायट्यांमध्ये पाण्याच्या टाक्या भरल्यानंतर ओव्हरफ्लो होऊन पाणी वाया जाते, कारण स्वयंचलित कॉक बसवलेले नाहीत. तसेच, अनेक बैठ्या घरांमध्ये आणि वॉशिंग सेंटरमध्ये पिण्याच्या पाण्याचा वापर बागकाम, गाड्या धुणे किंवा रस्ता धुण्यासाठी केला जात असल्याचे चित्र आहे. यामुळे पाण्याची प्रचंड नासाडी होत आहे.

पुणे शहरात सध्या पाणीटंचाईची समस्या गंभीर बनली आहे. दररोज सुमारे दीड लाख नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. महापालिकेची आठ टँकर भरणा केंद्रे असूनही, मागणीच्या तुलनेत पुरवठा अपुरा पडत आहे, ज्यामुळे अनेक भागांना नियमित पाणीपुरवठा करणे कठीण झाले आहे.

पाणीपुरवठा विभाग दर आठवड्याला पाण्याच्या नियोजनाचा आणि तक्रारींचा आढावा घेतो. जुन्या सोसायट्यांमध्ये पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्यामुळे आता अभियंत्यांना अशा सोसायट्यांमध्ये प्रत्यक्ष जाऊन मीटरनुसार पाणीपुरवठा तपासण्याचे आणि वितरण व्यवस्थेतील गळती शोधून ती दुरुस्त करण्यासाठी नोटीस देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

> **सर्व कनिष्ठ अभियंत्यांना पाण्याचा अपव्यय करणाऱ्या नागरिकांवर कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. पहिल्यांदा असा प्रकार आढळल्यास नोटीस बजावली जाईल. त्यानंतरही सुधारणा न झाल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल आणि तरीही पाणी वाया जात असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता थेट नळजोड तोडण्यात येईल.**
> **-नंदकिशोर जगताप,** प्रमुख, पाणीपुरवठा विभाग, पुणे मनपा

## विमाननगरमध्ये सफाई कामगाराविरोधात गुन्हा दाखल



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विमाननगर भागातील एका खासगी कंपनीतील महिलांच्या प्रसाधनगृहात लपून डोकावून पाहणाऱ्या सफाई कामगाराविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. खासगी कंपनीतील कर्मचारी तरुणीच्या हा प्रकार लक्षात आल्यानंतर त्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

अनिल दुकाळे (२५, रा. वडार वस्ती, मांजरी) असे गुन्हा दाखल केलेल्याचे नाव आहे. याबाबत खासगी कंपनीतील कर्मचारी तरुणीने विमाननगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार २३ वर्षीय तरुणी ही विमाननगर भागातील एका खासगी कंपनीत कामाला आहे.

आरोपी दुकाळे या कंपनीत गेल्या तीन ते चार महिन्यांपासून सफाई कामगार म्हणून काम करतो. सफाईविषयक कामे करणाऱ्या कंपनीकडून त्याला तेथे ठेवण्यात आले आहे. शनिवारी रात्री तरुणी प्रसाधनगृहात गेली होती.

प्रसाधनगृहातील दिवे बंद होते. आरोपी दुकाळे प्रसाधनगृहात लपून बसला होता. तरुणीने प्रसाधनगृहात गेल्यानंतर दिवे सुरू केले, असता दुकाळे चोरून डोकावत होता. ही बाब तरुणीच्या लक्षात आल्यानंतर तिने आरडाओरडा केला. कंपनीतील कर्मचाऱ्यांनी त्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. दुकाळे याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, गुन्हा जामीनपात्र असल्याने त्याला नोटीस बजावण्यात आली असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक रवींद्र ढावरे करत आहेत.

## मासिक पाळीत आहार, स्वच्छता महत्त्वाची; अधिकाऱ्यांचा सल्ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "मासिक पाळीच्या काळात मुलींच्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याला योगदान देण्यासाठी योग्य मार्गदर्शन आणि समर्थन खूप महत्वाचे आहे. शारीरिक स्तरावर मासिक पाळीदरम्यान योग्य स्वच्छता आणि आहार महत्वाचा असतो, तर मानसिक स्तरावर ताणाव कमी करण्यासाठी व्यायाम, योगा आणि संवाद उपयुक्त असतात." असा सल्ला मिलेट्री नर्सींग सर्वीसेच्या अधिकाऱ्यांनी दिला.

‘द एम्पॉवर हर फाउंडेशन’ या सामाजिक संस्थेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या ‘मासिक पाळी आरोग्य’ आणि ‘प्रथमोपचार’ या कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. संस्थेच्या हिरकणी योजने अंतर्गत दत्तक घेण्यात आलेल्या मुलींसाठी डेक्कन जिमखाना येथे ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रथमोपचार या विषयावर डॉ. श्रद्धा सुंठवाल यांनी विशेष मार्गदर्शन केले.

या प्रसंगी ‘द एम्पॉवर हर फाउंडेशन’चे प्रमुख विश्वस्त, प्रसिद्ध भाषा तज्ज्ञ संदीप नुलकर, संचालिक रूपाली शिंदे-आगाशे व उप संचालिका तन्मयी खिरे उपस्थित होत्या. सर्व मुलींना संपूर्ण वर्षभराचा सॅनिटरी पॅडचा साठा आणि एक प्रथमोपचार किट याचा मोफत वाटप करण्यात आला. याचे वितरण रणजी क्रिकेटर अमेय श्रीखंडे व आंतरराष्ट्रीय टेनिस खेळाडू जेनिफर लुइखाम यांच्या हस्ते करण्यात आले.



# खंडाळकर संगीत अकादमीतर्फे ‘ज्ञानदेव संगीत महोत्सव’




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अभिनव गंधर्व पंडित रघुनाथजी खंडाळकर संगीत कला अकादमी, पुणे यांच्यावतीने शनिवार दि.३ आणि रविवार दि. ४ मे रोजी अभिजात भारतीय शास्त्रीय संगीतावर आधारित ‘ज्ञानदेव संगीत महोत्सवा’चे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सव पर्वती-विद्यानगरी येथील कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी अँड जी. के. पाटे (वाणी) इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या कै. दादासाहेब केतकर सभागृहात होणार आहे. महोत्सवाची सुरुवात सायंकाळी ५ वाजता होणार आहे.

राजस उपाध्ये यांच्या व्हायोलिन वादनाने शनिवारी (दि. 3) महोत्सवास प्रारंभ होईल. त्यानंतर प्रसिद्ध गायक धनंजय हेगडे यांचे शास्त्रीय गायन होईल. प्रसिद्ध तबलावादक पद्मश्री पंडित विजय घाटे यांचा ‘मेलोडीक रिदम’ हा कार्यक्रम होणार आहे. यात शीतल कोलवलकर (कथक), सुरंजन खंडाळकर (गायन), ओमकार दळवी (पखवाज), अमेय बिचू (संवादिनी), सागर पटोकार (पढंत) यांचा सहभाग असणार आहे.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी (दि. ४) पंडित रघुनाथ खंडाळकर यांचे शिष्य महेश कंटे आणि शंकर गिरी यांचे सहगायन होईल. त्यानंतर यशवंत वैष्णव यांचे एकल तबलावादन होणार असून त्यांना मिलिंद कुलकर्णी संवादिनी साथ करतील. कै. विप्रदास चंद्रकांत मेणकर (ज्येष्ठ उद्योजक, संगीतप्रेमी) स्मृती पुरस्काराने पद्मश्री पंडित विजय घाटे यांचा गौरव केला जाणार असून पुरस्काराचे वितरण प्रसिद्ध उद्योजक विलास जावडेकर यांच्या हस्ते होणार आहे. या प्रसंगी प्रसिद्ध वैद्य प्रशांत अनंत सुरू यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

महोत्सवाची सांगता विद्यालयाचे संस्थापक अभिनव गंधर्व पंडित रघुनाथ खंडाळकर, त्यांचे पुत्र व शिष्य सुरंजन आणि शुभम खंडाळकर यांच्या ‘कृष्णरंग’ या अनोख्या कार्यक्रमाने होणार आहे. त्यांना अमर ओक (बासरी), अजिंक्य जोशी (तबला), श्रेयस बडवे (निरूपण), पार्थ भूमकर (पखवाज), अमृता ठाकूरदेसाई (की-बोर्ड), विश्वास कळमकर (तालवाद्य) हे साथसंगत करतील. महोत्सवाच्या दोन्ही दिवसाचे निवेदन मंगेश वाघमारे करणार आहेत. कार्यक्रम रसिकांसाठी विनामूल्य असून मोफत प्रवेशिक कार्यक्रम स्थळी मिळणार आहेत.



## हजारो पर्यावरण प्रेमी रस्त्यावर

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड आणि पुणे यांच्या सीमेवर असलेल्या मुळा मुठा नदीच्या सुशोभीकरणाच्या नावाखाली नदीपात्र अरुंद करत नदी भोवताली असलेले वृक्ष संपदा तोडण्यात येत असल्याचा आरोप करत आज हजारो पर्यावरण प्रेमी रस्त्यावर उतरले. विकासाच्या नावाखाली शहरातील सर्वच नद्यांची पात्र अरुंद केली जात असून नद्यांच्या भोवताली असलेली वृक्षसंपदा तोडण्यात येत असल्याचा आरोप पर्यावरण प्रेमींनी केला आहे.

महापालिकेकडून राबविण्यात येत असलेल्या नदी सुधार प्रकल्पाविरुद्ध पर्यावरणप्रेमी संघटनांनी आंदोलन सुरू केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून पिंपळे निलख येथे 'नदीसाठी नदीकाठी' आंदोलन होत आहे. यामध्ये पुणे, पिंपरी-चिंचवड शहरातील ११० पेक्षा अधिक संस्था-संघटना सहभागी झाल्या आहेत. दोन महिन्यांपासून शहरात नदी सुधार प्रकल्पाच्या विरोधात हे आंदोलन सुरू आहे. यापूर्वी मानवी साखळी, निवेदन, लाक्षणिक उपोषण पर्यावरणप्रेमी संघटनांनी केले. त्यानंतर आता ११० पेक्षा अधिक संघटनांनी एकत्रित येत आज पिंपळे निलख येथील शहीद अशोक कामठे उद्यानापासून स्मशानभूमीपर्यंत नदीकाठी पदयात्रा काढण्यात आली. या आंदोलनाला 'नदीसाठी नदीकाठी' असे नाव देण्यात आले आहे. आता पर्यावरण प्रेमींच्या या भूमिकेनंतर प्रशासन नेमकी काय भूमिका घेणार हे पाहणं देखील महत्त्वाचे ठरणार आहे.



## जिजाऊ व्याख्यानमालेत डॉ. केदार फाळकेंचे मार्गदर्शन

**पिंपरी :** 'धर्मासाठी मृत्यूला कवटाळून छत्रपती संभाजी महाराज अमर झाले.' असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक डॉ. केदार फाळके यांनी चापेकर स्मारक उद्यान, चापेकर चौक, चिंचवडगाव येथे शनिवार, दि.२६ एप्रिल २०२५ रोजी केले. गांधीपेठ तालीम मित्रमंडळ आणि अनंत नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पाच दिवसीय जिजाऊ व्याख्यानमालेत 'छत्रपती संभाजीमहाराजांची राजनीती' या विषयावरील चतुर्थ पुष्प गुंफताना डॉ. केदार फाळके बोलत होते. ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत चौगुले अध्यक्षस्थानी होते. पद्मश्री गिरीश प्रभुणे, ह. भ. प. किसनमहाराज चौधरी, जितेंद्र देव, गांधीपेठ तालीम मित्रमंडळाचे अध्यक्ष राजाभाऊ गोलांडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

## होर्डिंगचालक व धारकांचे निर्णयाकडे दुर्लक्षच

**पिंपरी :** अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यांमुळे होर्डिंग कोसळून दुर्घटना घडू नये यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून दोन महिने होर्डिंगवर जाहिरात न लावण्याचे आदेश महापालिका प्रशासनाने दिले होते. शहरातील सर्व होर्डिंगवर १५ एप्रिल ते १५ जून असे दोन महिने जाहिरात बॅनर लावता येणार नाहीत. होर्डिंग रिकामे असतील, असा निर्णय पालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाने घेतला. मात्र, त्याला केराची टोपली दाखवत शहरातील होर्डिंग मालकांनी जाहिरात व्यवसाय सुरुच ठेवला आहे. पावसाळ्यापूर्वीच्या १५ एप्रिल ते १५ जून असे दोन महिने होर्डिंगवर जाहिरात बॅनर न लावण्याच्या सूचना होर्डिंगचालकांना देण्यात आल्या. त्याला होर्डिंगचालकांनी सहमती दिली होती. मात्र, ती मुदत सुरू होऊन तेरा दिवस उलटले तरी, शहरातील बहुतांश होर्डिंगवर जाहिरात दिसत आहेत. गृहप्रकल्प, राजकीय नेत्यांचे वाढदिवस, त्यांचे दौरे, कार्यक्रम, वाढदिवसाच्या शुभेच्छा अशा जाहिरात झळकत आहेत.

## अक्षय तृतीयेसाठी बाजारात आंबा दाखल



**मोशी :** अक्षय्यतृतीयेच्या मुहूर्ताला होणाऱ्या खरेदीसाठी मोठ्या प्रमाणावर शहराच्या बाजारपेठांमध्ये फळांचा राजा आंबा दाखल झाला आहे. यामध्ये कोकणातून आता आवक झालेल्या आंब्यांची संख्या अधिक आहे. तर दरात काहीशी घसरण झाल्याने आता सर्वसामान्यांच्या आवाक्यात आलेल्या हापूसमुळे बाजारपेठेत आंबा खरेदी -विक्रीतून मोठी आर्थिक उलाढाल होत आहे.

अखेर अक्षय तृतीयेसाठी फळांचा राजा बाजारपेठेत दाखल झाला आहे. एवढेच नाहीतर मोठ्या प्रमाणात आवक झाल्याने सर्वसामान्य नागरिकांना हापूस आंब्याची चव चाखता आली आहे. अक्षय तृतीयेमुळे आवक वाढणार असा अंदाज व्यापाऱ्यांनी बांधला होता. अखेर तो खरा ठरला असल्याने आंबा खवय्येंनाही अक्षय तृीतीयेच्या मुहूर्तावर चव चाखायला मिळत आहे. तर गेल्या आठ दिवसांपासून मोशी, पिंपरी उपबाजारांसह आंबा विक्रेत्यांकडे आंब्यांची आवक वाढली आहे.

## संयुक्त जयंती सोहळा



## कुवेतमध्ये संयुक्त जयंती सोहळ्याचे भव्यदिव्य आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कुवेत :** येथे नुकतेच संयुक्त जयंती सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सम्राट अशोक, शाहू महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याला आदरांजली वाहिली गेली. या सोहळ्यासाठी सर्व अनुयायांनी उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाची सुरुवात सामुदायिक वंदनाने झाली, ज्यात उपस्थितांनी शांततेत आणि भक्तिभावाने भाग घेतला. कार्यक्रमात बहुजन समाज सुधारकांच्या जीवनावर आधारित विशेष प्रस्तुती सादर करण्यात आली. लहान मुलांनी आवडत्या नेत्यांची वेशभूषा परिधान करून त्यांच्याविषयी माहिती दिली. उपस्थितांमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण झाले. मुलांच्या उत्साहाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

सोहळ्यात गीत-नृत्य आणि माहितीपूर्ण सादरीकरण यांसारख्या विविध कार्यक्रमांचा समावेश होता, ज्यामुळे उपस्थितांना आनंद आणि माहितीचा अनोखा अनुभव मिळाला. महाबोधी विहार संघर्षावरील माहितीपूर्ण सादरीकरणाने उपस्थितांना विशेष प्रभावित केले. सजावट उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारी होती.

# विद्यार्थ्यांनो चांगला माणूस बना : आयुक्त






"गेल्या तीन वर्षांत शिक्षण विभागात शिक्षक आणि पालकांच्या मदतीने खूप चांगले बदल घडवून आणले आहेत. आजही अनेक शाळांच्या खोल्या व मैदानांच्या समस्या आहेत, परंतु येणाऱ्या पाच वर्षांत आपण असेच काम करत राहिलो तर सर्व समस्यांना तोंड देऊ शकतो. यावर्षी भोसरी, दापोडी, दिघी येथील शाळांमध्ये डान्स रूम, कला कक्ष, स्टाफ रूम अशा सुविधा उपलब्ध करून देणार आहोत.

**-शेखर सिंह,** पालिका आयुक्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** "विद्यार्थ्यांनो अभ्यासक्रमासोबत आयुष्यात चांगला माणूस कसा घडेल यावर लक्ष केंद्रित करा.तसेच शिक्षण क्षेत्रात अविरत काम करत राहिल्यास सर्व समस्यांना तोंड देऊ शकू असा विश्वास मार्गदर्शनपर भाषणात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी व्यक्त केला.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने निगडी प्राधिकरण येथील ग.दि. माडगूळकर सभागृहात वार्षिक स्नेह उत्सव, गुणगौरव आणि पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमात अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, सहाय्यक आयुक्त शिक्षण विभाग विजयकुमार थोरात, शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी संगीता बांगर, तसेच प्राथमिक शाळांमधील सर्व मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षण विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

सक्षम हा उपक्रम आपल्याला फार काळ चालवायचा नाही कारण येणाऱ्या काळात मौल्यवान बदल घडवणार आहोत. 64 शाळांमध्ये कला आणि क्रीडा शिक्षक लवकरच रुजू होणार असल्याचीही त्यांनी माहिती दिली. "लवकरच विद्यार्थ्यांना एकाच छताखाली सर्व प्रकारचे खेळ खेळता येतील आणि लवकरच यावर उपाययोजना करून काम सुरू करणार आहोत," असे श्री सिंह यांनी सांगितले.

## नफ्याच्या आमिषाने १८ लाखांची फसवणूक

**तळेगाव दाभाडे :** आमच्या कंपनीत गुंतवणूक केल्यास जादा परतावा मिळेल, असे अमिष दाखवून एका नागरिकाची १८ लाख १२ हजार रुपयांची फसवणूक केली. ही घटना मावळ तालुक्यातील तळेगाव दाभाडे येथे घडली. राकेश नारायणसिंग चौधरी (वय ४५, रा. तपोधाम कॉलनी, तळेगाव दाभाडे) यांनी याप्रकरणी तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी एका अज्ञात महिलेच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# चलो वस्ती संपर्क अभियानाला चांगला प्रतिसाद



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भाजपा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्रात दि.26 एप्रिल व 27 एप्रिल या दिवशी 'गाव-वस्ती संपर्क अभियान' राबविण्याच्या बाबत सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार आमदार अमित गोरखे यांच्या उपस्थितीत पिंपरी विधान मतदार संघात चलो वस्ती संपर्क अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आमदार अमित गोरखे यांनी पिंपरी विधानसभा मतदारसंघांमध्ये भारतीय जनता पक्षाच्या वतीने चलो वस्ती संपर्क अभियान राबविण्यात आला. दापोडी, फुगेवाडी, कुंदननगर, सिद्धार्थनगर, संजय नगर, गणेशनगर, सुंदर बाग कॉलनी, एसटी वर्कशॉप, या भागामध्ये प्रामुख्याने या अभियान राबविण्यात आले.


**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ याच्या कलम १९(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ३८९/२०२४/२६४

**जाहीर नोटीस**

**अर्जदार**
दि ऑनेक्स सी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः सर्वे नं. 186, वाकड, ता. हवेली, जि. पुणे - 411057
तर्फे, अध्यक्षः कु. पल्लवी जयप्रकाश शहारे, सचिव : श्री. अनुराग अशोक मायी
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
1. मे. वास्तुकल्प प्रमोटर्स अॅण्ड बिल्डर्स तर्फे भागीदार
श्री. हनुमंत शंकर भिलारे, श्री. नितीन उर्फ दत्तात्रय चिंधु कलाटे
रा. सर्वे नं.186, नवीन दत्त नगर, ओमेगा सिटी जवळ, वाकड, पुणे – 411057
2. श्री. शंकर नारायण भिलारे (मयत) तर्फे वारस
अ. पार्वती शंकर भिलारे, ब. सौ. जयश्री संजय कोतवाल
क. श्री. संतोष शंकर भिलारे, ड. श्री. हनुमंत शंकर भिलारे सर्व रा. थेरगाव, ता. मुळशी, जि. पुणे - 411033 इतर सहकरी संस्था
3. दि ऑनेक्स ए व बी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ताः सर्वे नं. 186, वाकड, ता. हवेली, जि. पुणे - 411057.

२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या दि ऑनेक्स सी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, पत्ताः सर्वे नं. 186, वाकड, ता. हवेली, जि. पुणे - 411057 या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र.३८९/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक ०९/०४/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने अॅड. अदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र.१ ते ३ गैरहजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र.१ ते ३ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः सुनावणी दिनांक २९/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ३ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायद्यातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक २५/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ याच्या कलम १९(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ५२२/२०२४/२६२

**जाहीर नोटीस**

**अर्जदार**
शुभम सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः स.नं. ८२/१अ/२/६ (पैकी), आदर्शनगर, नवी सांगवी, ता. हवेली जि. पुणे-४११०२७. तर्फे अध्यक्षः श्री. योगेश विजय पाटील, सचिव : श्री. सुहास आनंदराव जाधव
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
**विकसक/जागा मालक/ जाब देणार नं. १**
१. श्री. ज्ञानेश्वर महादेव जगताप पत्ता - ५६१, नाना पेठ, जि. पुणे- ४११०११. तर्फे, कु.मु. धारक, अ. श्री. किशोर शंकर गारवे, ब. श्री. राजेश शंकर गारवे दोघे रा. ६२६/२१, गारवे बिल्डींग, नवी सांगवी, ता. हवेली जि. पुणे- ४११०२७.

२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या शुभम सहकारी गृहरचना संस्था मर्यादित स.नं.८२/१अ/२/६ (पैकी), आदर्शनगर, नवी सांगवी, ता. हवेली जि. पुणे-४११०२७. या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ५२२ / २०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक १५/०४/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने अॅड. अदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ अ ब गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ अ ब यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः सुनावणी दिनांक ३०/०४/२०२५ रोजी दु.३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ अ ब यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायद्यातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक २५/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ याच्या कलम १९(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ८९/२०२५/२६५

**जाहीर नोटीस**

**अर्जदार**
पुष्पानंद प्रसुन पार्क सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः स.नं.9/12, सांगवी, ता. हवेली, जि. पुणे - 411027.
तर्फे, अध्यक्षः श्री. जगदिश अनंतराव यादव, सचिव : श्री. विक्रम रमेश खांडेकर
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
**विकसक / प्रवर्तक / जाब देणार नं. 1**
1. मे. प्रसुन्न असोसिएटस्, नोंदणीकृत भागीदारी संस्था,
ऑफिस पत्ता- प्रसुन्न आर्केड, गोकुळ हॉटेलसमोर, स्टेशन रोड, पिंपरी, पुणे - 411018.
तर्फे भागीदार, अ. श्री. पवन रघुमल वाधवानी
रा. प्लॉट नं. 156/ए, पिंपरी, ता. हवेली जि. पुणे - 411017.
ब. श्री. सुनिल नंदलाल चावला, रा.5, निलरत्न सोसायटी, मॉडेल कॉलनी, लकाकी रोड, शिवाजीनगर, जि. पुणे जागा मालक / मान्यता देणार / जागा मालक / जाब देणार नं. 2
2. ए. सौ. पुष्पा रमाकांत तरडे, बी. श्री. रमाकांत रामचंद्र तरडे,
सी. श्री. सतीश रमाकांत तरडे, डी. श्री. सुनिल रमाकांत तरडे
जाब देणार नं. 2 ए ते डी रा. 301, नाना पेठ, डोके तालीम जवळ, पुणे- 02.
इ. श्री. आनंदराव शंकरराव ढोरे, एफ. सौ. कुसुम आनंदराव ढोरे
जी. श्री. शशिकांत आनंदराव ढोरे, एच. श्री. राजेश आनंदराव ढोरे
जाब देणार नं. 2 इ ते एच, रा. ढोरेनगर, सांगवी, ता. हवेली, जि- पुणे - 411027.

२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या पुष्पानंद प्रसुन पार्क सहकारी गृहरचना संस्था मर्यादित स.नं.9/12, सांगवी, ता. हवेली, जि. पुणे - 411027. या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र.८९/२०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक २७/०३/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने अॅड. समृध्दी कोठारी हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ व २ गैरहजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ व २ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः सुनावणी दिनांक ३०/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ व २ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायद्यातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक २५/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ याच्या कलम १९(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ८२/२०२५/२६३

**जाहीर नोटीस**

**अर्जदार**
आर्यन रेसीडेन्सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता : सेक्टर- सी. डी. सी., प्लॉट नं. 100, चिखली, पुणे - 19
तर्फे, अध्यक्षः श्री. राहुल जर्नादन पाटील, सचिव : श्री. यतिन हनुमंत बंडगर
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
**प्रवर्तक / जाब देणार नं. 1**
1. मे. आर्यन बिल्डर अँड डेव्हलपर्स, तर्फे भागीदार
अ. श्री. केतन परसोत्तमभाई पटेल, ब. श्री. दिनेशभाई भाईलालभाई पटेल, क. श्री. शैलेश मनीभाई पटेल ड. श्री. चिंतन दामजीभाई भिमानी, इ. श्री. निलेश धनजीबाई पोकार, एफ. श्री. मुकेश चिमनभाई पटेल ऑफीस पत्ताः प्लॉट नं. 100, सी. डी. सी., चिखली, पीसीएनडीए, पुणे- 19
अ.क्र.4 तर्फे कुलमुखत्यार म्हणून अ.क्र. 1
जागा मालक / जाब देणार नं. 2
2. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण निगडी, पुणे - 44 (पुर्वीची) (आताची) पिंपरी चिंचवड महानगर पलिका, पिंपरी, पुणे-411018, तर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी
भाडेपट्टाधारक / मान्यता जाब देणार नं. 3
3. मे. काळभोर- गायकवाड असोसिएटस तर्फे भागीदार
अ. श्री. राजेश गुलाब काळभोर, ब. श्री. प्रविण प्रल्हाद गायकवाड
पत्ताः जाधव चेंबर्स, पहिला मजला, ऑफीस नं. 3, मुंबई पुणे रोड, आकुर्डी, पुणे - 411035
4. मे. आई माता डेव्हलपर्स तर्फे भागीदार, श्री. पुखराज हंसाजी चौधरी,
अ.क्र.3 तर्फे कुलमुखत्यार म्हणून अ.क्र. 4.

२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या आर्यन रेसीडेन्सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित सेक्टर- सी. डी. सी., प्लॉट नं. १००, चिखली, पुणे - १९ या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र.८२/२०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक २७/०३ /२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने अॅड. अदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ४ गैरहजर. गैरअर्जदार/ जमिन मालक क्र. १ ते ४ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः सुनावणी दिनांक ३०/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ४ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायद्यातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक २५/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

संपादकीय विशेष

# देशी वाहन उद्योग जोमाने बहरतोय...

भारत सध्या जगातील चौथा सर्वात मोठा वाहन उत्पादक देश आहे. २०२३-२४ मध्ये भारतात २.८ कोटींहून अधिक वाहने तयार झाली. तथापि, जागतिक ऑटो पार्टसच्या व्यापारात भारताचा वाटा सध्या केवळ तीन टक्के (सुमारे २० अब्ज डॉलर) आहे. याचा अर्थ भारतीय उद्योगवाढीसाठी भरपूर वाव आहे. 'नीती' आयोगाच्या अहवालानुसार, २०३० पर्यंत उत्पादन १४५ अब्ज डॉलर, निर्यात ६० अब्ज आणि ऑटो पार्टसच्या व्यापाराचा हिस्सा आठ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे लक्ष्य आहे. अहवालात असेही म्हटले आहे की इलेक्ट्रिक वाहनांच्या वाढत्या वापरामुळे बॅटरी, सेमीकंडक्टर आणि प्रगत सामग्रीची मागणी झपाट्याने वाढत आहे. एकटा चीन या वर्षामध्ये आठ दशलक्षापेक्षा जास्त 'ईव्ही' तयार करेल, तर युरोपीय महासंघ आणि अमेरिकादेखील 'ईव्ही' वाहनांसाठी प्रोत्साहन योजना आखत आहेत. एआय, रोबोटिक्स, डिजिटल ट्विन्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज यासारख्या नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाहननिर्मिती प्रक्रिया स्मार्ट आणि कार्यक्षम बनवत आहे. जर्मनी आणि दक्षिण कोरियासारखे देश स्मार्ट फॅक्टरी स्पेसमध्ये आधीच आघाडीवर आहेत. आज अनेक जागतिक ऑटोमोबाईल कंपन्या भारतातील स्मार्ट कारखान्यांमध्ये गुंतवणूक करत आहेत. केंद्र सरकारच्या 'फेम', 'पीएम-ई ड्राईव्ह' आणि 'पीएलआय'सारख्या योजनांतर्गत आतापर्यंत 66 हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक मदत देण्यात आली आहे. ती इलेक्ट्रिक वाहने आणि स्थानिक उत्पादनाला प्रोत्साहन देत आहे. योग्य रणनीती अवलंबल्यास भारत जगाला पुढील पिढीच्या 'मोबिलिटी सोल्यूशन्स'चा प्रमुख पुरवठादार बनवू शकतो, असे 'नीती'च्या अहवालात म्हटले आहे.

भारताचे ऑटोमोबाईल क्षेत्र आज खूप वेगाने वाढत आहे. तो देशाच्या अर्थव्यवस्थेचा एक मजबूत भाग बनला आहे. सरकारच्या 'मेक इन इंडिया' योजनेने त्याला नवी उंची दिली आहे. २०२३-२४ मध्ये भारताने २८ दशलक्ष वाहनांची निर्मिती केली. हा मोठा विक्रम आहे. आता भारत हे जगातील इलेक्ट्रिक वाहनांचे (ईव्ही) प्रमुख केंद्र बनत आहे. भारताच्या ऑटोमोटिव्ह आणि मोबिलिटी क्षेत्राने या वर्षी जानेवारी-मार्च तिमाहीमध्ये १.५ अब्ज डॉलर किमतीचे २९ सौदे नोंदवले. 'ग्रँट थॉर्नटन इंडिया'च्या अहवालानुसार 'आयपीओ' आणि 'क्यूआयपी' वगळता या क्षेत्राने खंडांमध्ये २७ टक्के वाढ नोंदवली. २०२४ च्या चौथ्या तिमाहीपासून हे मूल्य १९१ टक्क्यांनी वाढले आहे. ते ५०९ दशलक्ष डॉलरवरून १.४ अब्जपर्यंत वाढले आहे. ही वाढ धोरणात्मक आणि आर्थिक गुंतवणुकीद्वारे झाली. त्यात एक अब्ज खासगी इक्विटी कराराचा समावेश असून इलेक्ट्रिक वाहने (ईव्ही), ऑटोटेक आणि सेवा (मास)सारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये वाढते स्वारस्य पहायला मिळत आहे.

भारताच्या ऑटोमोटिव्ह आणि मोबिलिटी सेक्टरमध्ये एक मोठे परिवर्तन घडत आहे. त्याद्वारे विद्युतीकरण, डिजिटल इंटिग्रेशन आणि टिकाऊपणावर भर दिला जात आहे. जागतिक व्यापार गतीशीलता आणि पुरवठा साखळीत अडचणी असूनही गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास मजबूत राहिला आहे. गेल्या तिमाहीमधील 'डील व्हॉल्यूम' आणि मूल्यांमधील मजबूत वाढीवरून ते दिसून येते. भारतीय वाहन उद्योगाने स्पर्धात्मक राहण्यासाठी नवकल्पना, धोरणात्मक भागीदारी आणि मूल्यवर्धित ऑफर, विशेषत: 'ईव्ही', ऑटो घटक आणि पुढच्या पिढीतील 'मोबिलिटी सोल्यूशन्स' यासारख्या क्षेत्रात दुप्पट काम केले पाहिजे. २०२५ च्या पहिल्या तिमाहीमध्ये भारताच्या ऑटोमोटिव्ह आणि मोबिलिटी सेक्टरमध्ये वाढ होत राहिली आणि ३५९ दशलक्ष डॉलर किमतीचे ९ सौदे नोंदवले गेले. हे सलग तिसऱ्या तिमाहीमधील वाढ दर्शवते. ऑटोमोबाईल क्षेत्र हा भारताच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहे. देशाच्या जीडीपीमध्ये ते सहा टक्के योगदान देते. याचा अर्थ भारताच्या एकूण कमाईमध्ये त्याचा मोठा वाटा आहे. या क्षेत्राचे उत्पन्न २४० अब्ज डॉलर्स म्हणजे अंदाजे २० लाख कोटी रुपये आहे. त्यातून तीन कोटी लोकांना रोजगार मिळतो. ४२ लाख लोक यात थेट काम करतात आणि २.६५ कोटी लोक इतर मार्गांनी, जसे की दुकाने किंवा वाहतुकीशी संबंधित आहेत. वाहनांचे सुटे भाग बनवण्याचे कामही खूप महत्त्वाचे आहे. हा उद्योग जीडीपीच्या २.३ टक्के योगदान देतो. त्यात १५ लाख लोक काम करतात. २०२३-२४ मध्ये सुट्या भागांचे उत्पन्न ६.१४ लाख कोटी रुपये होते. त्यापैकी ५४ टक्के भाग भारतातील वाहन उत्पादक कंपन्यांना देण्यात आले. १८ टक्के भाग परदेशात पाठवले गेले. यावरून भारताचे ऑटोमोबाईल क्षेत्र देशातच नव्हे, तर जगभरात मजबूत होत असल्याचे दिसून येते.

आता भारतात फक्त पेट्रोल आणि डिझेलची वाहने तयार होत नाहीत. इलेक्ट्रिक वाहनांवरही भर आहे. ऑगस्ट २०२४ पर्यंत ४४ लाखांहून अधिक इलेक्ट्रिक वाहनांची नोंदणी झाली आहे. त्याचा बाजार हिस्सा ६.६ टक्के आहे. यावरून लोक आता नवीन तंत्रज्ञान असलेल्या वाहनांना पसंती देत असल्याचे दिसून येते. भारतीय वाहने आणि त्यांचे पार्टस आता जगभर विकले जातात. २०२३-२४ मध्ये भारताने परदेशात ४५ लाख वाहनांची निर्यात केली. सुटे भाग विक्री २१.२ अब्ज रुपयांपर्यंत पोहोचली. हे क्षेत्र दर वर्षी ८.६३ टक्क्यांच्या आसपास वाढत आहे. तज्ज्ञांच्या मते २०२६ पर्यंत ते ३० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचू शकते. वाहनांचे बहुतेक सुटे भाग युरोप, उत्तर अमेरिका आणि आशियामध्ये विकले जातात. गेल्या वर्षी भारताने या व्यापारात ३०० दशलक्ष डॉलरपेक्षा अधिक नफा कमावला. सरकारी योजनांमुळे ऑटोमोबाईल क्षेत्राला बळकटी आली. 'मेक इन इंडिया' योजनेने त्याला नवी दिशा दिली. याशिवाय देशात १०,९८५ चार्जिंग स्टेशन्स उभारण्यासही मान्यता देण्यात आली. 'पीएम इलेक्ट्रिक ड्राइव्ह'मुळे ईव्ही, ई-ट्रक, ई-बस आणि चार्जिंग स्टेशन्सच्या उभारणीला २०२४ ते २०२६ पर्यंत समर्थन मिळेल. 'पीएम ई-बस सेवा'योजनेंतर्गत २०२४-२९ पर्यंत ३८,००० इलेक्ट्रिक बस चालवण्याची योजना आहे. सरकारने इलेक्ट्रिक वाहनांवरील करही १२ टक्क्यांवरुन पाच टक्के केला आहे. घरे आणि कार्यालयांमध्ये चार्जिंग स्टेशन बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे. २०२० ते २०२४ या कालावधीमध्ये भारतातील ऑटोमोबाईल क्षेत्रात ३६ अब्ज डॉलर इतका विदेशी निधी येणे अपेक्षित आहे. भारतीय वाहन कंपन्या सात अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करणार आहेत. हा पैसा इलेक्ट्रिक मोटर्स आणि ऑटोमॅटिक ट्रान्समिशनसाठी वापरला जाईल. यामुळे भारताला परदेशातून कमी माल घ्यावा लागणार आहे. म्हणजेच या क्षेत्राबद्दल जगाचा भारतावर विश्वास बसला आहे.

# दहशतवादाविरुद्ध सर्व राष्ट्रांनी एकत्र यावे

जागतिक रा
श्याम ठाणेदार
पुणे



**दहशतवादाची सर्वाधिक झळ भारतालाच बसली आहे. दहशतवादामुळे भारताने दोन पंतप्रधान गमावले आहेत. भारतावर झालेला २६ / ११ चा दहशतवादी हल्ला तर संपूर्ण जगाने पहिला आहे. भारताला जेंव्हा जेंव्हा दहशतवादाची झळ बसली तेंव्हा तेंव्हा संपूर्ण जगाने एकत्र येऊन दहशतवादाचा मुकाबला करावा असे आव्हान भारताने जगाला केले मात्र जगाने त्याला प्रतिसाद दिला नाही त्यामुळे दहशतवाद्यांचे धारिष्ट्य वाढत गेले. दहशतवाद्यांनी केवळ भारतालाच नाही तर अमेरिकेसारख्या महासत्तेला देखील तडाखा दिला आहे.**

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २८ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला. या हल्ल्याने भारतातच नव्हे जगभर जगभर खळबळ माजली. या हल्ल्याची जशी भारतात निंदा होत आहे तशीच निंदा जगभर होत आहे. संपूर्ण जग या भ्याड हल्ल्याने हादरून गेले आहे. जगाला हादरवून सोडणाऱ्या या घटनेचे तीव्र पडसाद उमटले आहेत. भारताने दहशतवाद्यांची कोंडी करण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत. इतकेच नाही तर या हल्ल्यास ठोस प्रतिउत्तर देण्याची तयारीही भारताने सुरू केली आहे. जर भारताने या हल्ल्यास जशास तसे उत्तर दिले आणि दहशतवाद्यांचे अड्डे असलेल्या पाकव्याप्त काश्मीरमध्ये सैन्य घुसवले किंवा सार्जिकल स्ट्राईक केला तर जग भारताच्या बाजूने उभे राहील का ? भारताच्या कारवाईला जगाचा पाठिंबा मिळेल का ? असा प्रश्न विचारला जात आहे जर भारताने दहशतवाद्यांविरोधात कारवाई केली तर भारताला जगाचा पाठिंबा निश्चितपणे मिळेल कारण दहशतवादाने फक्त भारतच नाही तर सारे जग पोळून निघाले आहे. केवळ भारतच नाही जगातील सर्वच प्रमुख देशांना दहशतवादाने ग्रासले आहे. सर्व प्रमुख देशांत दहशतवाद्यांनी केंव्हांना केंव्हा हल्ला केला आहे. मागील वर्षीच रशियाच्या मॉस्को शहरात दहशतवाद्यांनी मोठा हल्ला घडवून आणला होता.

रशियाच्या निवडणुकीत पुतीन यांचा एकतर्फी विजय झाल्याच्या काही तासातच रशियाची राजधानी असलेल्या मॉस्को शहरात मोठा दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यात रशियाच्या १३३ निरपराध नागरिकांना जीव गमवावा लागला होता. या हल्ल्यात हजारो नागरिक जखमी झाले होते. इसीस या दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली होती. पुतीन यांनी पाचव्यांदा विजय मिळवताच दहशतवाद्यांनी त्यांना ही भेट दिली होती. रशियात झालेला या भीषण हल्ल्याने संपूर्ण जगात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते कारण इसीसच्या दहशतवाद्यांनी थेट मॉस्को शहरात घुसून हा हल्ला केला होता. रशियाच्या पोलादी सुरक्षेला भेदून दहशतवाद्यांनी हा हल्ला केल्याने रशियाच्या सुरक्षेव्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते जर राशिया सारख्या अभेद्य सुरक्षा व्यवस्था असलेल्या देशात इतका मोठा दहशतवादी हल्ला होऊ शकतो तर मग जगातील कोणत्याची देशात घुसून दहशतवादी हल्ला करू शकतात अशीच चर्चा जगभर होऊ लागली होती आणि त्याची प्रचिती अवघ्या वर्षभरात आली. पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी भारतीय हद्दीत घुसून भारतीय पर्यटकांना ठार केले. वर्षभराच्या अंतरात जगातील प्रमुख देश असलेल्या या दोन्ही देशात झालेल्या या दहशतवादी हल्ल्यांनी जगभर भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जगात दहशतवाद पुन्हा डोके वर काढत आहे हेच या हल्ल्याने सिद्ध होत आहे अर्थात दहशतवाद्यांनी आताच हल्ले सुरू केले आहेत असे नाही. या आधीही दहशतवाद्यांनी अनेक देशात दहशतवादी हल्ले केले आहेत.

भारत तर नेहमीच दहशतवाद्यांच्या हिट लिस्टवर राहिला आहे. दहशतवादाची सर्वाधिक झळ भारतालाच बसली आहे. दहशतवादामुळे भारताने दोन पंतप्रधान गमावले आहेत. भारतावर झालेला २६ / ११ चा दहशतवादी हल्ला तर संपूर्ण जगाने पहिला आहे. भारताला जेंव्हा जेंव्हा दहशतवादाची झळ बसली तेंव्हा तेंव्हा संपूर्ण जगाने एकत्र येऊन दहशतवादाचा मुकाबला करावा असे आव्हान भारताने जगाला केले मात्र जगाने त्याला प्रतिसाद दिला नाही त्यामुळे दहशतवाद्यांचे धारिष्ट्य वाढत गेले. दहशतवाद्यांनी केवळ भारतालाच नाही तर अमेरिकेसारख्या महासत्तेला देखील तडाखा दिला आहे. भारत, रशिया, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, स्पेन, इस्राईल, जपान, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया इतकेच नाही तर पाकिस्तानला देखील दहशतवादाची झळ बसली आहे. मध्यंतरी काही काळ शांत असलेले दहशतवादी आता पुन्हा एकदा सक्रिय झाले आहेत.

दहशतवादी सर्वच देशात दहशतवादी कारवाया करीत आहे. त्यामुळे दहशतवाद ही आता एका देशाची समस्या राहिली नसून ती वैश्विक समस्या बनली आहे. दहशतवादापासून कोणताच देश अलिप्त राहू शकत नाही. त्यामुळे याचा मुकाबला सर्व देशांनी मिळून करायला हवा. भारताने दहशतवादाविरोधात कारवाई केली तर संपूर्ण जगाने भारताने पाठिंबा द्यायला हवा. दहशतवादा विरोधातील भारताच्या मोहिमेस जगाने पाठबळ द्यावे. दहशतवादा विरोधात संपूर्ण जगाने एक व्हायला हवे. जोवर दहशतवादाविरोधात संपूर्ण विश्व एक होत नाही तोवर दहशतवादाचा हा भस्मासूर रोखणे कठीण आहे. दहशतवादी म्हणजे मानवतेचे शत्रू आहेत. या शत्रूविरुद्ध लढण्यासाठी सर्व राष्ट्रांनी एक होणे ही काळाची गरज आहे.



## खेचाखेची

**सुटका नाही**

**अरेंज्ड मॅरेज म्हणजे ?**
.
**गुपचूप भांडी घासणे.**

**लव्ह मॅरेज म्हणजे ?**
.
**प्रेमाने भांडी घासणे.**
.
.
.
.
**पण भांडी घासावी लागतातच.**

## वेगळं काही

रशिया, बल्गेरिया, यूक्रेन, रोमानिया आणि माल्दोवासारख्या देशांमध्ये म ध्यंतरी नारिंगी रंगाचा बर्फ पडला होता. त्यावेळी बर्फाच्या नारिंगी रंगाबद्दल तर्कवितर्कांना उधाण आलं होतं. सहारा वाळवंटातून येणाऱ्या वादळामधल्या वाळूचा पावसाच्या पाण्याशी संपर्क आल्यामुळे बर्फाचा रंग नारिंगी होत असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. अशी घटना पाच वर्षातून एकदाच घडते. पण त्यावेळी आक्रित घडलं. सहा महिन्यांमध्ये दोनदा असं घडलं होतं. या बर्फात वाळूचं प्रमाण आधीपेक्षा अधिक होतं. बर्फ तोंडात टाकल्यावर वाळू लागत असल्याची तक्रार अनेक लोक करत होते. पण एकूणच या प्रकाराने लोकांना चर्चेसाठी एक विषय मिळाला आणि सोशल मिडिया त्या फोटोंनी भरून गेला.

## स्मार्ट टॉक

## बॅग निवडताना...

सुट्टीच्या या काळात प्रवासाला निघताना आपल्या लूकला नवं परिमाण देणारी बॅग व्यक्तिमत्त्वही अधोरेखित करत असते. सध्याचा पर्यटनाचा हंगाम लक्षात घेता वेगवेगळ्या पद्धतीच्या बॅग्ज बाजारात आल्या आहेत. त्यांच्याविषयी...



✻ डबल्स बॅग – ही बॅग बॉक्सच्या आकारात असून सॉफ्ट असते. हँडल आणि स्ट्रीप्स असल्याने पकड चांगली असते. या दोन्हींमुळेच बॅग हवी तशी ॲडजेस्ट करता येते. ✻ मेसेंजर ट्रॅव्हल बॅग – या बॅग्ज मध्यम आकाराच्या असतात. बरेच कप्पे असल्याने त्यात छोट्या आकाराच्या वस्तू व्यवस्थित ठेवता येतात. ✻ डबल कंपार्टमेंट ट्रॅव्हल बॅग – प्रवासात भरपूर सामान बरोबर असेल तर ही बॅग सोयिस्कर ठरू शकते. लाईटवेट असल्याने त्रासही होत नाही. इस्त्री केलेले कपडे खराब होऊ नयेत म्हणून या बॅगेत नेट डिव्हायडिंग पॅडची सुविधा असते. ✻ लेदर बॅग्ज – ड्युरेबल आणि एलिगंट बॅगच्या शोधात असाल तर हा पर्याय सर्वोत्तम आहे. महत्त्वाचं म्हणजे या बॅगमध्ये अवजड सामान सहज कॅरी करता येतं. लेदर बॅग्जमध्ये २५० पेक्षा अधिक व्हरायटी उपलब्ध आहेत. या बॅग्जची किंमत तीन हजारापासून सुरू होते.




## राशीभविष्य

- **मेष** : विचारांची दिशा योग्य ठेवा. अनुभवींचा सल्ला कामी येईल. जुनी दुखणी पुन्हा उद्भवतील.
- **वृषभ** : विवाहाच्या प्रयत्नांना वेग येईल. दिलासादायक घटना घडतील. छोटा–मोठा प्रवास करावा लागेल.
- **मिथुन** : कर्ज प्रकरणं मार्गी लागतील. मुलांची मनाजोगी प्रगती होईल. धार्मिक कार्याचं समाधान लाभेल.
- **कर्क** : खर्चात काटकसर करावी. व्यवसायात अचानक गुंतवणूक करावी लागेल. बाकी चिंता नसावी.
- **सिंह** : कला–गुणांना उत्तम संधी लाभतील. दूरचे प्रवास तुर्तास टाळावेत. वाहनाचा वापर जपून करावा.
- **कन्या** : महत्त्वपूर्ण षटना घडतील. आवश्यक खर्चाची तजवीज होईल. बेरोजगारांना दिलासा मिळेल.
- **तूळ** : महत्त्वाच्या भेटीने समाधान लाभेल. कर्तव्यात कसूर करू नये. लोकसंपर्क योग्यरित्या कामी येईल.
- **वृश्चिक** : अपेक्षित वार्ता कानी येईल. नोकरीत वरिष्ठांशी मतभेद संभवतात. प्रकृतीकडे वेळीच लक्ष द्यावं.
- **धनु** : अचानक धनलाभ संभवतो. कौटुंबिक सहलीचं समाधान लाभेल. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल.
- **मकर** : प्रियजनांच्या भेटी होतील. जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल. स्थापत्य क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **कुंभ** : आर्थिक व्यवहार विचाराने करावेत. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. थोरामोठ्यांच्या भेटी होतील.
- **मीन** : घरगुती प्रश्नांचा ताण राहील. व्यवसायात साधारण स्थिती राहील. विचारानं राहणं हिताचं ठरेल.

## सल्ला मोलाचा

## गर्दी टाळायची तर...

शाळांच्या सुट्यांमुळे एप्रिल–मे–जून या महिन्यांमध्ये फिरायला जाण्याचं प्रमाण बरंच जास्त असतं. सहाजिकच पर्यटनस्थळी खूप गर्दी झालेली असते. हॉटेल्सचे दर चढे असतात. समर व्हेकेशनच्या योजना आखत असाल तर गर्दी टाळण्यासाठी काय करता येईल याविषयी...

✻ गर्दी टाळण्यासाठी संबंधित पर्यटन स्थळानजिक असणाऱ्या कमी गर्दीची ठिकाणं हेरा. तिथे तिकीटांची आगाऊ नोंदणी करून ठेवा. गुगलवर 'पॉप्युलर टाईम्स' हे फीचर आहे. कोणत्या ठिकाणी कोणत्या वेळेत गर्दी असू शकते याची माहिती या फीचरमुळे मिळते. या वेळा टाळून तुम्ही जाऊ शकता. ✻ ऑफ सीझनला फिरायला जाणं हा गर्दी टाळण्याचा सर्वोत्तम मार्ग असतो. शक्य असेल तर पर्यटनाचं नियोजन ऑफ सीझनमध्ये करा. ते अधिक आनंददायी ठरेल. ✻ प्रमुख पर्यटन स्थळं टाळून हटके ठिकाणांची निवड करा. ऑफ बीट वॉकिंग टूरची निवड करता येईल. मोठ्या हॉटेलऐवजी कोपऱ्यातल्या छोट्या पण चांगल्या रेस्तराँमध्ये खा. खाजगी बीच तसंच कमी गर्दीची ठिकाणं शोधा.

## दिनविशेष

### २९ एप्रिल

- **१९३७** : नायलॉनचा संशोधक वॅलेस कॅरोथर्सची आत्महत्या.
- **२०१२** : ब्रिटनचे राजकुमार अँड्र्यू भारत दौऱ्यासाठी दाखल.
- **२०१३** : राज्य सरकारने सलग संप सुरू ठेवणाऱ्या प्राध्यापकांवर 'मेस्मा' कायद्याची छडी उगारण्याची तयारी सुरू केली.
- **२०१८** : अरुणाचल प्रदेशमध्ये डिजिटल तंत्र हाताशी धरून चीनचा 'तांत्रिक घुसखोरी' करण्याचा प्रयत्न. या भागात नेटवर्क येताच 'वेलकम टू चायना' असा संदेश असल्याचा अनुभव.

## महत्त्वपूर्ण काही

## अशी असतात नखं...

मित्रांनो, नखांची निर्मिती 'केराटिन' या घटकापासून होते. केराटिनपासूनच केस आणि त्वचेच्या बाह्य आवरणाचीही निर्मिती होत असते. आपण नखं कापतो तिथून त्यांची वाढ होते असा आपला समज असतो. पण प्रत्यक्षात बोटांशी जोडलेल्या भागापासून नखांची वाढ होत असते. केसांप्रमाणे नखंही छोट्या रक्तवाहिन्यांशी जोडलेली असतात. त्यातील रक्तामुळे नखांना फिकट गुलाबी रंग येतो. नखांच्या पेशी त्वचेच्या खाली वाढत असतात. प्रत्येक पेशींचं विभाजन होऊन त्यांची संख्या वाढत जाते. नव्या पेशी जुन्या पेशींना त्वचेच्या पृष्ठभागावर ढकलतात. बाहेर पडल्यानंतर पेशींची संख्या वाढत नाही. त्यामुळे त्या मृत होतात. अशा मृत पेशी वाढत असल्यामुळे नखांची वाढ होत राहते. पायांच्या बोटांपेक्षा हातांच्या बोटांची नखं वेगाने वाढतात. बोटांना नखं जोडलेली असतात त्या भागाला क्युटिकल्स असं म्हटलं जातं. नवं नख तसंच बोटाचा आतला भाग यांच्या संरक्षणाचं काम क्युटिकल्स करतात. नखांमुळे बोटांचं रक्षण होतं. असं असलं तरी दर आठवड्याला नखं कापायला हवी. नखांमधली घाण स्वच्छ करायला हवी. यामुळे नखांचं आरोग्य टिकून राहतं.

## पंचांग

**मंगळवार, २९ एप्रिल २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
वैशाख शु. २, नक्षत्र : कृत्तिका,
चंद्रराशी : वृषभ, योग : सौभाग्य
सूर्योदय : ६.१४, सूर्यास्त : ६.५८

## फॉरवर्डस

**प्रिय व्यक्तीची आठवण आली की क्षणांना जणू पंख फिटतात. सगळा काळ नजरेसमोर तरळून जातो...**


सही वक्त पर करवा देंगे हदों का अहसास.

कुछ तालाब खुद को समुन्दर समझ बैठे हैं।

## आरोग्यमंत्र

## उशिरा जेवल्यास...

जेवणाच्या वेळांमध्ये अनियमीतता असल्यास अनेक प्रकारच्या समस्यांचा सामना करावा लागू शकतो. रात्रीचं जेवण उशिरा घेतल्यामुळे शरीराच्या नैसर्गिक पचनक्षमतेवर दुष्परिणाम होतो. म्हणूनच डाएटचं तंत्र पाळून योग्य वेळी जेवण घ्यायला हवं. उशिरा खाल्ल्याच्या दुष्परिणामांची ही चर्चा...



✻ तुम्ही उशिरा जेवता तितक्या जास्त कॅलरी पोटात ढकलता. उशिरा जेवल्यावर शारीरिक हालचाल होत नाही. यामुळे कॅलरी खर्च होत नाहीत. उशिरा जेवल्यावर झोपही उशिरा येते. यामुळे दुसऱ्या दिवसाच्या कामावर परिणाम होतो. त्यामुळे लवकर झोपून लवकर उठण्यासाठी लवकर जेवायला हवं. ✻ रात्री उशिरा जेवणं आणि सकाळी निवांत उठणं यामुळे चयापचय क्रियेवरही परिणाम होतो. चयापचय क्रिया बिघडली की वजन वाढायला सुरूवात होते. ✻ प्रत्येक जेवणानंतर पचनाच्या प्रत्येक टप्प्यासाठी शरीराला विशिष्ट वेळ हवा असतो. पण उशिरा जेवल्यानंतर आपण लगेच झोपतो. यामुळे पोटातलं आम्ल छातीच्या बाजूला सरकतं. सहाजिकच छातीत जळजळ होण्यासारख्या समस्या उद्भवतात. ✻ तुम्ही रात्री काहीही खाल्लं तरी याचा परिणाम पचनक्रियेवर होणारच. यामुळे इतरही काही समस्या निर्माण होऊ शकतील. म्हणूनच सूर्यास्तापूर्वी जेवण्याचं धोरण ठेवा.

## स्मार्ट शॉपिंग

उन्हाळ्यात घामाने पायांनाही दुर्गंधी येते. या समस्येवर परिणामकारक उपाय...

✻ पायांना दुर्गंध येत असेल तर आवर्जून बॅक्टेरियाविरोधी साबणाचा वापर करा. बोटांमधल्या जागा स्वच्छ करा. पायांची नखं नियमित कापा. पाय धुतल्यानंतर टॉवेलने कोरडे करूनच बूट घाला. ✻ व्हिनेगर, मीठ, चहा आदी घटक पाण्यात घालून त्यात पाय बुडवून ठेवा. मीठाचा वापर करण्याआधी डॉक्टरांचा सल्ला घ्या. व्हिनेगर पाण्यात मिसळताना १:२ असं प्रमाण घ्या. कोमट पाण्यात तीन ते चार टी बॅग्ज घाला. यात पाय बुडवून बसा. ✻ नेहमी स्वच्छ आणि कोरडे मोजे घाला. एकदा घातल्यानंतर ते स्वच्छ धुवा.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

पान १ वरून

## महाराष्ट्र देशाचे नेतृत्व करेल

वाहून जाणारे पाणी तसेच पश्चिम घाटातून समुद्रात वाहून जाणारे पाणी उजनी धरण व मराठवाड्यात वळविण्यात येणार आहे. यावर शासन काम करीत आहे. त्यामुळे भविष्यात मराठवाडा निश्चितच दुष्काळमुक्त होणार आहे. समृद्धी महामार्ग नंतर राज्यात नागपूर ते गोवा शक्तिपीठ महामार्गाचे निर्माण करण्यात येणार आहे. महाराष्ट्र हे नेहमी भविष्यासाठी रेडी असणारे राज्य आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री म्हणाले, राज्यात गुंतवणूकदारांना सोयी सुविधा मिळण्यासाठी व गतीने गुंतवणूक येण्यासाठी इज ऑफ डूइंग बिजनेस मध्ये राज्य मोठी झेप घेत आहे. २०२९ मध्ये महाराष्ट्र इज ऑफ डूइंग बिजनेस मध्ये पहिला असेल. गुंतवणूकदारांच्या सुविधेसाठी मैत्री पोर्टल विकसित करण्यात आले आहे. या माध्यमातून सिंगल विंडो सिस्टीम कार्यान्वित करण्यात आली आहे. गुंतवणूकदारांना सिंगल विंडो सिस्टीममुळे उद्योग स्थापन करण्यास सुलभता येत आहे.

दळणवळणाच्या सोयी सुविधांचा होणा-या विकासामुळे राज्यात मालवाहतूक गतीने करण्यात येत आहे. नागपूरपर्यंत आठ तासांमध्ये जवाहरलाल नेहरू बंदरापासून जाता येते. वाढवण बंदरामुळे यामध्ये आणखी गतिमानता येणार आहे. नागपूर येथे कार्गो हब विकसित करण्यात आले आहे. यासोबतच पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरही कार्गो हब विकसित करण्यात येत आहे, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी विकासाचा आलेख मांडला.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ तसेच अटल सेतू यामुळे तिस-या मुंबईचे निर्माण होणार असल्याचे सांगत मुख्यमंत्री म्हणाले, या भागात नवीन एज्युसिटी निर्माण करण्यात येत आहे. जगभरातील विविध नामांकित विद्यापीठे या परिसरात आपले शैक्षणिक दालन उघडणार आहे. त्यासोबतच हेल्थ सिटी, इनोवेशनन सिटीचे निर्माणही करण्यात येत आहे. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर सौर ऊर्जा निर्मिती करण्यात येत आहे. कृषी क्षेत्राचे १६००० मेगावॅटचे वीज पूर्णपणे सौर उर्जेवर निर्माण करण्यात येणार आहे. सध्या या क्षेत्रात २१ टक्के राज्याची क्षमता असून २०३० पर्यंत ती ५२ टक्के पर्यंत नेण्यात येणार आहे.

## राज्यात 'हाय अलर्ट'!

परतण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान मध्य आणि पश्चिम रेल्वे मार्गावर एकूण १३९ रेल्वे स्थानके आहेत, जिथून दररोज सुमारे ३,२०० लोकल गाड्यांची वाहतूक होते. यामुळे दररोज सुमारे ७५ ते ८० लाख प्रवासी प्रवास करतात. याशिवाय, शेकडो लांब पल्ल्याच्या गाड्याही चालवल्या जातात, ज्यामध्ये लाखो प्रवासी प्रवास करतात.

सीएसएमटीवर सुरक्षा यंत्रणा तैनात

मुंबईतील दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या आणि देश-विदेशातून येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेसाठी रेल्वे पोलीसही सतर्क झाले आहेत. मुंबईतील रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी स्थानकांमध्ये आणि परिसरात सुमारे १० हजार सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे प्रभावी देखरेख ठेवली जात आहे.

रेल्वे आयुक्तालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व स्थानकांवर प्रवाशांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही प्रणालीद्वारे सतत निरीक्षण केले जात आहे. सीएसएमटी आणि पुणे स्थानकांवर सुरक्षा यंत्रणा अलर्टवर आहेत, आरपीएफ, जीआरपीएफ, डॉग स्क्वॉडकडून गस्तीला सुरूवात झाली आहे. पहलगामच्या हल्ल्यानंतर पुण्यातील लक्ष्मी रोडवर रस्त्यावर पाकिस्तानच्या झेंड्याचे पोस्टर चिकटवत निषेध करण्यात आला आहे. या बाबतचा व्हीडीओही व्हायरल झाला आहे. .

# दहशतवाद्यांना इतरत्र हलवले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताच्या या भूमिकेमुळे पाकिस्तानी लष्कर ात खळबळ उडाली आहे. त्याला बालाकोटसारखा हवाई हल्ला आणि इतर प्रकारच्या प्रत्युत्तराचा धोका आहे. या पार्श्वभूमीवर पाक लष्कराने पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांना लाँचिंग पॅड रिकामे करण्यास सांगितले आहे. गुप्तचर सूत्रांच्या हवाल्याने माध्यमातील वृत्तानुसार, पाकिस्तानी लष्कराने दहशतवाद्यांना बंकरमध्ये शिफ्ट होण्याचे आदेश दिले आहेत.

भारतीय सुरक्षा यंत्रणांनी पाकव्याप्त काश्मीरमध्ये अनेक सक्रिय लाँचिंग पॅड ओळखल्यानंतर लगेचच पाकिस्तानी लष्कराने हे पाऊल उचलले आहे. त्याअंतर्गत दहशतवाद्यांच्या तळांमध्ये फेरबदल करण्यात आले आहेत. केळ, सार्डी, दुधनियाल, अथमुकाम, जुरा, लिपा, पाचचिबन, फॉरवर्ड काहुता, कोटली, खुईरत्ता, मांढर, निकेल, चमनकोट आणि जानकोट या महत्त्वाच्या ठिकाणांहून दहशतवाद्यांना हलवले जात असल्याची माहिती गुप्तचर यंत्रणांकडून मिळाली आहे.

हे लाँच पॅड दीर्घकाळापासून दहशतवाद्यांचे प्रमुख आश्रयस्थान म्हणून काम करत आहेत, जेथे दहशतवाद्यांना केवळ प्रशिक्षणच दिले जात नाही तर नियंत्रण रेषा ओलांडून जम्मू-काश्मीरमध्ये पाठवले जाते. गेल्या आठवड्यात सुरक्षा दलांनी पाकव्याप्त काश्मीरमध्ये ४२ दहशतवादी तळ आणि प्रशिक्षण केंद्रे शोधून काढली होती आणि तेव्हापासून ते बारीक लक्ष ठेवून होते, अशी माहिती सूत्रांनी दिली. गुप्तचर सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या पाकव्याप्त काश्मीरमधील विविध छावण्यांमध्ये सुमारे १५० ते २०० प्रशिक्षित दहशतवादी तैनात आहेत, जे घुसखोरीच्या प्रतीक्षेत आहेत.

पाकव्याप्त काश्मीरमध्ये अचानक झालेल्या फेरबदलावरून पाकिस्तानी लष्कर केवळ आपल्या दहशतवादी पायाभूत सुविधांचे रक्षण आणि संरक्षण करण्याचा प्रयत्न करत नाही, तर भारताकडून होणारा संभाव्य हल्ला टाळण्याचे मार्गही शोधत असल्याचे दिसून येते. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर दोन्ही देशांमध्ये प्रचंड तणाव आहे.

# स्व. पतंगराव कदम यांच्या कन्या भारती लाड यांचे निधन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** काँग्रेसचे दिवंगत नेते डॉ. पतंगराव कदम यांची कन्या भारती लाड यांचं निधन झालं. वयाच्या ५३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. अल्पशा आजाराने त्यांचं निधन झाल्याची माहिती समोर येत आहे. सांगलीत सुरुवातीला उपचार केल्यानंतर भारती यांना पुण्याला नेण्यात आलं. पुण्यात गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र त्यांची प्रकृती खालावत गेली आणि सोमवारी सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली.

डॉ. पतंगराव कदम यांनी भारती यांच्या नावानेच देशभरात शैक्षणिक आणि इतर संस्था उभारल्या आहेत. भारती लाड यांचा जन्म १८ जुलै १९७२ रोजी कडेगाव इथल्या सोनसळमध्ये झाला. डॉक्टर पतंगराव कदम यांनी भारती यांच्या नावानेच अनेक संस्था उभारल्या. त्यांनीही वडिलांचा राजकीय आणि सामाजिक वारसा जपला होता. भारती शुगर, डॉ. पतंगराव कदम विद्या संकुल अशा संस्था उभा केल्या. महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी, महिलांना हक्काचं व्यासपीठ मिळावं यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भारती यांचा १९९३ मध्ये महेंद्र लाड यांच्याशी विवाह झाला होता. महेंद्र लाड हे जिल्हा बँकेचे संचालक आणि रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष आहेत. भारती लाड यांनी दोन आठवड्यांपूर्वी चक्कर आली होती. त्यानंतर सांगलीतील भारती हॉस्पिटलमध्ये त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आलं होतं.

## भारतविरोधी १६ यूट्यूब चॅनेलवर बंदी

निशस्त्र पर्यटकांवर दहशतवाद्यांनी हल्ला केला. या हल्ल्यामागे पाकिस्तानातील दहशतवादी संघटनांचा हात असून, केंद्र सरकारकडून पाकिस्तानला कोंडीत पकडण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यानंतर आता भारताने पाकिस्तानी युट्युब चॅनेल्सवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे.

गृह मंत्रालयाच्या शिफारशींनुसार, जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर या चॅनेल्सवर जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी घटनेच्या पार्श्वभूमीवर भारत, भारताचे सैन्य आणि सुरक्षा संस्थांविरुद्ध प्रक्षोभक आणि संवेदनशील माहिती खोटी व दिशाभूल करणाऱ्या स्वरूपात पसरवल्याचा दावा करण्यात आला आहे.

बंदी घातलेल्या यूट्यूब चॅनेलच्या यादीत डॉन न्यूज, समा टीव्ही, एआरवाय न्यूज, बोल न्यूज आणि जिओ न्यूज यासारख्या प्रमुख चॅनेलचा समावेश आहे. तसेच इरशा भट्टी, रफ्तार, द पाकिस्तान रेफरन्स, समा स्पोर्ट्स, जीएनएन, उजैर क्रिकेट, उमर चीमा एक्सक्लुझिव्ह, आस्मा सिराजी, मुजीब फारूख, सुनो न्यूज आणि रझी नामा ही इतर यूट्यूब चॅनेल आहेत.

## पाकव्याप्त काश्मीर...

घ्यावा, असे मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केले. पिंपरी-काळेवाडी येथे पत्रकार परिषदेत ते बोलत होते. केंद्रीय राज्यमंत्री आठवले म्हणाले की, दहशतवाद्यांनी या आगोदर भारतीय सैन्य, काश्मिरी पंडित यांच्यावर हल्ले केले आहेत, मात्र आता त्यांनी पर्यटकांना लक्ष्य केले. त्यामध्ये २८ पर्यटकांचा मृत्यू झाला. त्यातील एका स्थानिक मुस्लिम घोडेस्वार व्यावसायिक तरुणाने दहशतवाद्यांना प्रतिकार केला असता, दहशतवाद्यांनी त्यालाही मारले. दहशतवाद्यांमध्ये हिंमत असेल तर त्यांनी भारतील लष्कराशी भिडावे.

## युक्रेनमध्ये तात्पुरत्या युद्धबंदीची घोषणा

हे पाऊल उचलले आहे. युद्धबंदीची घोषणा ही एक महत्त्वाची घटना आहे. पुतिन यांनी कोणत्याही युद्धबंदी कराराचा संबंध युक्रेनला पाश्चात्य शस्त्रास्त्रांचा पुरवठा थांबवण्याशी आणि देशाच्या एकत्रीकरणाच्या प्रयत्नांशी जोडला होता.

दोन्ही बाजूंनी मागील युद्धविराम करारांचे उल्लंघन केल्याचे आरोप असूनही, रशियाने युक्रेनला रशियाचे उदाहरण अनुसरावयाचे आवाहन केले आहे. विशेषतः, रशियन सरकारने इशारा दिला होता की युक्रेनने युद्धविरामाचे उल्लंघन केले तर रशिया पुरेसे आणि कार्यक्षमतेने प्रत्युत्तर देईल. या विधानाला न जुमानता, युक्रेनकडून त्वरित प्रतिसाद मिळाला नाही. यापूर्वी, युक्रेनने युद्धविराम प्रस्तावांवर प्रतिसाद देण्याची तयारी दर्शविली होती, परंतु दोन्ही बाजूंनी पूर्वीच्या युद्धविराम कालावधीत एकमेकांवर लष्करी कारवाया सुरू ठेवल्याचा आरोप केल्याने तणाव कायम राहिला.

## २८ लाखांच्या बनावट नोटा जप्त

१११६ ए-४ आकाराच्या कागदांवर २ हजार २३२ बनावट नोटा (मूल्य २२.३२ लाख रुपये), प्रिंटर, शाई, कोरे कागद व इतर साहित्य असा मोठा मुद्देमाल जप्त केला. याशिवाय नरेशच्या कारमध्ये बनावट २०० रुपयांच्या ६४८ नोटा, ५०० रुपयांच्या ३ नोटा मिळाल्या आहेत. बनावट नोटा बाजारात चालवण्यासाठी टोळक्याने मोठा कट आखल्याचे उघड झाले आहे.

आरोपी प्रभू गुगलजेडडीला यालाही पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहेत. या कारवाईत एकूण २८ लाख ६६ हजार १०० रुपयांच्या बनावट नोटा, २ लाख ४ हजार रुपयांच्या खऱ्या नोटा, बनावट चलन निर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य पोलिसांनी जप्त केले आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेशकुमार, सहपोलिस आयुक्त रंजन शर्मा, अपर पोलीस आयुक्त प्रविण पाटील, पोलीस उपायुक्त संदिपसिंह गिल्ल यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बोळकोटगी, तत्कालीन पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत, पोलीस निरीक्षक चंद्रकांत सूर्यवंशी यांच्या पथकाने केली.

## भारताशी युद्ध करू नका

निर्णयांची माहिती त्यांनी नवाझ शरीफ यांना दिली आहे. भारताशी युद्धात अडकण्यापेक्षा राजनैतिक स्तरावर प्रयत्न करा. भारतासोबतचे युद्ध पाकिस्तानसाठी चांगले ठरणार नाही, असे शरीफ यांनी सांगितल्याचे पाकिस्तानी प्रसारमाध्यमांनी म्हटले आहे. मरियम नवाझ देखील तिथे उपस्थित होत्या. यावेळी शाहबाज यांनी पाकिस्तान भारताला जशास तसे प्रत्युतर देण्यास तयार असल्याचे नवाझ शरीफ यांना सांगितले. भारताने हल्ला केल्यास त्याला अधिक ताकदीने उत्तर देणार, तसा प्रस्ताव शाहबाज यांनी नेला होता. यावर नवाझ शरीफ यांनी हा सल्ला दिला आहे.

## वडेट्टीवारांचे वादग्रस्त व्यक्तव्य

विचारून गोळीबार केल्याचा दावा नाकारत आहे. दहशतवाद्यांना कोणताही जात-धर्म नसतो. या प्रकरणात दोषी असणा-या व्यक्तींवर त्वरीत कारवाई करावी. या प्रकारास इतर कोणताही रंग देऊ नये, असे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. विजय वडेट्टीवार यांनी केंद्र सरकारवर टीका केली. ते म्हणाले, पहलगाम हल्लाची जबाबदारी सरकारने घेतली पाहिजे. त्या ठिकाणी सुरक्षा का नव्हती? २०० किलोमीटरपर्यंत दहशतवादी कसे आले? तुमच्या गुप्तचर यंत्रणा काय करत होत्या? सुरक्षेत चूक कशी झाली? यावर विचार केला पाहिजे. या प्रकरणात दुसरीकडे लक्ष घेऊन जाणे चुकीचे आहे, असे वडेट्टीवार यांनी म्हटले.

## भारताचं पहिलं स्वदेशी एआय

त्यांचे एआय मॉडेल तार्किक क्षमतांनी सुसज्ज असेल. आवाज केंद्रीत असेल आणि भारतीय भाषांमध्ये प्रवीणता विकसित करेल. हे एआय मॉडेल लोकसंख्या-स्तरीय वापरासाठी विकसित केले जाईल, असेही म्हटले आहे. वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मते, सरकार 'सर्वम' स्टर्टअपला सहा महिन्यांसाठी ४ हजार ग्राफिक्स प्रोसेसिंग युनिट्स देईल जेणेकरून ते त्यांचे मॉडेल विकसित करू शकेल आणि त्यांना प्रशिक्षण देऊ शकेल. भारतात एआय डेटा सेंटर्स स्थापन करण्यासाठी निवडलेल्या कंपन्यांद्वारे ग्राफिक्स प्रोसेसिंग युनिट्स उपलब्ध करून दिले जातील.

## दंतचिकित्सा क्षेत्रात ....

सह-संशोधक डॉ. संतोष जाधव, डॉ. पंकज कदम, डॉ. योगेश खडतरे आणि डॉ. सारा मरियम (क्लिनिकल रिसर्च कोऑर्डिनेटर), डॉ. विक्रांत साने आणि डॉ. आमोद पाटणकर (सुविधा व्यवस्थापन), लक्ष्मीकांत खानोलकर, सीईओ (इंडिकल), डॉ. मनीषा जाधव (इंडिकल) या सर्वांच्या सहकार्यामुळे हा प्रकल्प यशस्वी झाला.

### आळंदी नगरपरिषद आळंदी, ता. खेड, जि. पुणे- ४१२१०५

**जाहीर निविदा प्रसिध्दीकरण**

जा.क्र . आनप/लेखा २४१/2025 alandimc2@gmail.com दि. 28/04/25

आळंदी नगरपरिषद लेखा विभागाकडील खालील नमुद कामाकरिता सन 2024-25 व सन 2025-26 या आर्थिक वर्षाकरिता टॅक्स कन्सल्ट यांच्याकडुन सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. याबाबत कोरी निविदा संच शासकीय कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन कालावधीत विनापरतीच्या मोबदल्यात लेखा विभागाकडे उपलब्ध होतील. को-या निविदा यांची किंमत रोखीने स्वीकारली जाईल. मंजुर निविदा धारकास योग्य त्या किंमतीच्या मुद्रक शुल्कावर स्वखर्चाने करारनामा व नियमाप्रमाणे अनामत भरावी लागेल

| अ.क्र. | कामाचा/पुरवठा तपशील | बयाणा रक्कम | कोऱ्या निविदा संचाची किंमत |
|---|---|---|---|
| 1. | आळंदी नगरपरिषेद चे सन 2024-25 व सन 2025-26 या आर्थिक वर्षाकरिता दुहेरी लेखा नोंद करिता Balance Sheet,Receipt & Payment Statement,Cash Flow Statement व दुहेरी लेखा नोंदीचे इतर अनुषंगिक कामे याकरिता सनदी लेखापालची नेमणूक करणे | 20,000/- | 500/- |
| 2. | आळंदी नगरपरिषद कार्यालयात शासनाचे नियमाप्रमाणे देय असणारे सर्व प्रकारचे टॅक्स कन्सलटंचे काम पाहणे (आयकर, जीएसटी, व्यवसाय कर, ईपीएफ, तसेच आयकर केसेस) या करिता कर सल्लागार यांची नेमणक करणे | 5000/- | 500/- |

निविदा विक्री कालावधी - 29/04/2025
निविदा स्विकारण्याचा दिनांक व वेळ -06/05/2025 सकाळी 11.50 पर्यंत
निविदा उघडण्याचा दिनांक 06/05/2025

वरील प्रत्येक कामासाठी आवश्यक अटी शर्तीव इतर माहिती निविदा संचामध्ये नमुद केलेल्या आहेत. कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार आळंदी नगरपरिषदेने ठेवले आहेत.

शिक्का

सही/-
माधव खांडेकर
आळंदी नगरपरिषद

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र.८६/२०२५/२६९

**जाहीर नोटीस**

**अर्जदार**

त्रिमुर्ती विहार बिल्डिंग नं. ३, ४ आणि ५ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता : सर्वे नं. १७३/२अ/१७३/१/१/१, प्लॉट नं.३, १७३/२३/१७३/१/१/१,
प्लॉट नं. ४, १७३/२३/१७३/१/१/१ प्लॉट नं. ५, भेकराईनगर, फुरसुंगी, ता. हवेली, जि. पुणे - ४१२३०८
तर्फे, अध्यक्ष : सौ. कमल सोमनाथ जराड, सचिव : श्री. शरदचंद्र भिकाजी सोनवणे

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
**प्रवर्तक/ जाब देणार नं. १**

१. मे. त्रिमुर्ती डेव्हलपर्स, तर्फे प्रोप्रायटरी संस्था,
ऑफिस पत्ताः सर्वे नं. १७३, त्रिमुर्ती विहार, पुणे सासवड रोड भेकराई नगर, फुरसुंगी, ता. हवेली, जि. पुणे- ०८ तर्फे प्रोप्रायटर, श्री. शिरीष भास्करराव जाधव, रा. अनमोल अपार्टमेंट, सुभाष नगर, गल्ली नं. ०४, शुक्रवार पेठ, पुणे- ४११००२ अनु क्र. २ ते १३ तर्फे कु. मु. म्हणुन जाब देणार नं.१
२. श्री. दत्तोबा धोंडीबा निंबाळकर, ३. हारुबाई बाळासो निंबाळकर, ४. हिराबाई बबन महाडिक ५. राजाराम धोंडिबा निंबाळकर, ६. माधुरी शंकर निंबाळकर, ७. हिरामण धोंडिबा निंबाळकर
८. भोगराज शंकर निंबाळकर, ९. ओमकार शंकर निंबाळकर, १०. सुरेश हिरामण निंबाळकर
११. सुनिता हनुमंत निंबाळकर, १२. स्नेहल हनुमंत निंबाळकर, १३. स्वप्निल हनुमंत निंबाळकर पत्ताः सर्वे नं. १७३/२३/१७३/१/१/१ प्लॉट नं. ३,१७३/२३/१७३/१/१/१ प्लॉट नं.४, १७३/२अ/१७३/१/१/१प्लॉट नं.५, भेकराईनगर, फुरसुंगी, ता. हवेली, जि. पुणे ४१२३०८, १४. (नियोजित) "त्रिमुर्ती विहार बिल्डिंग नं. १ सहकारी गृहरचना संस्था मर्या. १५. (नियोजित) "त्रिमुर्ती विहार बिल्डिंग नं. २ सहकारी गृहरचना संस्था मर्या. पत्ताः सर्वे नं. १७३/२३/१७३/१/१/१ प्लॉट नं.३, १७३/२३/१७३/१/१/१ प्लॉट नं. ४, १७३/२अ/१७३/१/१/१प्लॉट नं.५, भेकराईनगर, फुरसुंगी, ता. हवेली, जि. पुणे - ४१२३०८

२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या त्रिमुर्ती विहार बिल्डिंग नं. ३, ४ आणि ५ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित सर्वे नं. १७३/२३/१७३/१/१/१, प्लॉट नं.३, १७३/२३/१७३/१/१/१,प्लॉट नं. ४, १७३/२अ/१७३/१/१/१ प्लॉट नं. ५, भेकराईनगर, फुरसुंगी, ता. हवेली, जि. पुणे - ४१२३०८ या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र.८६ / २०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक २७/०३/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने अॅड. अदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार/ जमिन मालक क्र. १ ते १५ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते १५ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः सुनावणी दिनांक ३०/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते १५ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायद्यातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक२५/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र.५२४/२०२४ /२६७

**जाहीर नोटीस**

**अर्जदार**

साईविहार सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः सर्वे नं. १, हडपसर, ता. हवेली, जि. पुणे- ४११०२८
तर्फे अध्यक्ष : सौ. लक्ष्मी संदीप घुले, सचिव श्री. ओंकार सोमनाथ झिंत्रे

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
**प्रवर्तक/ जाब देणार नं. १**

१. मे. किशोर ठक्कर प्रमोटर्स अॅन्ड बिल्डर्स नोंदणीकृत प्रोप्रायटरी संस्था, तर्फे प्रोप्रायटर श्री. किशोर कांजी ठक्कर, ऑफिस पत्ताः १ स्वप्ननगरी, २०, कर्वे रोड, पुणे- ४११००४
२. मे. ग्लोबल इन्फ्रास्ट्रक्चर अँन्ड टेक्नॉलॉजिस लि. तर्फे संचालक / संचालक मंडळ
श्री. अभिजित चंद्रकांत कुलकर्णी, ऑफिस पत्ताः मंत्री हाउस, ९२९, एफ सी रोड, पुणे- ४११००४.
जाब देणार नं. २
३. श्री. विलास श्रीपतराव बडदे, ४. श्री. संजय वसंतराव बडदे, ५. श्री. सतिश वसंतराव बडदे, ६. श्री. शिरीष वसंतराव बडदे अनु क. ३ ते ६ पत्ताः सर्वे नं. १, हडपसर ता. हवेली, जि. पुणे- ४११०२८
जाब देणार नं. ३ / इतर सहकारी संस्था
७. मंत्री मार्केट कंडोमिनिअम सोसायटी " विंग ए ते ओ
८. मंत्री मार्केट को. हौसिंग सोसायटी लि." " विंग पी ते क्यु
पत्ताः सर्वे नं. १ओ, हडपसर ता. हवेली, जि. पुणे- ४११०६२.

२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या एन. एस. जी. क्रॉऊन बी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित सर्वे नं. ५२/१३, मौजे न-हे, ता. हवेली, जि. पुणे- ४११०४१ या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र.५२४/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक १८/०३/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने अॅड. समृध्दी कोठारी हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ८ गैरहजर, गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ८ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः सुनावणी दिनांक २९/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ८ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायद्यातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक २५/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र.८७/२०२५/२६६

**जाहीर नोटीस**

**अर्जदार**

कुणाल इस्टेट अे-१ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता : सी. टी. सर्वे नं. १६०७, १६०८, १६०९, केशव नगर, चिंचवड, ता. हवेली, जि. पुणे - ४११०३३
अध्यक्षः श्री. जनार्दन लक्ष्मण बेद्रे, सचिव : श्री. भाऊसाहेब पोपटराव आहिरे

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**

प्रवर्तक/ जाब देणार नं. १
कुणाल शेल्टर्स प्रा. लि. प्रायवेट लिमिटेड कंपनी
ऑफिस पत्ताः १०३ / ए. शुक्रवार पेठ, सदाशिव कॉम्प्लेक्स, पुणे - ४११००२
तर्फे संचालक, श्री. हेमेन्द्र दाहयाभाई शहा, रा. प्लॉट नं. १८, अमर सोसायटी, एरंडवणे, पुणे- ४११००४
जागा मालक / जाब देणार नं. २
२. श्री. बाळासाहेब रामभाऊ भोईर, ३. सौ. तुळसाबाई बाळासाहेब भोईर, ४. श्री. गुलाब बाळासाहेब भोईर, ५. सौ. मीना गुलाब भोईर, ६. माया गुलाब भोईर, ७. श्री. महेश गुलाब भोईर, ८. श्री. संभाजी बाळासाहेब भोईर, ९. सौ. मैना संभाजी भोईर, १०. सुनिता संभाजी भोईर, ११. श्री. नंदकुमार बाळासाहेब भोईर, १२. सौ. चंदा नंदकुमार भोईर, १३. श्री. प्रदीप बाळासाहेब भोईर, १४. सौ. अनिता प्रदीप भोईर १५. श्री. संजय बाळासाहेब भोईर, १६. श्री. रविंद बाळासाहेब भोईर, १७. श्री. उमेश बाळासाहेब भोईर
अनु क्र. २ ते १७ रा. स. नं. ९५, रहाटणी, काळेवाडी, पुणे - ४११०१७
१८. श्री. शिवाजी बाळासाहेब भोईर, १९. सौ. गंगुबाई शिवाजी भोईर, २०. श्री. महादेव शिवाजी भोईर
२१. सौ. नलु महादेव भोईर, २२. श्री. पांडुरंग शिवाजी भोईर, २३. सौ. प्रभा पांडुरंग भोईर
२४. श्री. सुरेश शिवाजी भोईर, २५. सौ. कल्पना सुरेश भोईर, २६. श्री. प्रज्ञेश शिवाजी भोईर
२७. श्री. तुकाराम रामभाऊ भोईर, २८. सौ. कलाबाई तुकाराम भोईर, २९. श्री. रमेश तुकाराम भोईर
३०. सौ. मंगल रमेश भोईर, ३१. श्री. राजेश तुकाराम भोईर
अनु क्र.१८ ते ३१ रा. स.नं. ३०६, गावडे भोईर आळी, चिंचवड गाव, पुणे - ४११०३३
३२. श्री. महादेव दगडु खैरे, ३३. सौ. रुक्मिणीबाई दगडु खैरे
अनु क्र. ३२ व ३३ रा. गावडे भोईर आळी, खैरे वाडा, चिंचवड गाव, पुणे - ४११०३३
इतर इमारत / जाब देणार नं.३
३४. कुणाल इस्टेट अे-२ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित ३५. कुणाल इस्टेट अे-३ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित ३६. कुणाल इस्टेट अे-४ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित ३७. कुणाल इस्टेट अे-५ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित ३८. कुणाल इस्टेट अे-६ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित ३९. कुणाल इस्टेट अे-७ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
४०. कुणाल इस्टेट अ-८ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
अनु क्र. ३४ ते ४० पत्ताःसी. टी. सर्वे नं. १६०७, १६०८,१६०९, केशव नगर, चिंचवड, ता. हवेली, जि. पुणे - ४११०३३

२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कुणाल इस्टेट अ- १ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित सी.टी. सर्वे नं. १६०७, १६०८,१६०९, केशव नगर, चिंचवड, ता. हवेली, जि. पुणे - ४११०३३ या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र.८७ /२०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक २७/०३/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने अॅड. समृध्दी कोठारी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र.१ ते ४० गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र.१ ते ४० यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः सुनावणी दिनांक ३०/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र.१ ते ४० यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायद्यातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक २५/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ४४३/२०२४/२६८

**जाहीर नोटीस**

**अर्जदार**

एन. एस. जी. क्रॉऊन बी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ताः सर्वे नं. ५२/१३, मौजे नऱ्हे, ता. हवेली, जि. पुणे- ४११०४१
तर्फे, अध्यक्षः श्री. शरदचंद्र विठ्ठलराव गुंजाळ, सचिव : श्री. विनायक श्रीपाद पुराणिक

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
**प्रवर्तक/ जाब देणार नं. १**

१. एन. एस. गायकवाड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन तर्फे प्रोप्रायटर
सौ. नंदा नानासाहेब उर्फ श्रीपतराव गायकवाड, रा. सर्वे नं. १२६, डी पी रोड, औंध, पुणे- ४११ ००७.
जागा मालक/जाब देणार नं. २
अ. सौ. लिला मधुकर पवार ब. श्री. मधुकर दत्तोबा पवार, क. श्री. संजय मधुकर पवार
ड. श्री. अजय मधुकर पवार, इ. श्री. चंदन मधुकर पवार
अनु क. ब ते इ रा. अनुदत्त अपार्टमेंट, ३८२, नवी पेठ, जि. पुणे- ४११०३०
ई. सौ. नंदा नानासाहेब उर्फ श्रीपतराव गायकवाड रा. सर्वे नं. १२६, डी पी रोड, औंध, पुणे ४११ ००७.
जाब देणार नं.३ इतर सहकारी गृहरचना संस्था
२. एन.एस.जी. क्रॉऊन ए विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः सर्वे नं. ५२/१३, मौजे नऱ्हे, ता. हवेली, जि. पुणे- ४११०४१.

२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या एन. एस. जी. क्रॉऊन बी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित सर्वे नं. ५२/१३, मौजे न-हे, ता. हवेली, जि. पुणे - ४११ ०४१ या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ४४३/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक १८/०३/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने अॅड. समृध्दी कोठारी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते ३ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ३ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः सुनावणी दिनांक २९/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र.१ ते ३ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायद्यातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक २५/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र.८१/२०२५/२७०

**जाहीर नोटीस**

**अर्जदार**

स्काय हाईट्स सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता : स. नं. ४४/१/१/२/३/४/ बिनशेती क्षेत्र, स. नं. ४४/१/१/२/३/४/अॅमेनिटी स्पेस, स. नं. ४४/१/१/२/३/४/१२ मी अंतर्गत रस्ता, स.नं. ४४/१/१/२/३/४/१२ मी सर्विस रस्ता, स.नं. ४४/१/१/२/३/४/९ मी बाधित रस्ता, स.नं. ४४/१/१/२/३/४/६० मी बाधित रस्ता, स.नं. ४४/१/१/२/३/४/ ओपन स्पेस, पिसोळी, ता. हवेली, जि. पुणे ६०.
तर्फे, सचिव : श्री. सचिन गणपत कदम, खजिनदारः श्री. अनिल पुजारी

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**

विकसक / प्रवर्तक / जागा मालक / जाब देणार नं. १
१. होम लॅण्ड कंन्स्ट्रक्शन प्रा. लि., प्रा. लि. कंपनी, तर्फे डायरेक्टर,
ए. श्री. रमेश परसराम भाटीया, ब. श्री. रोहन गुल मलानी
ऑफिस पत्ता- ए-5, द रिट्रीट, १००/४,१००/५, गिडणें पार्क, सॅलिस्बरी पार्क, जि. पुणे - ४११०३७

२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या स्काय हाईट्स सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता : स. नं. ४४/१/१/२/३/४/ बिनशेती क्षेत्र, स.नं. ४४/१/१/२/३/४/ अॅमेनिटी स्पेस, स. नं. ४४/१/१/२/३/४/१२ मी अंतर्गत रस्ता, स.नं. ४४/१/१/२/३/४/१२ मी सर्विस रस्ता, स.नं.४४/१/१/२/३/४/९ मी बाधित रस्ता, स.नं. ४४/१/१/२/३/४/६० मी बाधित रस्ता, स.नं. ४४/१/१/२/३/४/ ओपन स्पेस, पिसोळी, ता. हवेली, जि. पुणे ६०. या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र.८१/२०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक २७/०३/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने अॅड. अदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ अ ब गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ अ ब यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः सुनावणी दिनांक ३०/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र.१ अब यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायद्यातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक २५/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

O.W. No. 2827/25
Joint Charity Commissioner Office
1st Floor, Sasmira Building, Sasmira Road,
Worli, Mumbai - 400030
Date - 25/04/2025

### PUBLIC NOTICE

Maharashtra Public Trust Act 1950, U/s 36(1)(a)
Application No. 26/2025
Name of the Trust:- "The Capuchin Friars Minor (Bom) Society"
P.T.R. No. :- F-1227 (Mumbai)

Sealed tender offers are invited for the sale of immovable property of the trust on the address described below and property belonging to ***"The Capuchin Friars Minor (Bom) Society", trust registration No. F-1227 (Mumbai),*** in the application No. 26 of 2025, U/s 36 (1) (a) by the order dated 24/04/2025 of the Hon'ble Joint Charity Commissioner, Greater Mumbai Region, Mumbai. The tender offers shall be submit on the address of office Dharmadaya Ayukta Bhavan, 1st floor, Sasmira Building, Sasmira Road, Worli, Mumbai 400030. The offers shall submit within 15 days from the publication of this notice. The received sealed tender offers will be opened in the open court hall on **15/05/2025 at 11.00 am.** at the address mentioned above in the office of Ld. Joint Charity Commissioner, Greater Mumbai Region, Mumbai. The Offer should be submitted with Tender Form & should not mention any terms and conditions by the tenderers. If such term and condition found in the tender form they will not be considered. All bidders, who have submitted the tender forms have to remain present in the office at the time of opening of tenders on **15/05/2025 at 11.00 am.** The enhancement to their offer amount will be allowed at the time of bidding. The tender of the highest bid amount will be accepted. The offerer should submit the Demand Draft / Pay Order of 20% of the offer amount with their offer. The decision of the Ld. Joint Charity Commissioner, Greater Mumbai Region, Mumbai, in respect to grant sanction to sell property or to reject the sanction to sell the property will be final and same will be binding to all. The applicant trustee has prayed that he be permitted to sell the property on **'as is where is'** basis. The Ld. Joint Charity Commissioner, Greater Mumbai Region, Mumbai. reserves all rights to accept or reject the tenders.

The offers are invited not below than the amount of Rs. 19,11,00,000/- (Nineteen Crore Eleven Lakh Only) as one of the offerers has given the offer of Rs. 19,11,00,000/- for purchasing the property of the trust. Tender Form will be available in the office of trustees/applicants **(The Capuchin Friars Minor (Bom) Society,** Fatima High School, Kirol Village, Vidyavihar West, Mumbai-400 086) on all working days between 11.00 am to 5.00 pm.

**SCHEDULE OF PROPERTY**

The trust property under permission to sell is as under-
"The Land admeasuring about 01 Hector 21 Are, out of total land admeasuring about 4 hector 40 are, bearing S. No. 241/1/1, situated at village Lohegaon (Tingre Nagar), Taluka -Haveli Dist. Pune on 'as is where is', or 'as is what is', and whatever there is' basis'.

This Notice Given under my hand and seal of Joint Charity Commissioner, Greater Mumbai Region, Mumbai dt. on 25.04.2025

**Superintendent (J)**
**Joint Charity Commissioner,**
**Greater Mumbai Region, Mumbai.**

# माफी मागण्यासाठी शब्द नाहीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जम्मू :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याच्या घटनेने संपूर्ण देशाला प्रभावित केले आहे. आपण यापूर्वी असे अनेक हल्ले पाहिले आहेत. बैसरनमध्ये २१ वर्षांनी इतक्या मोठ्या प्रमाणात पर्यटकांवर हल्ला झाला आहे. हल्ल्यातील मृतांच्या कुटुंबियांची माफी कशी मागावी, हे मला कळत नाही. पर्यटकांना सुरक्षित परत पाठवणे माझे कर्तव्य होते. मी ते करू शकलो नाही. माफी मागण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत, अशा भावना जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी व्यक्त केल्या आहेत. पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ सोमवारी (दि. २८) बोलावलेल्या विधानसभेच्या विशेष अधिवेशनात ते बोलत होते.



ओमर अब्दुल्ला यांनी दहशतवादी हल्ल्याबद्दल तीव्र दुःख व्यक्त करून पर्यटकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी आम्हाला पार पाडता आली नाही. या दुर्घटनेने संपूर्ण देशाला हादरवून सोडले आहे, असे सांगितले. ते म्हणाले की, मी या क्षणाचा वापर राज्यत्वाची मागणी करण्यासाठी करणार नाही. पहलगाम नंतर, मी कोणत्या तोंडाने जम्मू आणि काश्मीरला राज्यत्व मागू शकतो? मेरी क्या इतनी सस्ती सियासत है? आम्ही भूतकाळातही राज्यत्वाबद्दल बोललो आहोत आणि भविष्यातही असेच बोलू, परंतु जर मी केंद्र सरकारला सांगितले की २६ लोक मरण पावले आहेत, तर आता मला राज्यत्व द्या, हे माझ्यासाठी लज्जास्पद असेल.

२२ एप्रिल रोजी पहलगामपासून काही किलोमीटर अंतरावर असलेल्या बैसरन खोऱ्यात हा दहशतवादी हल्ला झाला होता. यात २६ जणांचा मृत्यू झाला होता. त्यातील बहुतेक पर्यटक होते. पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबाची शाखा असलेल्या रेझिस्टन्स फ्रंट (टीआरएफ) ने सुरुवातीला या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली होती. परंतु नंतर त्यांनी हल्ल्यातील सहभाग नाकारला.

जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी पहलगाम हल्ल्यानंतर उपराज्यपाल मनोज सिन्हा यांना विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची विनंती केली होती. उपराज्यपाल सिन्हा यांनी ही विनंती मान्य करत सोमवारी २८ एप्रिल रोजी विशेष अधिवेशन बोलावण्यास मान्यता दिली होती.

### दहशतवादाविरोधात विशेष अधिवेशन

● विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांचे म्हणणे आहे की हे अधिवेशन दहशतवादाविरुद्ध विशेष असेल. जम्मू विधानसभेतील विरोधी पक्षनेते सुनील शर्मा म्हणाले की, सर्वपक्षीय बैठकीत दहशतवादाविरुद्ध सर्वांनी एकता दाखवली. केंद्राच्या दहशतवादाबाबतच्या निर्णयांना सर्वांनी पाठिंबा दिला. विधानसभेच्या अलिकडच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आपण अनेक लढाया लढल्या आहेत. सीमेवर तणाव आहे, लोकांच्या मनात भीती आहे, हल्ल्यात २६ जणांना आपले प्राण गमवावे लागले आहेत, हा शोककाळ आहे. सर्वांनी एकत्र येण्याची वेळ आली आहे, असे ते म्हणाले.



## बैठकीला अनुपस्थित राहिल्याबद्दल खर्गे यांची पीएम मोदींवर टीका

**जयपूर :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यावर चर्चा करण्यासाठी बोलावण्यात आलेल्या सर्वपक्षीय बैठकीला अनुपस्थित राहिल्याबद्दल काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला आहे. देशाचा अभिमान दुखावला जात असताना तुम्ही (पंतप्रधान मोदी) बिहारमध्ये निवडणूक भाषण करत आहात, हे देशाचे दुर्दैव आहे, असे ते म्हणाले. सर्वपक्षीय बैठकीला सर्व पक्षांचे नेते उपस्थित होते, पण त्या बैठकीला पंतप्रधान मोदी आले नाहीत, हे दुःखद आहे. बिहार दूर होता का? पंतप्रधानांनी सर्वपक्षीय बैठकीत येऊन योजना समजावून सांगायला हवी होती. त्याला आमच्याकडून काय मदतीची गरज आहे? अशी विचारणा त्यांनी केली.



## सोनिया, राहुल यांची प्रोग्रेसिव्हच्या शिष्टमंडळाची भेट

**नवी दिल्ली :** काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी आणि पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी सोमवारी प्रोग्रेसिव्ह इंटरनॅशनल या जगातील पुरोगामी शक्तींना संघटित करण्याच्या उद्देशाने संघटनेच्या शिष्टमंडळाची भेट घेतली आणि अनेक जागतिक मुद्द्यांवर चर्चा केली. काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शिष्टमंडळाची १०, जनपथ या निवासस्थानी भेट घेतली. काँग्रेसने या बैठकीचे फोटो शेअर केले आहेत, ज्यात दोन्ही नेते प्रोग्रेसिव्ह इंटरनॅशनलच्या प्रतिनिधींशी संवाद साधताना दिसत आहेत.

# राफेल एमच्या खरेदीवर शिक्कामोर्तब

## नौदलासाठी सुमारे ६४ हजार कोटींची २६ विमान खरेदी

भारत आणि फ्रान्सदरम्यान सोमवारी भारतीय नौदलासाठी सुमारे ६४ हजार कोटी रुपये किमतीच्या २६ राफेल मरीन लढाऊ विमानांच्या खरेदी करारावर शिक्कामोर्तब झाले. या कराराच्या स्वाक्षरी कार्यक्रमावेळी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह उपस्थित होते.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** याआधी फ्रेंच संरक्षण मंत्री या समारंभात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याचे नियोजन होते, परंतु वैयक्तिक कारणांमुळे त्यांचा दौरा रद्द करण्यात आला. देशातील वाहकांना तैनातीसाठी तातडीने नवीन लढाऊ विमानांची आवश्यकता आहे, कारण देखभालीशी संबंधित समस्यांमुळे सध्याच्या मिग-२९ के लढाऊ विमानांच्या ताफ्यातील विमानांची संख्या कमी झाली आहे. या महिन्याच्या सुरुवातीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील सुरक्षा विषयक मंत्रिमंडळ समितीने भारतीय नौदलासाठी २६ अत्याधुनिक राफेल-मरिन लढाऊ विमानांच्या खरेदीला मंजुरी दिली होती.

या स्पर्धात्मक प्रक्रियेत अमेरिकन बोईंग एफ/ए १८ सुपर हॉर्नेटचाही समावेश होता. पण भारतीय नौदलाने राफेल लढाऊ विमानांची निवड केली. राफेल हे भारतीय आवश्यकतेनुसार अधिक योग्य असल्याचे आढळून आले.

### हवाई दलाला बळ

● राफेल एम जेट्स आयएनएस विक्रांतवरून चालवले जातील आणि विद्यमान मिग-२९के फ्लीटला आधार देतील. भारतीय हवाई दल २०१६ मध्ये झालेल्या एका वेगळ्या करारानुसार खरेदी केलेल्या ३६ राफेल विमानांचा ताफा आधीच चालवते. ही विमाने अंबाला आणि हासीमारा येथे तैनात आहेत. या नवीन करारामुळे भारतातील राफेल जेटची एकूण संख्या ६२ होईल, ज्यामुळे देशाच्या ४.५-पिढीच्या लढाऊ विमानांच्या ताफ्यात लक्षणीय वाढ होईल.

त्यामुळे राफेलची निवड करण्यात आली आहे. ही राफेल विमाने अत्याधुनिक शस्त्र प्रणालींनी सुसज्ज असतील. यात लांब पल्ल्याची हवेतून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे, जहाजविरोधी क्षेपणास्त्रे आणि इलेक्ट्रॉनिक युद्ध यांचा समावेश असेल. या करारानुसार भारतात विमाने निर्मिती करणे अनिवार्य नसले तरी, राफेलमध्ये सहभागी असलेल्या डसॉल्ट, थेल्स आणि एमबीडीए सारख्या फ्रेंच कंपन्या त्यांच्या भारतीय भागीदारांना स्थानिक पातळीवर उपकरणे आणि उपप्रणाली निर्मितीसाठी ऑर्डर देण्याची शक्यता आहे.

# अश्लील कंटेटची सर्वोच्च दखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** ओटीटी आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर स्ट्रिमिंग होणाऱ्या अश्लील कंटेंटबाबत सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. यावर बंदी घालण्यासाठी केंद्राला योग्य पावले उचलण्याचे निर्देश देण्याची मागणी याचिकेतून करण्यात आली होती. या जनहित याचिकेची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार, नेटफ्लिक्स, अमेझॉन प्राईम, एक्स (पूर्वीचे ट्विटर), फेसबुक, इन्स्ट्राग्राम, यूट्युब आणि इतर प्लॅटफॉर्म्सना नोटीस बजावली आहे.

सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने ओटीटी प्लॅटफॉर्म आणि सोशल मीडियावरील अश्लील कंटेंटचे नियमन करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेची दखल घेतली. त्यावर न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, या समस्येमुळे गंभीर चिंता निर्माण झाली आहे. त्यावरील उत्तरात केंद्र सरकारने न्यायालयाला सांगितले की आणखी काही नियम विचाराधीन आहेत.

जनहित याचिकेतून महत्त्वाचा चिंतेचा मुद्दा उपस्थित केला आहे, असे निरीक्षण नोंदवत न्यायमूर्ती बीआर गवई आणि न्यायमूर्ती एजी मसीह यांच्या खंडपीठाने केंद्र सरकार आणि ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्स, अमेझॉन प्राईम, अल्टबालाजी, उल्लू डिजिटल, मुबी आणि सोशल मीडिया



प्लॅटफॉर्म एक्स कॉर्प, गुगल, मेटा इंक आणि ॲपल यांना नोटीस बजावली.

याचिकाकर्त्यांची बाजू मांडणारे वकील विष्णू शंकर जैन यांनी म्हटले की, हे प्रकरण विरोधी खटला म्हणून नाही तर खरोखरच चिंता निर्माण करणारे आहे. कोणत्याही प्रकारचे नियमन अथवा नियंत्रण नसलेल्या सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या कंटेंटच्या मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. यावेळी न्यायमूर्ती गवई यांनी केंद्र सरकारची बाजू ऐकून घेतली. मिस्टर सॉलिसिटर? काहीतरी करा...याबाबत काहीतरी कायदे करावेत, अशी विचारणा न्यायमूर्ती गवई यांनी सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांना केली.

यावर सॉलिसिटर जनरल मेहता म्हणाले की, काही नियमित कार्यक्रमांमध्येही अश्लील कंटेंटचा समावेश असतो. काही कार्यक्रम इतके विकृत स्वरुपाचे असतात की ते दोन सभ्य पुरुष एकत्र बसून ते पाहू शकत नाहीत, असे त्यांनी निदर्शनास आणून दिले.





## मद्यप्राशन करून वाहन चालविल्याप्रकरणी गुन्हे दाखल

**बेंगळुरू :** बेंगळुरू वाहतूक पोलिसांनी सोमवारी सांगितले की, मद्यप्राशन करून वाहन चालविण्याचे ६५० हून अधिक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, तर शहरात आठवडाभर चाललेल्या विशेष मोहिमेत अतिवेगाने वाहन चालविणाऱ्यांकडून एकूण १.८९ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. २१ एप्रिल ते २७ एप्रिल या कालावधीत मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविणाऱ्या व अतिवेगात वाहन चालविणाऱ्या वाहनचालक ांवर कारवाई करण्यात आली. शहरात ५३ वाहतूक पोलिस ठाण्यातील सर्व वाहतूक अधिकाऱ्यांसह ही मोहीम राबविण्यात आली.

# केरळच्या मुख्यमंत्री कार्यालयाला बॉम्बची धमकी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**तिरुवनंतपुरम :** मुख्यमंत्री कार्यालय (सीएमओ), मुख्यमंत्री पिनारायी विजयन यांचे अधिकृत निवासस्थान असलेल्या क्लिफ हाऊस आणि सचिवालयासह अनेक उच्च सुरक्षा असलेल्या सरकारी ठिकाणी बॉम्बच्या धमक्या देण्यात आल्यानंतर सोमवारी केरळची राजधानी हाय अलर्टवर होती. ईमेलद्वारे धमक्या मिळाल्यामुळे बॉम्ब निकामी पथके तात्काळ तैनात करण्यात आली आणि सुरक्षा तपासणी तीव्र करण्यात आली, असे वृत्त एएनआय या वृत्तसंस्थेने दिले आहे. मुख्यमंत्री कार्यालयाच्या म्हणण्यानुसार, सर्व प्रभावित ठिकाणी सध्या शोध मोहीम सुरू आहे. पोलिस, बॉम्ब शोधक पथकांनी परिसराला वेढा घातला आहे आणि तपासणी केली जात आहे. आतापर्यंत काहीही सापडलेले नाही. रविवारी तिरुवनंतपुरम आंतरराष्ट्रीय विमानतळाला ईमेलद्वारे बॉम्बची धमकी मिळाली, जी नंतर व्यापक सुरक्षा तपासणीनंतर खोटी असल्याचे निश्चित झाले. याव्यतिरिक्त, शनिवारी शहरातील अनेक हॉटेल्स, ज्यात हिल्टन गार्डन इन आणि गोकुलम ग्रँड हॉटेल यांचा समावेश आहे, त्यांना बॉम्बची धमकी दिली. झडती घेण्यात आली परंतु स्फोटकांचा कोणताही पुरावा मिळाला नाही. पंतप्रधान २ मे रोजी केरळला भेट देणार असल्याने या धमकीची व्याप्ती वाढली आहे.



श्रीनगर श्रीनगरमधील पहलगामजवळ झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर, दाल सरोवराच्या पाण्यात शिकारातून प्रवास करणे पर्यटकांनी थांबवलेले नाही.

## रुपया ३८ पैशांनी वधारून ८५.०३ वर बंद




**मुंबई :** परकीय गुंतवणुकीचा सततचा ओघ, कच्च्या तेलाच्या किमती कमी होणे आणि देशांतर्गत शेअर बाजारातील तेजीचा कल यामुळे सोमवारी डॉलरच्या तुलनेत रुपया ३८ पैशांनी वधारून ८५.०३ (तात्पुरता) पातळीवर बंद झाला. परकीय चलनाचा वाढता साठा यासारख्या मजबूत देशांतर्गत फंडामेंटलमुळेही गुंतवणूकदारांच्या भावना वाढल्याचे फॉरेक्स ट्रेडर्सनी सांगितले. आंतरबँक परकीय चलन बाजारात रुपया ८५.२९ वर उघडला आणि डॉलरच्या तुलनेत ८४.९६ च्या उच्चांकी आणि ८५.४२ च्या नीचांकी पातळीदरम्यान गेला. मागील बंद पातळीच्या तुलनेत ३८ पैशांची वाढ नोंदवत युनिटने सत्राचा शेवट ८५.०३ वर केला.

## दहशतवादी आणि साथीदारांच्या ठिकाणांवर पोलिसांचे छापे

**जम्मू :** पाकव्याप्त काश्मीरमधून सक्रिय असलेले अनेक दहशतवादी आणि त्यांच्या साथीदारांच्या जम्मू-काश्मीरमधील डोडा आणि किश्तवाड जिल्ह्यातील ठिकाणांवर पोलिसांनी छापे टाकले आहेत. बेकायदा कारवाया प्रतिबंधक कायद्यांतर्गत (यूएपीए) सुरू असलेल्या तपासाच्या अनुषंगाने दहशतवादी आणि त्यांच्या साथीदारांच्या घरांवर मोठ्या प्रमाणात छापे टाकण्यात येत आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली. डोडा आणि किश्तवाड जिल्ह्यात सोमवारी पोलिस पथकांनी दहशतवादी संघटनांशी संबंधित आणि पाकव्याप्त काश्मीरमधून कार्यरत असलेल्या अनेक व्यक्तींच्या ठिकाणांवर छापे टाकले.

# उत्तर प्रदेश सरकारची अतिक्रमणांवर मोठी कारवाई





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लखनौ :** मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखालील एका मोठ्या मोहिमेत, उत्तर प्रदेश सरकारने नेपाळच्या सीमेवरील जिल्ह्यांमध्ये बेकायदेशीर अतिक्रमणांविरुद्ध मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू केली आहे. आंतरराष्ट्रीय सीमेवरील १०-१५ किमी परिसरात शेकडो अनधिकृत बांधकामे पाडण्यात आली आहेत.

अतिक्रमण विरोधी मोहिमेचा एक भाग म्हणून, अनधिकृत धार्मिक स्थापनेवरही कडक कारवाई करण्यात आली आहे. एकट्या बहराइच जिल्ह्यात ८९ बेकायदेशीर अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली. श्रावस्तीमध्ये, अधिकाऱ्यांनी १७ बेकायदेशीर मदरशांसह ११९ अतिक्रमित स्थळे मुक्त केली. त्याचप्रमाणे, सिद्धार्थनगर जिल्ह्यात ११ बेकायदेशीर बांधकामांवर कारवाई करण्यात आली, तर महाराजगंजमध्ये अशा १९ बांधकामांना लक्ष्य करण्यात आले. बलरामपूरमध्ये, अधिकाऱ्यांनी सरकारी जमिनीवर बेकायदेशीर अतिक्रमणाची ७ प्रकरणे ओळखली. यापैकी दोन अतिक्रमणे स्वेच्छेने हटवण्यात आली, तर उर्वरित बांधकामांवर कारवाई सुरू आहे.

उत्तर प्रदेश सरकारच्या मते, या मोहिमेचा उद्देश संवेदनशील सीमावर्ती भाग सुरक्षित करणे आणि सरकारी जमिनीचा कायदेशीर वापर सुनिश्चित करणे आहे. उत्तर प्रदेशातील श्रावस्ती येथे, मान्यताप्राप्तीसाठी कागदपत्रे सादर न केल्यामुळे सात मदरसे बंद करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. भींगा तहसीलमधील तीन आणि जमुनाहा तहसीलमधील चार मदरसे त्यांच्या मान्यताप्राप्तीसाठी कोणतेही वैध कागदपत्रे सादर न केल्यामुळे बंद करण्यात आल्याचे जिल्हा प्रशासनाने एका निवेदनात म्हटले आहे.

## १५५० भाकरी आणि मासवड्या



**लोणी-धामणी :** मांदळेवाडी (ता. आंबेगाव ) येथे श्री हनुमान मंदिराच्या ३१ व्या वर्धापन दिनानिमित्त गुरूवार ( दि:२४) ते गुरूवार (दि: १ मे) अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे. दरवर्षी या सप्ताहाचे आयोजन केले जाते. चालू वर्षी या सप्ताहचे ३१ वे वर्षे असून, दररोज हरिकिर्तनानंतर महाप्रसाद दिला जातो. चालू वर्षी सप्ताहाच्या चवथ्या दिवशी ग्रामस्थांच्या माध्यमातूनच जवळ-जवळ १२००/ ग्रामस्थांना बाजरीची भाकरी व मासवडी जेवणाचे आयोजन केले होते. जवळ-जवळ १५०० बाजरीची भाकरी व मासवडीचे जेवण ग्रामस्थांना दिले गेले. तसे पाहिले तर हे गाव पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. दुष्काळग्रस्त गाव म्हणून या गावाची ओळख आहे. पण म्हणतात ना एकी हेच बळ या माध्यमातून आपल्या गावाप्रती असणारी आस्था आणि निष्ठा या गावाने दाखवून दिली आहे. आंबेगाव तालुक्यातच नाही तर संपूर्ण उत्तर पूणे जिल्हयात एक आदर्श अखंड हरिनाम सप्ताह म्हणून या गावाला ओळखले जाते.

## पापळवाडी परिसरात बिबट्याची दहशत

**खेड :** पाईट, ता.खेड येथील पापळवाडी परिसरात रविवारी मध्यरात्री बिबट्याच्या हल्ल्यात दीड वर्षाच्या कालवड गाईचा मृत्यू झाला. पापळवाडी येथील बाळासाहेब विठोबा दरेकर यांच्या शेतातील गोठ्यावर जनावरे बांधलेली होती. त्यामध्ये मध्यरात्री बिबट्याने दीड वर्षाच्या गायीच्या कालवडीवर हल्ला करून गोठ्याच्या बाजूला ओढत नेऊन अर्ध्यापेक्षा जास्त भाग खाल्ला. कालवड गाईचा मृत्यू झाल्याने शेतकऱ्याचे शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे. वन विभागाकडून पंचनामा करून तातडीने आर्थिक मदत मिळावी अशी मागणी पाईटचे माजी उपसरपंच जयसिंग दरेकर यांनी केली आहे. पापळवाडी हद्दीत लगोलग तीन बिबट्याच्या हल्ल्याच्या घटना घडल्या आहेत. यापूर्वी एका तरुणावर बिबट्याने हल्ला केला होता. त्यामध्ये तो जखमी झाला होता. तसेच पापळवाडी फाटा या ठिकाणी धनगरांच्या वाड्यावर हल्ला केला होता. यावेळी घोडी बिबट्याच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडली होती. परिसरामध्ये बिबट्याचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. तसेच संध्याकाळच्या वेळी बिबट्या भर रस्त्यात मोकाटपणे फिरताना अनेक नागरिकांनी पाहिला आहे. परिसरात भितीचे वातावरण असून तात्काळ पिंजरा लावण्याची मागणी जयसिंग दरेकर यांनी वनविभागाकडे केलेली आहे.

## बारामतीत बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रमासाठी संलग्नता



**बारामती :** परिचर्या महाविद्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय ,बारामती या संस्थेत बी.एस्सी नर्सिंग अभ्यासक्रम सुरू करण्याकरिता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक यांच्याकडून प्रथम संलग्नता प्रदान करण्यात आली आहे, अशी माहिती परिचर्या महाविद्यालयाच्या प्राचार्या सिमा माने यांनी दिली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या प्रवेश प्रक्रियेनंतर या महाविद्यालयात १०० विद्यार्थी बीएस्सी नर्सिंग करिताप्रवेश घेणार आहेत. सदरचे बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून दिनांक २६ मार्च २०२५ रोजी सक्षमता तपासणी करण्यात आली होती. सदरचे महाविद्यालय सुरु करण्याकरिता वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे संचालक डॉ. अजय चंदनवाले यांचे मार्गदर्शन लाभले. यासोबतच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.चंद्रकांत मस्के, उपअधिष्ठाता डॉ. प्रज्ञा भालेराव , रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अमोल शिंदे, प्रशासकीय अधिकारी नंदकुमार कोकरे यांचे सहकार्य लाभले, असेही श्रीमती माने यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले.

# नीरा बसस्थानकातील प्रवासी तहानलेले




नीरा बसस्थानकातील प्रवाशांच्या पिण्याच्या पाण्याची टाकी फुटली असेल, तर दोन दिवसांत संबंधित यंत्रणेला टाकी बसविण्याबाबत सूचना देत आहे.

**- अरूण सिया, वि**भागीय नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, पुणे विभाग

- **बसस्थानकात पिण्यासाठीच पाणीच नाही**
- **पत्रव्यवहार करूनही पाण्याची टाकी बसेना**
- **पाण्याची टाकी फुटल्याने पाणी जाते वाहून**
- **बारामती आगाराचा अजब कारभार**

नीरा बसस्थानकात आल्यानंतर पाणी पिण्यास नळापाशी गेलो असता, नळाला पाणीच नाही. एवढं मोठं स्टॅन्ड असून त्याचा काय उपयोग असे खंडाळा येथील प्रवाशी नारायण पवार यांनी सांगितले. तर नीरा येथील एसटी स्टँन्ड मोठे असूनही स्टँन्डमध्ये पिण्याला पाणी मिळत नाही, ही गोष्ट लाजिरवाणी आहे.

**महेश गोळे,** प्रवासी, सातारा



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**नीरा :** पुणे जिल्ह्यातील ग्रामिण भागातील पुरंदर, बारामती, फलटण, खंडाळा तालुक्याच्या सीमेवरील नेहमीच प्रवाशांच्या वर्दळीने गजबजलेले नीरा बसस्थानक आहे. पुरंदर तालुक्यातील नीरा बसस्थानकामध्ये सुमारे आठ महिन्यांपासून येणाऱ्या व जाणाऱ्या प्रवाशांना फुटलेल्या पाण्याच्या टाकीमुळे पिण्याच्या पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे. नीरा बसस्थानकातून पत्रव्यवहार करूनही पाण्याची टाकी बसविण्यास एसटी महामंडळ चालढकल करीत असून, महामंडळाच्या गलथान कारभाराविषयी प्रवासी नाराजी व्यक्त करीत आहे.

बारामती आगाराच्या अखत्यारित असलेल्या पुरंदर तालुक्यातील नीरा बसस्थानकात गेल्या आठ महिन्यांपासून प्रवाशांसाठी असणाऱ्या पिण्याच्या पाण्याची टाकी फुटल्याने टाकीत पाण्याचा साठाच होत नाही. नीरा गावाच्या सीमेवरून नीरा नदी वाहत असतानाही पिण्याच्या पाण्याच्या नळापाशी गेल्यानंतर नळातून पाणीच येत नसल्याने प्रवाशांना

निराशा होवून परतावे लागत आहे. नीरा बसस्थानकातील वाहतूक नियंत्रकांकडे प्रवाशांनी पिण्याच्या पाण्याबाबत चौकशी केली, तर पाण्याची टाकी फुटल्याने पाणी नळाला येत नाही, असे सांगितले जाते. काहीवेळा तर प्रवासी पिण्याचे पाणी नसल्याने एसटी महामंडळाच्या कारभाराबाबत उघडपणे नाराजी व्यक्त करीत आहेत.

नीरा बसस्थानकातून दररोज दोन हजारांच्या आसपास प्रवासी ये-जा करीत असतात. त्यामध्ये सर्वसामान्य कुटूंबातील प्रवाशांची संख्या मोठी आहे. मात्र, महामंडळाच्या गलथान कारभारामुळे प्रवाशांच्या वर्दळीचे असलेल्या नीरा बसस्थानकातील प्रवाशांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे, ही मोठी शोकांतिका आहे.

याबाबत नीरा बसस्थानकातील वाहतूक नियंत्रक मल्हारी भंडलकर, सतिश कुलकर्णी यांच्या कडे अधिक चौकशी केली असता, पाण्याची टाकी फुटल्याने प्रवाशांना पिण्यास पाणी मिळत नाही. याकरिता बारामतीच्या आगार व्यवस्थापकांकडे नीरा बसस्थानकात पिण्याच्या पाण्याकरिता नविन टाकी बसविण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आलेला असल्याचे त्यांनी सांगितले.

# घोडवरील पुलावर झालेल्या अपघातामुळे वाहतूक ठप्प

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**लोणी-धामणी :** लाखणगाव (ता. आंबेगाव) या ठिकाणी बेल्हा-जेजुरी या राज्य मार्गावर घोड नदीवरील पुलावर झालेल्या अपघातामुळे वाहतूक ठप्प झाली असून, गेली अनेक महिने या ठिकाणी नवीन पुलाचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याने जुना पुल वापरावा लागत असून त्याचा फटका वारंवार वाहतुकीस होत आहे. हा पुल कधी पुर्ण होणार याबाबतचा प्रश्न ग्रामस्थ व वाहनचालक विचारत आहेत.

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लाखणगाव या ठिकाणावरून बेल्हा जेजुरी राज्यमार्ग जातो. हा राज्यमार्ग सुरू झाल्याने मोठ्या प्रमाणावर वाहतूक या मार्गावरून होत असते. या महामार्गावर लाखणगाव या ठिकाणी घोड नदीवर नवीन पुल मंजूर झाला असून, या पुलाचे काम मागील अनेक महिन्यांपासून रखडले आहे. अर्धवट असलेल्या या पुलामुळे लाखणगाव या ठिकाणी जुन्या पुलावरून वाहतूक होत असते. जुना पूल कमी उंचीचा व कमी रुंदीचा आहे. एका बाजूला रस्त्याला मोठ्या प्रमाणात वळण आहे.



**मालवाहतूक ट्रक धडकला**

रविवारी मध्यरात्रीच्या वेळी झालेल्या अपघातामध्ये मालवाहतूक ट्रक पुलाच्या कठड्याला धडकल्याने पुलावरील वाहतुक बंद झाली असून, त्यामुळे वाहतुक ठप्प झाली आहे. त्यामुळे नवीन पुलाचे काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी आंबेगाव तालुका प्रक्रिया संस्थेचे अध्यक्ष सतिश रोडे पाटील, सरपंच प्राजक्त रोडे पाटील, माजी सरपंच दस्तगीर मुजावर, ग्रामस्थ व वाहन चालकांनी केली आहे.

त्यामुळे या ठिकाणी अपघात होत असतात. या आधीही या पुलावर अनेक वेळा अपघात होऊन वाहतूक ठप्प झाली होती.

तसेच पावसाळ्याच्या दिवसात या पुलावरून घोड नदीचे पाणी वाहत असल्याने वाहतूक ठप्प होते. मागे अनेक वर्षांपासून बेल्हा जेजुरी राज्यमार्ग सुरू असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक वाढली आहे. तथापि, लाखनगाव या ठिकाणी असणारा पुल अपूर्ण असल्याने, मोठ्या प्रमाणावर मनस्ताप होत आहे. त्यामुळे हा पूल लवकरात पूर्ण व्हावा अशी मागणी माझी सरपंच प्राजक्ता रोडे पाटील यांनी केली आहे.

या आधीही पुला बाबत अनेक वेळा प्रशासकीय अधिकारी व माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला जात असून, हा अपूर्ण पुल कधी पुर्ण होणार व मोठ्या प्रमाणावर होणारी गैरसोय कधी थांबणार याबाबत प्रश्नचिन्ह नागरिकांमध्ये आहे.

# ४२ शाळा सौर ऊर्जेने उजळून निघणार



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**खेड :** रोटरी क्लबच्या वतीने खेड, आंबेगाव, मावळ तालुक्यातील एकूण ४२ शाळांना सौरऊर्जा संच बसविण्यात आले असून, या शाळा विनाशुल्क उजळुन निघणार असल्याची माहिती राजगुरुनगर रोटरी क्लबचे अध्यक्ष राजन जांभळे यांनी दिली.

रोटरी क्लब ऑफ हिल्स साईड पुणे, युवा रोटरी क्लब पुणे, रोटरी क्लब ऑफ राजगुरुनगर, चाकण, तळेगाव दाभाडे यांच्या संयुक्त विद्यमाने व इमर्सन इलेक्ट्रिक इंडिया कंपनीच्या सहकार्याने हा प्रकल्प राबवण्यात आला आहे. या प्रकल्पाचे उद्‌घाटन शनिवारी राजगुरुनगर येथे महात्मा गांधी विद्यालयामध्ये करण्यात आले.

यावेळी इमर्सन कंपनीचे संचालक अभय बनसोड , वरिष्ठ व्यवस्थापक रविराज जाधव, महावितरणचे कार्यकारी अभियंता राजेंद्र एडके, रोटरी क्लब युवाच्या मीना बोराटे, रोटरी क्लब ऑफ हिल्स साईड पुणेचे अध्यक्ष अजय पवार, खजिनदार अदिती रहाणे, रोटरी क्लब ऑफ राजगुरुनगचे अध्यक्ष राजन जांभळे उपस्थित होते. राजगुरुनगर रोटरी क्लबचे अजित वाळुंज, सतीश नाईकरे, श्रीकांत गुजराथी , डॉ. कुणाल तांबे, दत्ता रुके, राहुल वाळुंज, प्रवीण वायकर, राजेंद्र बोराडे, अक्षय पाटोळे, जितेंद्र गुजराथी, निलेश गवते, मयुरीताई शिंदे तसेच सर्व शाळांचे मुख्याध्यापक शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना गोडसे यांनी केले, प्रास्ताविक अध्यक्ष रो. राजन जांभळे यांनी केले. आभार उपप्रांतपाल अजित वाळुंज यांनी मानले.

# सकल हिंदू समाजाकडून पहलगाम घटनेचा निषेध

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**शिक्रापूर :** पहलगाम मध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या हल्ल्यात काही पर्यटकांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली असताना सदर घटनेचा सकल हिंदू समाजाच्या वतीने निषेध व्यक्त करण्यात आला आहे.

शिक्रापूर, ता. शिरुर येथे सकल हिंदू समाजाच्या वतीने काश्मीर मध्ये पहलगाम येथे दहशतवाद्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करत घडलेल्या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला,

यावेळी भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष जयेश शिंदे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुकाध्यक्ष नवनाथ कांबळे, सरपंच रमेश गडदे, भारतीय जनता पार्टी ओबिसी मोर्चाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य नवनाथ भुजबळ, महिला आघाडी चिटणीस भाग्यश्री गायकवाड, राजेंद्र मांढरे, उत्तम गायकवाड, श्रीकांत सातपुते, अनिल नवले, ग्रामपंचायत सदस्य कृष्णा सासवडे, पंडित भुजबळ, विठ्ठल वाघ, भरत खोले, महेश चव्हाण यांसह आदी उपस्थित होते.

दरम्यान पाकिस्तान मुर्दाबाद, पाकिस्तान मुर्दाबाद तसेच जो हिंदू हित कि बात करेगा वही देश पे राज करेगा अशा घोषणा देत पहलगाम मध्ये दहशतवादी करणाऱ्यांवर कठोर शासन व्हावे अशी मागणी सरकारकडे करत घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला.




# उजनी पाणलोट क्षेत्रातील शेतकऱ्यांचा केळीकडे कल




■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**लोणी देवकर :** इंदापूर तालुक्यातील उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पळसदेव, चांडगाव, अगोती, वरकुटे बु, कालठण, पडस्थळ, शिरसोडी, माळवाडी आदींसह करमाळा तालुक्यातील कंदर, वाशिंबे, टाकळी, पोमलवाडी, खातगाव, कुगाव, चिकलठाण या एकेकाळच्या पारंपरिक साखरपट्ट्यात ऊस पिकाला फाटा देऊन शेतकरी केळी लागवड करताना दिसत आहेत.

साखरपट्ट्यात केळी पिकाच्या लागवडीखालील क्षेत्र वाढल्याने यावर्षी अनेक सहकारी व खासगी साखर कारखान्यांना आपला ऊस गळीत हंगामाचा गाशा उसाअभावी लवकरच गुंडाळावा लागू शकतो. आगामी काळात साखर कारखान्यांना ही धोक्याची घंटा मानली जात आहे. उजनी धरण पाणलोट परिसरातील शेतकरी आता, पारंपारिक ऊस पिकाला बगल देत, निर्यातक्षम दर्जाची केळी लागवड करायला पसंती देत आहेत. ऊस पीक तयार होऊन गाळपास लागणारा लागणारा कालावधी व गाळप होऊन प्रत्यक्ष हातात पैसै येण्यासाठी जास्त दिवस लागतात किंबहुना येतील की नाही याची देखील शाश्वती नसते. तुलनेत केळी पिकाचे पैसे तात्काळ मिळतात तर उसाचे पैसे वेळेवर मिळतीलच याची शाश्वती नाही. असा शेतकऱ्यांचा अनुभव आहे.

इंदापूर तालुक्यात एका साखर कारखान्याचे गाळप तर तब्बल तेरा लाख मे. टनावरून अडीच तीन लाख मे. टनांपर्यंत खाली आले आहे. करमाळा तालुक्यात अनेक कारखाने बंद असल्याने तालुक्याबाहेरील खासगी वा सहकारी साखर कारखान्याची मनधरणी करून ऊस गाळपासाठी द्यावा लागतो. अशा अनेक अडचणींचा सामना करीत शेतकरी केळी पिकाच्या लागवडीकडे वळाले असल्याचे दिसते. उजनी धरणाचे पाणलोट क्षेत्र आता केळीचे 'आगार' म्हणून नावारूपाला आले आहे. उजनी धरणाच्या दोन्ही बाजूला इंदापूर व करमाळा भागात केळी पिकाचे क्षेत्र वाढले. आता हा साखर पट्टा केळीचे आगार झाला आहे. पारंपारिकला ऊस पिकाला फाटा देऊन उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील शेतकरी केळी पिकाबरोबरच इतर फळपिकाकडे वळत आहे. केळी पिकामध्ये कांदा, हरभरा, कलिंगड, खरबूज, मिरची यासारखे पिके आंतरपिके घेतली जात आहेत. ऊसाप्रमाणेच केळी पिकालाही कोणतीही रोगराई नसली तरी वादळ वारे हे नैसर्गिक संकट मात्र मोठे आहे. देशात महाराष्ट्राबरोबरच गुजरात, आंध्र प्रदेश या राज्यात केळीचे मोठे उत्पादन होते; उजनीच्या परिसरात केळी पिकासाठी उपलब्ध असलेले कोरडे वातावरण व अनुकूल असलेली नैसर्गिक स्थिती, जमिनीची प्रतवारी यामुळे संपूर्ण वर्षभर केळी लागवड होत आहे.

### आखाती देशांतून मागणी

- उजनी लाभक्षेत्रातील केळीची प्रत चांगली असल्याने आखाती देशातून चांगली मागणी आहे. त्यामुळे दर ही मागील तीन ते चार वर्षापासून चांगला मिळत आहे. येथील शेतकऱ्यांनी प्रामुख्याने ग्रॅण्डनैन, वेलची, लाल केळी इत्यादी प्रकारची केळी लागवड केलेली आहे. येथील केळीला आखाती देशात मागणी आहे. तसेच खोडवा केळी पुणे, मुंबई सह उत्तर भारतातील मोठ्या शहरातून मागणी आहे. उजनी धरण पाणलोट क्षेत्र व लाभ क्षेत्रात वर्षभरात सुमारे पंधरा लाख मे. टन केळीचे उत्पादन होते. त्यापैकी चाळीस टक्के केळी स्थानिक बाजारपेठेत व देशातील इतर राज्यामध्ये विक्री होते. उर्वरित साठ टक्के केळीची आखाती देशात निर्यात होते.

# सुपे खुर्दमध्ये साकारले शिवछत्रपतींचे मंदिर



सुपे खुर्द (ता.पुरंदर) छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या सुपे खुर्द या ऐतिहासिक गावात स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर साकारले आहे. या मंदिरात बुधवारी अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर महाराजांच्या सिंहासनावरील मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना होणार आहे.

सुपे खुर्द येथील जय भवानी शिवजयंती उत्सव मंडळाच्या पुढाकाराने आणि लोकसहभागातून हे मंदिर उभारण्यात आले आहे. जे पुरंदर तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचे पहिलेच मंदिर आहे. या ऐतिहासिक सोहळ्यानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्राचा आणि कार्याचा जागर होण्यासाठी जय भवानी शिवजयंती उत्सव मंडळ, सुपे खुर्द यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शिवछत्रपतींचे हे पुरंदर तालुक्यातील पहिलेच मंदीर आहे. मंडळाच्या वतीने दररोज शिवपूजन, आरती केली जाणार आहे. याकामी माजी आमदार संजय जगताप यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. तालुक्यातील प्रत्येक गावात निमंत्रण पत्रिका देऊन कार्यक्रमाला येण्याचे आवाहन करण्यात आले असल्याचे जय भवानी तरूण मंडळाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

मंगळवारी (दि. २९) सकाळी ६ वा किल्ले पुरंदरकडे शिवज्योत आणण्यासाठी प्रस्थान होणार असून, दुपारी ४ वा. सासवड येथील शिवतीर्थ चौकातून सुपे खुर्द गावापर्यंत भव्य मूर्ती आणि शिवज्योत मिरवणूक काढण्यात येणार आहे. माजी आमदार संजय जगताप यांच्या हस्ते मूर्तीपूजन होणार आहे.

बुधवारी (दि. ३०) दुपारी २ ते ५ पर्यंत मंदिरात शिवहवन आणि सायंकाळी ५ वा. श्री छत्रपती शिवाजी महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळा संपन्न होणार आहे.

याच दिवशी रात्री ९ वा. शिवव्याख्याते प्रमोद महाराज कारकर आणि श्रद्धा जगताप यांचे शिवचरित्रावर व्याख्यान होणार आहे.

गुरुवारी दिनांक १ मे रोजी रात्री ९ वा. ऐतिहासिक चित्रपटाचे आयोजन करण्यात आले असून शुक्रवारी ( दि. २ मे) रात्री ९ वा. संदिप मोहिते (तिप्पेहळ्ळी) आणि आण्णा चव्हाण (वायफळ, जत) यांचा भारूडातून विनोदी जुगलबंदीचा कार्यक्रम होणार आहे.

## गुणवत्ता अभियानात पंडित नेहरू विद्यालय प्रथम



**लोणी- धामणी :** पुणे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग व पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या गुणवत्ता संवर्धन अभिमान २०२४-२०२५ मध्ये पुणे जिल्हा ग्रामीण विभाग ५०० विद्यार्थी संख्या पुढील गटात निरगुडसर (ता.आंबेगाव) येथील पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक व दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालय आंबेगाव तालुक्यात प्रथम क्रमांकाचे यश प्राप्त केले असल्याची माहिती विद्यालयाचे प्राचार्य कांताराम टाव्हरे यांनी दिली आहे. गुणवत्ता संवर्धन अभियानाचा पारितोषिक वितरण कार्यक्रम नुकताच स्वारगेट-पुणे येथील गणेश कला क्रिडा रंगमंच येथे संपन्न झाला. यावेळी पुणे जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष नंदकुमार सागर, सचिव प्रसाद गायकवाड आदि मान्यवर उपस्थित होते. तसेच विद्यालयाचे प्राचार्य कांताराम टाव्हरे, पर्यवेक्षक संतोष वळसे, माजी प्राचार्या सुनंदा गोरे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारीही उपस्थित होते. गुणवत्ता संवधर्नात तालुक्यात प्रथम क्रमांक आल्याने निरगुडेश्वर शिक्षण विकास मंडळाचे अध्यक्ष ॲड. प्रदिप वळसे पाटील, उपाध्याक्ष रामदास वळसे पाटील, सचिव प्रकाश तापकीर, सर्व संचालक, पालक, माजी विद्यार्थी व ग्रामस्थांच्या वतीने विद्यालयाचे अभिनंदन करण्यात आले.

## निमगाव म्हाळुंगीत किरकोळ वादातून इसमाला मारहाण



**शिक्रापूर :** निमगाव म्हाळुंगी, ता. शिरुर येथे स्मशानभूमी जवळ रोहित कुसाळे हा युवक बसलेला असताना, अभिषेक चव्हाण याने रोहितच्या तोडावर बॅटरी चमकवल्याने रोहित याने बॅटरी का चमकवली, असे विचारले. त्यावर अभिषेक चव्हाण, आशिष चव्हाण व संस्कार चव्हाण यांनी रोहितला मारहाण केली. दरम्यान, रोहित पळून जात असताना पुन्हा अभिषेकच्या कुटुंबियांनी रोहितला अडवून त्याला बेदम मारहाण केली. यावेळी रोहितच्या खिशातील एकोणीस हजार रुपये देखील गहाळ झाले. याबाबत रोहित रमेश कुसाळे (२५ वर्षे, रा. निमगाव म्हाळुंगी ता. शिरुर) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली असून, पोलिसांनी अभिषेक उमेश चव्हाण, आशिष सुरेश चव्हाण, संस्कार सुनील चव्हाण, सुनील निळोबा चव्हाण, अनिकेत उमेश चव्हाण, उमेश शंकर चव्हाण, सुरेश शंकर चव्हाण यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला.

## देश एकसंघ राहिला पाहिजे



**सासवड :** देशात सध्या आतंकवादी कारवाया वाढल्या आहेत. काशमीरमध्ये पर्यटकांवर जो भ्याड हल्ला करून नाहक लोकांचे बळी गेले, या गोष्टीचा जाहीर निषेध व्यक्त करत आहे. देशातील सर्वधर्म समभाव ही भावना कायम राहिली पाहिजे. कोणत्याही जातीधर्माचा द्वेष करुन चालणार नाही, तर सर्वांना समान हक्क आहे. हा देश संविधानावर चाललेला असून, शाहु फुले आंबेडकर यांच्या विचारांवर विश्वास ठेवणारा हा देश आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी येथे केले. सारथी रावसाहेब पवार यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सासवड येथील आचार्य अत्रे सभागृहात कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, यावेळी ते बोलत होते. खा सुप्रिया सुळे, कुमार सप्तर्षी, बाळासाहेब शिवरकर, माजी आमदार संजय जगताप, अशोक टेकवडे, दिगंबर दुर्गाडे, सुदामराव इंगळे, माणिकराव झेंडेपाटील, बळवंतराव गरुड, संदिप टिळेकर, ज्ञानेश्वर बाठे, शामकांत भिंताडे, अभिजित जगताप, विजय कोलते यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. पहलगाम दहशतवादी हल्ल्यात जे पर्यटक मृत्यूमुखी पडले, त्यांना यावेळी श्रद्धांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन सारथी रावसाहेब पवार मित्रपरिवार यांच्या वतीने करण्यात आले होते.

## विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

**महाळुंगे :** खराबवाडी गावातील स्पाईन सिटी वसाहतीतील भाड्याच्या फ्लॅटमध्ये राहणाऱ्या २१ वर्षीय विवाहित महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. पूजा गजानन निरवळ (२१ वर्ष, रा. शेलवाडी, ता. शेलू, जि. परभणी) असे आत्महत्या केलेल्या नवविवाहितेचं नाव आहे. कौटुंबिक कारणातून प्रथमदर्शी आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली असल्याची माहिती मिळाली आहे. यावेळी तात्काळ आपत्ती व्यवस्थापन टिमचे शांताराम गाडे, श्रीकांत बिरदवडे घटनास्थळी पोहचून त्यांनी आतून बंद असलेला दरवाजा खोलून आत्महत्या केलेल्या महिलेला बाहेर काढले. त्यानंतर महाळुंगे एमआईडीसी पोलिसांना माहिती देऊन पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अनिस मुल्ला, पोलीस शिपाई हरी शिंदे, दिपक पाटील यांनी पंचनामा करून मृतदेह शवव्हिच्छेदन करण्यासाठी चाकण ग्रामीण रुग्णालयात दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास महाळुंगे एमआईडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस करत आहेत.

# वीजपुरवठ्याच्या तक्रारींसाठी टोल फ्री क्रमांक वापरा

### महावितरणचे आवाहन




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** वीजपुरवठा खंडित झाल्यास वीज कर्मचारी किंवा त्यांच्या वरिष्ठांना फोन करुन वेळ वाया घालविण्यापेक्षा वीजग्राहकांनी २४ तास सुरु असलेल्या १९१२, १८००२३३४३५ व १८००२१२३४३५ या तीन पैकी एका टोल फ्री क्रमांकावर वीजपुरवठा व वीजबिलासंबंधिच्या तक्रारीं नोंदवाव्यात, असे आवाहन महावितरणने केले आहे. महावितरणची यंत्रणा टोल फ्री क्रमांकावर मिळालेल्या तक्रारींचा वेळेत निपटारा करण्यासाठी २४ तास कार्यरत आहे, असे महावितरणने स्पष्ट केले आहे.

राज्यातील वीज ग्राहकांची संख्या तीन कोटींच्या घरात तर बारामती परिमंडलाची ३० लाखांत आहे. या सर्व ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा करण्यासाठी तसेच त्यांनी वापरलेल्या विजेचे अचूक देयक तयार करण्यासाठी महावितरण कायम प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करते. ग्राहकांच्या मीटरपर्यंत येणारी वीज हजारो किलोमीटरच्या जाळ्यातून येते. यामध्ये अनेक रस्ते अपघात, नैसर्गिक व मानवनिर्मित अडथळे येतात. त्यामुळे वीजपुरवठा खंडित झाल्याची तक्रार महावितरणला वेळेत व नेमक्या ठिकाणांसह मिळाली तर ती वेळेत निकाली काढून तेथील ग्राहकांचा वीजपुरवठा सुरळीत करणे शक्य होते. मात्र सद्यस्थितीत ग्राहक ऑनलाईन पेक्षा वैयक्तिक तक्रारींवर जादा भर देत असल्याने यंत्रणेचा वेळ खर्ची जात आहे.

विजेचे जाळे सर्वदूर पसरलेले असले तरी महावितरणची सेवा मध्यवर्ती ग्राहक सेवा केंद्राने सर्वांना सहज व २४ तास उपलब्ध आहे. महावितरणची सेवा केंद्रे शेकडो कर्मचाऱ्यांसह २४ तास कार्यरत आहेत. त्यासाठी ग्राहकांनी वीजपुरवठा व वीजबिलासंबंधी तक्रार नोंदविण्याकरिता टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. हे क्रमांक संकेतस्थळावर व वीजबिलावर प्रकाशित केले आहेत. तक्रार नोंदविताना ग्राहकांनी त्यांचा १२ अंकी ग्राहक क्रमांक नोंदविल्यास महावितरणला त्या ग्राहकाशी संबंधित माहिती उपलब्ध होते. त्यामुळे फॉल्ट शोधण्यासाठी वेळ वाया जात नाही. ती तक्रार थेट संबंधित शाखा कार्यालयाला वर्ग होते. तसेच तक्रारीची नोंद ऑनलाईन प्रणालीत झाल्यामुळे वीज नियामक आयोगाने घालून दिलेल्या कृती मानकांनुसार वेळेत सोडवणे बंधनकारक बनते.

“ महावितरणच्या बहुतांश ग्राहक सेवा ऑनलाईन झालेल्या आहेत. त्यासाठी ग्राहकांनी महावितरणचे ॲप प्लेस्टोअर किंवा ॲपस्टोअरहून डाऊनलोड करावे. यामध्ये एकापेक्षा जास्त वीज जोडण्या एकदाच नोंदणी करुन हाताळता येतात. याशिवाय महावितरणच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावरही ग्राहक सेवा स्वतंत्रपणे दिल्या आहेत. ग्राहकांना घरबसल्या या सेवांचा लाभ घेता येतो.

**जनसंपर्क अधिकारी,**
महावितरण, बारामती परिमंडल

### फोनवर केलेल्या तक्रारींची नोंद नसते

● ज्याप्रमाणे टोल फ्री क्रमांकावर आलेल्या तक्रारींची नोंद ऑनलाईन प्रणालीत होते. त्याउलट एखाद्या वीज कर्मचाऱ्याला फोनवर आलेल्या तक्रारींची नोंद होत नाही. कारण ज्यावेळी एखाद्या भागाचा वीजपुरवठा खंडित होतो, तेंव्हा एकाच वेळी त्याला अनेक फोन येतात. प्रत्येक जण त्याचे नाव, पत्ता सांगण्यात वेळ घालवतो. तसेच फोन चालू असल्यामुळे त्याला फॉल्ट शोधता येत नाही. खांबावर किंवा वीज वाहिनीवर काम करताना घेतलेला कॉल त्याचा जिवावरही बेतू शकतो. त्यामुळे वैयक्तिक फोन करणे टाळावे.

## मुस्लिम बांधवांनी केला दहशतवादी हल्ल्याचा निषेध



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** जम्मू काश्मीर येथील पहलगाम या पर्यटन स्थळांच्या ठिकाणी बेछुटपणे भारतीय पर्यटकांवर जो भ्याड हल्ला केला, त्या अनुषंगाने येथील मुस्लिम बांधवांनी छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोर तीव्र असा निषेध व्यक्त केला. भारत माता की जय, वंदेमातरम, पाकिस्तान मुर्दाबाद अशा घोषणा मुस्लिम बांधवांनी दिल्या.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून छत्रपती शिवाजी महाराज की जय, छत्रपती संभाजी महाराज की जय अशा घोषणाही देण्यात आल्या व पाकिस्तानी अतिरेक्यांचा व पाकिस्तानचा निषेध करण्यात आला. सासवड पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी यांना यावेळी निवेदन देण्यात आले. एबीसी संघटनेचे अध्यक्ष आरीफ अत्तार, मुस्लिम समाज अध्यक्ष मा. नगरसेवक हारून बागवान, सासवड शहर अल्पसंख्याक अध्यक्ष मोबीन बागवान, बीजेपी अल्पसंख्याक अध्यक्ष बंडू अत्तार,ॲड अशपाक बागवान, हाजी इस्माईल पिंजारी, हाजी परवेज शिकलकर, अबीद अत्तार, हाजी दिलावर बागवान, शकील बागवान, समीर बागवान, साकीब बागवान, खुदा बागवान, बब्लु तांबोळी, अनिस अत्तार, जुबेर काझी, मौलाना शमशुद्दीन, भैय्या आतार, नवाज बागवान आदी अनेक मुस्लिम बांधव यावेळी उपस्थित होते.

## ग्रामस्थांच्या अडचणी सोडविण्यासाठी कटिबद्ध - वळसे पाटील



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** धामणी (ता. आंबेगाव) येथील गावांसाठी ग्रामस्थांनी मागणी केलेली विविध विकासकामे,अडीअडचणी सोडविण्यासाठी कटिबद्ध राहील, असा विश्वास माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केला.

भीमाशंकर कारखान्याच्या कार्यस्थळावर माजी सहकारमंत्री वळसे पाटील यांनी धामणी ग्रामस्थांसबोत विविध समस्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, भीमाशंकर कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब बेंडे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, अनिल वाळुंज, रवींद्र करंजखेले, धामणी सरपंच रेश्मा बोराडे, उपसरपंच अक्षय विधाटे, माजी सरपंच सागर जाधव, संतोष करंजखेले, धामणी गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते.

सहकारी संस्थांच्या कर्जाच्या आधारावर सुरू असलेल्या पाणी योजनेला शासकीय अनुदान मिळावे अशी मागणी यावेळी शेतकऱ्यांनी केली. भैरवनाथ मंदिर, प्राथमिक आरोग्य केंद्र यामधील संरक्षक भिंत बांधकामासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देणार असल्याचे वळसे पाटील यांनी सांगितले. तसेच धामणी येथे सहा कोटी रुपये निधीतून उभारण्यात येत असलेल्या नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या कामाचा त्यांनी आढावा घेतला. सदर काम अंतिम टप्प्यात असून नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा लवकर उपलब्ध होण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना केल्या आहेत. धामणी गावचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आणि ग्रामस्थांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणार असल्याचेही वळसे पाटील यांनी यावेळी सांगितले.

# पुरंदरच्या सतीश शिंदे यांची एव्हरेस्टवर चढाई



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुरंदर तालुक्यातील सोनोरी गावचे माजी सरपंच सतीश शिंदे यांनी खडतर व साहसी चढाई करत एव्हरेस्ट बेस कॅम्पवर भारताचा तिरंगा फडकवला. त्यांच्या या यशाबद्दल शाबासकीची थाप म्हणून सासवड येथील आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान व पुरंदर ट्रेकर्स ग्रुपच्या वतीने त्यांना सन्मानित करण्यात आले.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते, साहित्य परिषद सासवडचे अध्यक्ष ॲड दिलीप निरगुडे, माजी सनदी अधिकारी संभाजी झेंडे या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शाल श्रीफळ व पुस्तक भेट देऊन शिंदे यांना सन्मानीत करण्यात आले

सतीश शिंदे यांनी केलेल्या कामगिरीचे अभिनंदन करत या पुढे त्यांनी तालुक्यातील ट्रेकर्स व गिर्यारोहक यांना मार्गदर्शन करावे अशी अपेक्षा विजय कोलते यांनी व्यक्त केली.

संभाजी झेंडे यांनी त्यांच्या जिद्दीचे आपल्या मनोगतातून कौतुक केले.

प्रा किशोरी ताकवले, गिरीश कर्नावट, तानाजी सातव, माऊली गिरमे, शांताराम पोमण, बाळासाहेब जगताप, संजय कुंभारकर, दिलीप निरगुडे यांनी या प्रसंगी शिंदे यांचे अभिनंदन केले. डॉ राजेश दळवी यांनी सूत्रसंचालन केले.

आपल्या मनोगतात शिंदे यांनी मोहिमेत १४ दिवस दिडशे किलोमीटर अंतर, उणे तापमान ,प्रवासाचा थरार, आलेली संकटे, वातावरणातील बदल, आवश्यक असणारा संयम, मानसिक स्थिती यावर सुंदर भाष्य केले.

माझ्या या उपक्रमाची सुरुवात विजय कोलते यांच्या प्रेरणेने व पुरंदर ट्रेकर्स यांच्यामुळे झाली आहे असेही त्यांनी यावेळी सत्काराला उत्तर देताना नमूद केले भविष्यात तालुक्यात हौशी गिर्यारोहक व ट्रेकर्स यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रयत्न केले जातील असेही सतीश शिंदे यांनी सांगितले.

कुंडलिक मेमाणे, युसुफ सय्यद, वसंत ताकवले, अरुण यादव, तानाजी घारे, बाळासाहेब मुळीक, दत्ता राऊत, अंकुर शिवरकर, अजित चौखंडे, नितीन पवार, शरद बोबडे, बंडूकाका जगताप, गणेश मोरे शांताराम कोलते दादा मुळीक, अक्षय पवार, बाळासाहेब कुलकर्णी, हेमंत ताकवले यांसह अनेक पर्यावरणप्रेमी व मान्यवर या कार्यक्रमात उपस्थित होते.

# श्रीकांत बोलाचा बोलबाला

अलिकडेच 'श्रीकांत' नावाच्या चित्रपटाचा ट्रेलर यूट्यूबवर लाँच करण्यात आला. हा ट्रेलर सध्या ट्रेंडमध्ये आहे. मित्रांनो, काल्पनिक वाटणारा हा ट्रेलर वास्तविक जीवनातील पात्राच्या जीवनावर आधारित आहे. उद्योगपती श्रीकांत बोला यांनी नशिबाला किंवा व्यवस्थेला दोष देण्याऐवजी मेहनत, प्रामाणिकता आणि काहीतरी करण्याची जिद्द यातून हवे ते कसे साध्य केले हे यात दाखवले आहे. त्यामुळेच या अचिव्हरची माहिती घ्यायला हवी.

श्रीकांतचा जन्म आंध्र प्रदेशातील शेतकरी कुटुंबात झाला. आई-वडील शेती करायचे. पण त्यांनी श्रीकांतला नेहमी अभ्यास आणि लेखन करण्यास प्रवृत्त केले. अनेकवेळा शेजाऱ्यांनी वडिलांना सांगितले की, तुझा मुलगा अंध आहे, त्याला शिक्षण देऊन काय करणार? हे मूल तुम्हाला म्हातारपणात साथ देऊ शकणार नाही, असेही अनेकांनी सांगितले. त्याच्या देखभालीवर कोणताही खर्च करण्याची गरज नसल्याचे काहींचे म्हणणे होते. पण श्रीकांतच्या आई-वडिलांनी या सगळ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून आपल्या मुलाला केवळ शिकवलंच नाही तर प्रत्येक पावलावर त्याच्या पाठीशी उभे राहिले.

अचिव्हर

१० वी पूर्ण केल्यानंतर अंधत्व घेऊन जन्मलेल्या श्रीकांतने विज्ञान आणि गणिताचा अभ्यास करून अभियांत्रिकीमध्ये करिअर करण्याचे ठरवले. पण तो शिकत असणाऱ्या शाळेने एका अंध विद्यार्थ्याला सायन्समध्ये प्रवेश देण्यास नकार दिला. यानंतर श्रीकांत प्रवेशासाठी अनेक शाळांमध्ये गेला. परंतु सर्वत्र त्याला विज्ञानाचा अभ्यास करणे अंध विद्यार्थ्यासाठी धोकादायक असल्याचे सांगून नकारण्यात आले. पण तो सर्व काही शांतपणे सहन करणारा नव्हता. शाळेच्या या निर्णयाविरोधात त्याने आंध्र प्रदेश उच्च न्यायालयात धाव घेतली. बोला हा खटला तर जिंकलाच पण त्यानंतर आंध्र प्रदेशचा शिक्षण कायदाही बदलण्यात आला. आता सर्व अंध विद्यार्थ्यांना विज्ञानाचा अभ्यास करता येणार होता. सहा महिन्यांच्या प्रदीर्घ लढाईनंतर श्रीकांतने केस जिंकली आणि ११ वीमध्ये विज्ञान-गणिताचा अभ्यास सुरू केला. श्रीकांतने १२वीत ९८ टक्के गुण मिळवले आणि तो टॉपर ठरला. आता लोकांनी हे मान्य केले होते की, श्रीकांत बोला आंधळा आहे, पण तो कुणापेक्षाही कमी नाही. मात्र इतके चांगले गुण मिळवूनही केवळ अंध असल्यामुळे आयआयटीने त्याला प्रवेश देण्यास नकार दिला.

आयआयटीमधून नाकारल्यानंतर श्रीकांत निराश झाला होता, पण त्याच्या डोळ्यांमध्ये इंजिनिअर होण्याचे स्वप्न



अजूनही जिवंत होते. यानंतर त्याने एमआयटी केंब्रिजमध्ये अर्ज केला. तिथे त्याची निवड झाली. येथे मॅनेजमेंट सायन्स शिकणारा तो पहिला आंतरराष्ट्रीय अंध विद्यार्थी बनला. एमआयटीमधून पदवी घेतल्यानंतर श्रीकांतला भारतात आणि परदेशातील कंपन्यांनी चांगल्या पॅकेजवर नोकरीची ऑफर दिली. मात्र त्याने नाकारल्या. प्रत्येक व्यक्ती आपल्यासारखी कठीण लढाई लढू शकत नाही हे त्याला समजले होते. त्यामुळे त्याला भारतातच कंपनी सुरू करायची होती, जिथे त्यांच्यासारख्या विशेष दिव्यांगांना काम मिळू शकेल. २०१२ मध्ये श्रीकांत बोलाने 'बोलंट इंडस्ट्रीज; सुरू केले. रतन टाटा सारख्या लोकांनी या कंपनीत गुंतवणूक केली आहे. पॅकेजिंग सोल्यूशन्स देणारी ही कंपनी आज सुमारे ६०० दिव्यांगाना रोजगार आणि सन्मानाचे जीणे देते.

## फंडू एसएमएस

जिंदगी यूँही बहुत कम है
मोहब्बत के लिए,
फिर एक दुसरे से रूठकर
वक्त गँवाने की क्या जरूरत है।

नहीं बसती किसी और की सूरत
अब इन आंखो में,
काश की हमने तुझे,
इतने गौर से ना देखा होता।

काम ऐसा करो की
फेसबुकही नहीं,
जिंदगी में भी लाईक मिले।

## हाऊ टू?

### डाउनलोड इन्स्टा रिल्स व्हिडिओ




टिकटॉकवरील बंदीनंतर इन्स्टाग्राम रिल्स बरंच लोकप्रिय झालं आहे. रिल्सवरून छोटे व्हिडिओ तयार करून शेअर केले जातात. रिल्समधला आवडता व्हिडिओ तुम्ही डाउनलोड करू शकता. यासाठी व्हिडिओ डाउनलोडर फॉर इन्स्टाग्राम ॲप डाउनलोड करा. ॲप सुरू करून आयडी नोंदवा. आता इन्स्टा ॲपमध्ये जाऊन आवडता रिल व्हिडिओ निवडा. यानंतर तीन डॉट्सवर क्लिक करून लिंक कॉपी करा. यानंतर डाउनलोडर ॲप ओपन करा. इथे लिंक पेस्ट होईल. तुमच्या मोबाईल गॅलरीमध्ये रिल्स व्हिडिओ सेव्ह होईल.

## सोशल मीडिया

### ...पुढे धोका आहे

ॲपलने आयफोनवर पेगासससारखा स्पायवेअर हल्ला होण्याचा धोका व्यक्त केला आहे. एका रिपोर्टनुसार, 'मर्सेनरी स्पायवेअर'च्या माध्यमातून आयफोन यूजर्सना टार्गेट केले जात आहे. याद्वारे आयफोनमध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न केला जात आहे. या संदर्भात, भारतासह ९१ देशांमधील वापरकर्त्यांना एक मेल पाठवण्यात आला आहे. तुम्ही 'भाडोत्री स्पायवेअर' हल्ल्याचे संभाव्य बळी ठरू शकता, असे सूचित केले आहे. हे स्पायवेअर इस्रायलच्या एनएसओ ग्रुपच्या पेगासससारखे आहे. डिव्हाइसवर अनधिकृत प्रवेश मिळवणे हा त्याचा उद्देश आहे. भाडोत्री स्पायवेअर हल्लेखोर काही विशिष्ट लोकांना आणि त्यांच्या उपकरणांना लक्ष्य करण्यासाठी प्रचंड संसाधने वापरतात.



## ॲप वर्ल्ड

### नवी 'पल्सर एन २५०'

बजाज ऑटोने पल्सर लाइनअप बाईक 'पल्सर एन २५०' लाँच केली आहे, तिची प्रारंभिक किंमत १.५१ लाख रुपये (एक्स-शोरूम) आहे. यात २४९ सीसी इंजिन आहे. एन २५० हे ट्रॅक्शन कंट्रोल असणारे पहिले पल्सर मॉडेल आहे. हे सेन्सर्सच्या मदतीने चाकाचा वेग आणि इंजिन पॉवरचे निरीक्षण करते आणि चाक फिरण्याच्या बाबतीत ब्रेक लागू करते. कंपनीने बाईकच्या फ्रंट सस्पेन्शन सिस्टिममध्येही बदल करण्यात आले आहेत. एन २५० मध्ये ट्विन एलईडी प्रोजेक्टर हेडलॅम्प आणि एलईडी डीआरएल आहेत. 'पल्सर एन २५०' मध्ये नवीन ग्राफिक्सही देण्यात आले आहेत. कंपनीने ही बाईक ग्लॉसी रेसिंग रेड, ब्रुकलिन ब्लॅक आणि पर्ल मेटॅलिक व्हाईट या तीन रंगांच्या पर्यायांमध्ये लॉन्च केली आहे.



## स्मार्ट इन्फो

### दोन्ही बाजू ऐका

बऱ्याचदा कार्यालयीन परिस्थितींमध्ये, लोक आपला दीर्घकाळ दडपलेला राग किंवा चिडचिड बाहेर काढण्यासाठी कोणीतरी किंवा काहीतरी शोधत असतात. संधी मिळते तेव्हा ते आपल्या पद्धतीने व्यक्त होतात. या दरम्यान त्यांना कधी थांबायचे आहे, कुठे थांबायचे आहे, किती बोलायचे आहे आणि पुढे कसे जायचे आहे हे समजत नाही. पण ग्रुपमध्ये वावरताना तुम्ही ही परिस्थिती समंजसपणे हाताळायला हवी. तुम्ही मध्यस्थ म्हणून भूमिका बजावत असाल तर दोन्ही पक्षांची मते ऐकून घ्या. कोणाच्याही मतांसोबत उभे राहणे टाळा. जर तुमच्यावर कोठूनही कोणाचा तरी पक्षपातीपणा दाखवण्यासाठी दबाव आणला जात असेल तर तुम्ही असे अजिबात करणार नाही, हे लगेच स्पष्ट करा.



# मिळवा सरकारी नोकरी



आज नोकरीचे असंख्य पर्याय उपलब्ध असले तरी सरकारी नोकरीचं आकर्षण अद्यापही कमी झालेलं नाही. सरकारी नोकरीची तुलना कशाशीही होऊ शकत नाही. सरकारी नोकरी म्हणजे भरपूर पगार आणि आर्थिक स्थैर्य ही संकल्पना समाजमनात दृढ झालेली आहे. इंजिनिअरींगनंतरही तुम्ही सरकारी नोकरी मिळवू शकता. इंजिनिअरींगच्या कोणत्या शाखा सरकारी नोकरीत चांगली संधी देतात याविषयी जाणून घेऊ या.

करीअर ग्रोथ

✻ 'इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग'मध्ये पदवी मिळवल्यानंतर तुम्हाला खाजगी क्षेत्रात अनेक संधी मिळत असल्या तरी सरकारी नोकरी मिळवण्याची इच्छा असेल तर राज्य विद्युत महामंडळ, भारतीय रेल्वे, भारत हेवी इलेक्ट्रिकल लिमिटेड, भारतीय लष्कर, नौदल, हवाई दल, संरक्षण संशोधन आणि विकास संस्था या ठिकाणी अर्ज करू शकता.

✻ 'मॅकेनिकल इंजिनिअरींग' नंतर भारतीय हवाई दल, रेल्वे, लष्कर, डीआरडीओ, भेल, पीडब्ल्यूडी अशा ठिकाणी सरकारी नोकरीसाठी अर्ज करण्याची संधी मिळते.

✻ 'बायोटेक्नॉलॉजी'चे विद्यार्थी फॉरेन्सिक विभागात नोकरी करू शकतात. या क्षेत्रात संशोधन करण्यासाठी सरकारकडून निधीही मिळतो.

✻ 'सिव्हिल इंजिनिअरींग' करून वाहतूक क्षेत्रात करीअर करता येईल. तसंच पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देणाऱ्या शासकीय संस्थांमध्येही संधी आहेत.

# लिंबू एक, उपाय अनेक



भर उन्हातून आल्यानंतर गारेगार लिंबूसरबत पिण्याची मजाच काही वेगळी. मित्रांनो, लिंबू हे एक उन्हाळी फळ आहे जे रुचकर सरबताबरोबरच जेवणाची चव तर वाढवतेच पण आपल्या आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. हे फळ अनेक प्रकारे वापरले जाऊ शकते. अन्न म्हणून, आरोग्यासाठी किंवा सौंदर्य वाढविण्यासाठी देखील त्याचा वापर होऊ शकतो. लिंबामध्ये व्हिटॅमिन सी तसेच व्हिटॅमिन ए आणि बी, फायबर, प्रोटीन, कॅल्शियम, लोह, जस्त, पोटॅशियम, मॅग्नेशियम, सोडियम, फॉस्फरस, कॉपर, क्लोरीन, थायामिन, पॅन्टोथेनिक सिड, फोलेट इत्यादी अनेक गुणधर्म आढळतात. लिंबू अनेक प्रकारच्या रोगांपासून बचाव करण्यासाठी प्रभावी आहे. म्हणूनच लिंबाचे अनेक फायदे जाणून घेऊन त्याचा वापर करायला हवा.

टेस्ट स्टोरी

* रोगप्रतिकारशक्ती मजबूत करण्यासोबतच लिंबाचा रस उपयुक्त ठरतो. लठ्ठपणा कमी करण्यासही तो मदत करतो. दुसरीकडे वजन वाढवायचे असेल तर लिंबामध्ये एक चमचा साखर मिसळून त्याचा रस रोज प्या.

* लिंबू केसांसाठी देखील फायदेशीर आहे. ते केसांवर लावल्यास कोंडाचा प्रभाव कमी होतो.

* यामध्ये व्हिटॅमिन सी आढळते, जे हाडे मजबूत करण्यासाठी फायदेशीर आहे.

* त्वचेचे तकाकी वाढवण्यासाठी कच्च्या दुधात लिंबाचा रस मिसळून चेहऱ्यावर लावल्याने चेहऱ्यावरील सर्व डाग दूर होतात.

* तुम्हाला खूप दिवसांपासून उचकी येत असेल तर लिंबाच्या रसामध्ये दोन चमचे काळे मीठ आणि एक चमचा मध मिसळून प्या. त्रास कमी होईल.

* चेहऱ्यावर कोणत्याही प्रकारचे डाग असतील तर तुम्ही फेस पॅक म्हणून लिंबाचा रस वापरू शकता.

* पाण्यात लिंबाचा रस टाका आणि त्याने टाच स्वच्छ करा. उन्हाळ्यात तळपायाची आग कमी करण्यासाठीही कामी येणारा हा उपाय आहे.

* पोटाशी संबंधित समस्यांपासून सुटका मिळवण्यासाठी सकाळी नियमितपणे मधासोबत लिंबाचा रस घ्या. यामुळे बद्धकोष्ठतेची समस्याही दूर होते.

* लिंबाच्या सालीने कोपर स्वच्छ केल्याने काळेपणा दूर होतो.

# ट्रेंड पारंपरिक प्रिंट्सचा

दोस्तांनो, मध्यंतरी व्होकल फॉर लोकलची हाक देण्यात आली. भारतीय कंपन्या, भारतीय उत्पादनांच्या वापरावर भर देण्यात आला. तुम्ही तुमच्या वॉर्डरोबमध्येही लोकल प्रिंट्सचा समावेश करू शकता. पारंपरिक प्रिंट्सचे शर्ट, बॉटम्स, शॉर्टसची खरेदी करून तुमच्या स्टायलिंगची पद्धतच बदलू शकता. उन्हाळ्यात जास्तच स्टायलिश दिसायचं असेल तर काही पारंपरिक प्रिंट्चे कपडे खरेदी करा.

✻ महिला इक्कत प्रिंटच्या साड्या, सलवार कमीझ वापरतात. तुम्ही मुलं इक्कतचे शर्ट कॅरी करू शकता. इक्कत प्रिंटवाले शर्ट लिननच्या बेज रंगाच्या ट्राउझर्ससोबत घाला आणि कोणत्याही ऑकेजनची शान ठरा.

फॅशन पॅशन

✻ पेसली प्रिंटवाले शर्टही खूप सुंदर दिसतील. आकाशी रंगाचा पेसली प्रिंटवाला शर्ट घ्या. हा शर्ट जीन्स आणि ट्राउझर्स अशा दोहोंवर कॅरी करता येईल.

✻ बांधणी प्रिंट्सही महिलांच्या कपड्यांपुरते मर्यादित राहिलेले नाहीत. बांधणी मुलांच्या वॉर्डरोबचा भाग बनू शकतात. बांधणी प्रिंटवाला शर्ट आणि चिनोज हे कॉम्बिनेशन हिट ठरेल.

✻ तुम्ही लेहरिया प्रिंटही ट्राय करू शकता. लेहरिया प्रिंटवाला शर्ट किंवा शॉर्ट कुर्ता आणि लिननची व्हाईट ट्राउझर हटके दिसेल.

हिप्पी समुदायामुळे भारतात बंदाना प्रिंट खूपच लोकप्रिय झालं होतं. बंदाना प्रिंटवाला लाल रंगाचा शर्ट आणि पांढरी ट्राउझर असा लूक करता येईल.

# ट्रेडमिलवर व्यायाम करताना

मित्रांनो, जीममध्ये गेल्यावर ट्रेडमिलवर धावण्याला अनेकांची पसंती असते. अनेकांच्या घरातही ट्रेडमिल असतं. आता हे ट्रेडमिल वापरताना त्याचे हँडल धरावं किंवा नाही असा प्रश्न अनेकांना पडतो. प्रत्यक्षात ट्रेडमिलवर व्यायाम करताना हँडल धरणं योग्य नाही असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. ट्रेडमिलचं हँडल फक्त तुमच्या सुरक्षेसाठी असतं. हँडल धरल्याने आपण खूप जोरात धावत आहोत, असं तुम्हाला वाटतं. पण याचा परिणाम तुमच्या शरीरातल्या ऊर्जेवर होत असतो. हँडल धरून धावल्यामुळे तुम्हाला दमल्यासारखं वाटतं. हँडल धरल्यामुळे धावणं किंवा चालण्याचे जे लाभ तुम्हाला मिळतात त्याचा काहीच उपयोग होत नाही, असंही तज्ज्ञ सांगतात.



ट्रेडमिलवर व्यायाम करताना हँडल धरल्याचे बरेच दुष्परिणाम आहेत. पहिलं म्हणजे तुम्ही खूप कमी कॅलरी खर्च करत,शरीराचं संतुलन साधू शकत नाही. हँडल धरल्यावर तुमच्या हातांची हालचाल होत नाही. धावताना किंवा चालताना हातांची हालचाल होणं महत्त्वाचं असतं. शरीर पुढच्या बाजूला झुकण्याच्या दृष्टीने हातांची हालचाल महत्त्वाची असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. ट्रेडमिलची गती खूपच जास्त असेल तर हँडल धरल्याने तुम्ही पडू शकता. हँडल धरल्याने होतं काय की तुमच्या पायांवरचा ताण कमी होतो. पण शरीराच्या वरच्या भागावरचा ताण वाढतो. याचा परिणाम शरीराच्या खालच्या भागाच्या कार्यक्षमतेवर होतो. त्यामुळे तुम्ही बाहेर जसे धावता तसंच ट्रेडमिलवर धावायला हवं.

फिटनेस फंडा

# इथे लुटा हायकिंगचा आनंद

उत्तराखंड हे निसर्गाने नटलेलं सुंदर असं राज्य. इथे हिंदू धर्मीयांची महत्त्वाची तीर्थस्थानं आहेत. यासोबतच इथे निसर्गाचा आनंदही लुटता येईल. हायकिंगसाठी उत्तरखंडमधली अनेक ठिकाणं प्रसिद्ध आहेत. अशाच काही ठिकाणांविषयी... ✻ इथल्या चोपता या गावात काही काळ घालवता येईल. गर्दीपासून लांब निसर्गाच्या सानिध्यात थोडा वेळ घालवायचा असेल तर तुम्ही चोपताला जाऊ शकता. इथे हायकिंगची बरीच ठिकाणं आहेत. ✻ कुमाऊँ पर्वतरांगांमध्ये वसलेलं बिनसरही अनोखं आहे. हे स्थान समुद्रसपाटीपासून २४२० मीटरवर आहे. इथे हायकिंग करताना हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरांचं दर्शन करता येईल. ✻ चंपावत येथील बाणासूरच्या किल्ल्याला भेट देता येईल. बाणासुराच्या स्मृतीप्रीत्यर्थ हा किल्ला बांधण्यात आला होता. बाणासूर हा बली या वानर राजाचा मुलगा होता आणि भगवान श्रीकृष्णाने त्याचा वध केला होता, असं म्हटलं जातं. हा किल्ला हायकिंगचं परफेक्ट डेस्टिनेशन आहे. मसूरीला जाणारे पर्यटक जॉर्ज एव्हरेस्ट हाउसपर्यंत हायकिंग करू शकतात. इथल्या गांधी मार्केटपासून या हाउसपर्यंत जायला सहा किलोमीटर अंतर कापावं लागतं. या ठिकाणाहून दून खोऱ्याचं मनोहारी दर्शन घडतं. मग काय, काही काळ निसर्गाच्या सानिध्यात रहायचं असेल तर उत्तराखंडला जायला हरकत नाही.



# पौष्टिक आणि चविष्ट पिझ्झा

मित्रांनो, वेगळ्या चवीचं काहीतरी खायचं असेल तर तुम्ही क्रिस्पी टॉर्टिला पिझ्झा करू शकता. पटकन होणारा आणि पौष्टिक असा हा पिझ्झा तुम्हाला खूप आवडेल.

**साहित्य :** चार टॉर्टिला(शक्यतो गव्हाचे असावे), टॉमेटो प्युरी, मॉजरेला चीज, ऑलिव्ह, एक कांदा, १ जलापॅनो, ४ छोटे टॉमेटो, लाल, पिवळ्या, हिरव्या रंगांच्या भोपळी मिरच्या.

झटपट रेसिपी

**कृती :** चारही टॉर्टिलावर टॉमेटो प्युरी पसरवून घ्या. चीज किसून घ्या. टॉर्टिलावर घाला. कांदा, भोपळी मिरच्या, ऑलिव्ह, जलापॅनो, छोटे टोमॅटो बारीक कापून घ्या. या भाज्या टॉर्टिलावर घाला. आता हे टॉर्टिला ओव्हनमध्ये ठेवा. १८० अंश सेल्सियस तापमानावर १० ते १५ मिनिटं बेक करा. कुरकुरीत टॉर्टिला पिझ्झा तयार आहे. हा चविष्ट पिझ्झा खूप मस्त लागतो.



# गोंधळ दूर होईल



माझं वय २८ वर्षं असून आता लग्न करायचं आहे. आयुष्याच्या या टप्प्यावर मी खूप गोंधळून गेले आहे. मध्यंतरी माझ्या एका मित्राने लग्नाचा प्रस्ताव ठेवला. आम्ही चार वर्षांपासून एकमेकांना ओळखतो. तो खूप चांगला मुलगा आहे. व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी आणि मोकळ्या विचारांचा आहे. त्याच्याशी लग्न करणं हा खरं तर खूप चांगला निर्णय ठरेल. पण आमच्या आवडीनिवडी वेगळ्या आहेत. तसंच त्याचं व्यक्तिमत्त्व फार आकर्षक नाही. अनेकदा त्याच्याशी संवाद साधणंही कठीण होऊन बसतं. त्याच्याबद्दल माझ्या मनात प्रेम नाही. मी काय करू? तो सर्वार्थाने चांगला आहे म्हणून होकार देऊ का त्याच्यावर प्रेम नसल्याने नाही म्हणू. मला मार्गदर्शन करा.

मॅच मेकिंग

**उत्तर :** सर्वात प्रथम तू तुझ्या भावनांचं विश्लेषण कर. तुला जोडीदारामध्ये कोणते गुण हवे आहेत याचा विचार कर. नात्यामध्ये तू कशाला प्राधान्य देणार आहेस, हे ठरव. एकीकडे तो खूप चांगला मुलगा आहे, त्याच्याशी लग्न करणं हा योग्य निर्णय ठरेल असं तू म्हणतेस. पण दुसरीकडे त्याचं व्यक्तिमत्त्व आकर्षक नसल्याचा आक्षेप घेते. व्यक्तिमत्त्व नंतर घडवता येतं. प्रत्येक माणसात काही चांगले तर काही वाईट गुण असतात. त्याच्यातही काही दुर्गुण असतील. तुझ्या बाबतीतही हेच म्हणता येईल. लग्नाचा निर्णय घेण्याआधी समुपदेशकाची मदत घेता येईल.







# आरसीबीने पराभवाचा वचपा काढला

## दिल्लीला घरात हरवलं; मुंबईसह गुजरातलाही मागे ढकललं; कृणाल पांड्याची जबरदस्त बॅटिंग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेत रविवारी (२७ एप्रिल) दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघात ४६ वा सामना झाला. अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात बंगळुरूने ६ विकेट्सने विजय मिळवला. बंगळुरूचा हा १० सामन्यातील ७ वा विजय होता. त्यामुळे यंदाच्या हंगामात ७ विजय मिळवणारा बंगळुरू पहिला संघ ठरला. त्यांचे आता १४ गुण झाले असून ते पॉइंट्स टेबलमध्ये चौथ्या स्थानावरून थेट पहिल्या क्रमांकावर आले आहेत. त्यांनी गुजरात टायटन्स, मुंबई इंडियन्स, दिल्ली कॅपिटल्स या तिन्ही संघांना मागे टाकले आहेत. या तिन्ही संघांचे १२ गुण आहेत.

या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसमोर १६३ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग बंगळुरूने १८.३ षटकात ४ बाद १६५ धावा करत पूर्ण केला. बंगळुरूने हा सामना जिंकून मागच्या पराभवाचा वचपाही काढला. बंगळुरूला १० एप्रिलला त्यांच्या घरच्या मैदानात दिल्लीने पराभूत केले होते.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून जेकॉब बेथल आणि विराट कोहली यांनी डावाची सुरूवात केली. पण तिसऱ्याच षटकात बंगळुरूला दोन मोठे धक्के बसले. अक्षर पटेलने बेथल आणि देवदत्त पडिक्कल यांना या एकाच षटकात बाद केले. बेथलने १२ धावा केल्या, तर पडिल्लल शून्यावर बाद झाला.

इतकंच नाही, तर बंगळुरूची अवस्था आणखी बिकट झाली ती कर्णधार रजट पाटिदार बाद झाल्यानंतर चौथ्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर विराट सोबत धाव पळताना गोंधळ झाल्याने पाटिदार धावबाद झाला. करुण नायरने अफलातून डायरेक्ट थ्रो करत त्याला धावबाद केले. त्याने ६ धावा केल्या. त्यामुळे बंगळुरूची अवस्था ३ बाद २६ धावा अशी झाली होती.

पण तरी एका बाजूला विराट कोहली होता. त्याला नंतर कृणाल पांड्याची साथ मिळाली. आधी दोघांनीही संयमी खेळ केला. दिल्लीचा कर्णधार अक्षर पटेलने कृणालविरुद्ध वेगवान गोलंदाजांना गोलंदाजी देऊन त्याला बाद करवण्याचा प्रयत्न केला. पण कृणालने संयम ठेवला.

पण नंतर खेळपट्टीवर स्थिरावल्यानंतर कृणालने आक्रमण केले. त्याने ३८ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. दुसऱ्या बाजूने विराटही चांगला खेळ करत होता. त्यांच्यात शतकी भागीदारीही झाली. त्यामुळे त्यांच्या भागीदारीने बंगळुरूच्या विजयाचा पाया रचला.

विराटनेही अर्धशतक केले. पण हे अर्धशतक धीम्यागतीने झाले. त्याने ४५ चेंडूत अर्धशतक केले. हे विराटचे सलग तिसरे, तर यंदाच्या हंगामातील सहावे अर्धशतक आहे. पण अर्धशतकानंतर विराटला १८ व्या षटकात बंगळुरूला १८ धावांचीच गरज असताना दुश्मंता चमिराने मिचेल स्टार्कच्या हातून झेलबाद केले.

विराटने ४७ चेंडूत ४ चौकारांसह ५१ धावांची खेळी केली. पण नंतर टीम डेव्हिडने ५ चेंडूंचा सामना करत ३ चौकार आणि १ षटकार मारला आणि बंगळुरूचा विजय निश्चिक केला. त्याने नाबाद १९ धावा केल्या. कृणाल ४७ चेंडूत ५ चौकार आणि ४ षटकारांसह ७३ धावांची खेळी केली.

## बुद्धिबळ स्पर्धेत अ गटात तीन खेळाडू संयुक्तरीत्या आघाडीवर



**पुणे :** महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना(एमसीए) यांच्या वतीने तिसऱ्या महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय ओपन ग्रँड मास्टर बुद्धिबळ स्पर्धेत अ गटात आयुष शर्मा, पँटसुलिया लेवान, सावचेन्को बोरिस या खेळाडूंनी 7 गुणांसह संयुक्तरीत्या आघाडी प्राप्त केली आहे अमनोरा हॉल येथील हॉलमध्ये सुरु असलेल्या या स्पर्धेत नवव्या फेरीत अ गटात पहिल्या पटावर मध्यप्रदेशाच्या आयुष शर्माने अव्वल मानांकित पीएसपीबीच्या अभिजीत गुप्ताचा पराभव करून 7 गुण प्राप्त केले. जॉर्जियाच्या पँट्सुलिया लेव्हन याने गोव्याच्या नितीश बेलूरकरचा तर, रशियाच्या सावचेन्को बोरिस याने पीएसपीबीच्या दीप सेनगुप्ताचा पराभव करून 7 गुणांची कमाई केली. क (रेटिंग 1800च्या खालील)गटात सहाव्या फेरीत पहिल्या पटावर अलौकिक सिन्हाने दगडू गायकवाडचा पराभव करून 6 गुणांसह आघाडी प्राप्त केला. दुसऱ्या पटावरील लढतीत कुशाग्र पालीवालने प्रतीक तांबीचा पराभव करून 5.5गुणांसह दुसरे स्थान मिळवले.

## पुणे जिल्हा संघाचा सलग दुसरा विजय

**पुणे :** वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (डब्ल्युआयएफए) यांच्यावतीने आयोजित 'महाराष्ट्र राज्य आंतर-जिल्हा अजिंक्यपद' फुटबॉल वरिष्ठ गटाच्या मुलांच्या स्पर्धेत पुणे जिल्हा संघाने औरंगाबाद संघाचा १-० असा पराभव करून सलग दुसरा विजय मिळवला.

नागपुर येथे झालेल्या सुरू असलेल्या या आंतर-जिल्हा स्पर्धेत पुणे संघाने सलामीच्या सामन्यामध्ये रायगड संघावर २-१ अशी मात केली होती. या सामन्यामध्ये पुणे संघाने आक्रमक सुरूवात करून औरंगाबाद संघाच्या दबाव फळीवर दबाव निर्माण करण्यास सुरूवात केली. पहिल्या १५ मिनिटांमध्ये पुण्याच्या खेळाडूंनी औरंगाबाद संघाच्या गोलकक्षात धडक मारली. २२ व्या मिनिटाला हर्ष उत्तेकर याने गोल करून पुणे संघाला १-० अशी महत्वपूर्ण आघाडी मिळवून दिली. पुर्वार्धमध्ये पुणे संघाने ही आघाडी कायम ठेवली.

# बाणेर गावचे ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज यांचा उत्सवा निमित्त कुस्ती स्पर्धेचे आयोजन; रोख २४ लाखांची बक्षिसे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी बाणेर गावचे ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज यांचा उत्सव साजरा होणार आहे. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून दि.३० एप्रिल रोजी श्री भैरवनाथ महाराजांची पालखी सोहळा होणार आहे त्याचप्रमाणे रात्री ९ वाजता गौतमी पाटील यांचा सीमा पार्क, धनकुडे फॉर्म हाउस जवळ, सावतामाळी मंदिरा समोर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.

तसेच दि.१ मे रोजी सकाळी ९ वाजता बाणेर येथील कै.सोपानराव बाबुराव कटके विद्यालयातील मैदानावर महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघटनेच्या मान्यतेने व पुणे शहर कुस्तीगीर संघटनेच्या सहकार्याने मॅटवरील बाणेर केसरी कुस्ती स्पर्धा आयोजित केली असून या स्पर्धेचे उद्घाटन समारंभ महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार साहेब यांच्या शुभहस्ते त्याचप्रमाणे स्थायी समितीचे माजी अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे सरकार्यवाह बाबुराव चांदेरे, बाणेरचे प्रथम नगरसेवक ज्ञानेश्वर तपकीर, बाणेर नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक दिलीप मुरकुटे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आलेला आहे .

या स्पर्धे मध्ये खालील प्रमाणे गटवारी केली असून त्यांची बक्षिसे पुढील प्रमाणे देण्यात येणार आहेत. खुला गट , ८६ किलो गट, ७९ किलो गट, ७४ किलो गट, ७० किलो गट, ६६ किलो गट, ६१ किलो गट, ५७ किलो गट, ५२ किलो गट , ४८ किलो गट , ४१ किलो अशाप्रकारे गटवारी असून रोख २४ लाखांची बक्षिसे देण्यात येणार आहेत. कुस्ती मैटवर होणार आहे.

यावेळी महिला कुस्तीचे देखील आयोजन करण्यात आलेले आहे यामध्ये कुमारी ज्ञानेश्वरी पायगुडे विरुद्ध कुमारी संजना दिसले आणि कुमारी सिद्धी ढमढेरे विरुद्ध कुमारी आर्पिता गोळे अशी या महिलांची कुस्तीचे सामने रंगणार आहेत. या स्पर्धेतील बक्षीसास पात्र न ठरणाऱ्या सर्व पराभूत कुस्ती पैलवानांनाही मानधन दिले जाणार आहे.

त्याचप्रमाणे या बाणेर केसरी कुस्ती स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ रात्री ८:३० वाजता मुरलीधर अण्णा मोहोळ (खासदार, केंद्रीय राज्यमंत्री, भारत सरकार), चंद्रकांत दादा पाटील (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, कॅबिनेट मंत्री, महाराष्ट्र राज्य), मेघाताई कुलकर्णी (खासदार - राज्यसभा) यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे.

या पत्रकार परिषदेकरीता स्थायी समितीचे माजी अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे सरकार्यवाह बाबुराव चांदेरे, बाणेर नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिलीप मुरकुटे, गुलाबराव तापकीर, पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्याध्यक्ष दत्तात्रय कळमकर, माणिक गांधीले, माजी सरपंच जंगल रणावरे , अर्जुन शिंदे, रामदास धनकुडे, मल्हारी सायकर, नासिर सय्यद, राजेंद्र कळमकर, जगन्नाथ धनकुडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.या स्पर्धे करीता खेळाडूंचे वजन बुधवार दि.३० एप्रिल रोजी सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत कै. सोपानराव बाबुराव कटके,मनपा शाळा, बाणेर येथे घेण्यात येणार आहे.

## टीम इंडियाची तिरंगी मालिकेत दणक्यात सुरुवात



**नवी दिल्ली :** रविवारपासून श्रीलंकेत भारत, श्रीलंका आणि दक्षिण आफ्रिका या महिला संघांमध्ये वनडे तिरंगी मालिका सुरू झाली आहे. या मालिकेतील पहिल्याच सामन्यात भारतीय महिला संघाने श्रीलंका महिला संघावर दणदणीत विजय मिळवला आहे. आर प्रेमदासा स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात भारताने ९ विकेट्सने विजय मिळवला. हा सामना पावसामुळे प्रत्येकी ३९ षटकांचा करण्यात आला होता. श्रीलंकेने भारतासमोर विजयासाठी १४८ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग भारताने २९.४ षटकात एकच विकेट गमावत सहज पूर्ण केला. प्रतिका रावल सामन्यातील सर्वोत्तम खेळाडू ठरली. श्रीलंकेने दिलेल्या १४९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी भारताकडून सलामीला प्रतिका रावल आणि स्मृती मानधना उतरले होते. या दोघींनीही सुरुवात चांगली करत अर्धशतकी भागीदारी केली. प्रतिका सुरुवातीला संयमी खेळ करत होती, तर स्मृतीने चांगला वेग ठेवला होता. पण १० व्या षटकात इनोका राणाविराने तिच्याच चेंडूवर स्मृतीचा झेल घेत तिला बाद केले. स्मृतीने ४६ चेंडूत ६ चौकारांसह ४३ धावा केल्या. पण या विकेटनंतर प्रतिका रावलने हर्लिन देओलला साथीला घेतले. या दोघींनी नंतर विकेट न जाऊ देता लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करत भारताला मालिकेतील पहिला विजय मिळवून दिला. प्रतिकाने अर्धशतकही साकारले. तिने ६२ चेंडूत ७ चौकारांसह ५० धावांची खेळी केली. तसेच हर्लिन देओलने ७१ चेंडूत ४८ धावांची नाबाद खेळी केली. या खेळीत तिने ४ चौकार मारले. तत्पुर्वी, भारताची कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे प्रथम फलंदाजीसाठी श्रीलंका संघ उतरला. श्रीलंका संघ ३८.१ षटकातच १४७ धावांवर सर्वबाद झाला. श्रीलंकेकडून हसिनी परेराने सर्वाधिक ३० धावा केल्या. तिच्याव्यतिरिक्तकविशा दिलहारीने २५ धावा आणि अनुष्का संजिवनीने २२ धावा केल्या. बाकी कोणाला २० धावांचा टप्पा पार करता आला नाही.

## सिल्व्हर क्रिकेट ॲकॅडमी, योगेश इलेव्हन संघांची विजयी कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एसए स्पोटर्स मॅनेजमेंट तर्फे आयोजित 'एसए अजिंक्यपद करंडक' १४ वर्षाखालील आंतरक्लब टी-२० क्रिकेट २०२५ स्पर्धेत सिल्व्हर क्रिकेट ॲकॅडमी आणि योगेश इलेव्हन या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली.

सिंहगड रोड येथील व्हिजन क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत रोहन चव्हाण याने केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे सिल्व्हर क्रिकेट ॲकॅडमीने कोद्रे फार्म्स ॲकॅडमीचा ८ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा खेळणाऱ्या कोद्रे फार्म्स ॲकॅडमीचा डाव ८० धावांवर मर्यादित राहीला. रोनित चौहान याने नाबाद २५ धावांची खेळी केली. सिल्व्हर संघाच्या रोहन चव्हाण याने ११ धावांमध्ये ३ गडी टिपले. हे आव्हान सिल्व्हर क्रिकेट ॲकॅडमी १४.४ षटकात पूर्ण केले. आरव अंम्बुलगेकर याने नाबाद २७ धावा आणि स्वरा कदम हिने २१ धावा करून संघाला विजय मिळवून दिला.

अर्णव घाटे याने केलेल्या कामगिरीच्या जोरावर योगेश इलेव्हन संघाने व्हिडीआर संघाचा ३६ धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना





योगेश इलेव्हनने १२५ धावांचे लक्ष्य उभे केले. प्रद्युम्न कानिटकर याने ३६ धावा आणि अथर्व वाशिवाले याने २८ धावा करून संघाचा डाव उभा केला. राजवीर निंबाळकर याने २१ धावांमध्ये ४ गडी टिपले. या आव्हानाला सामोरे जाताना व्हिडीआरचा डाव ८९ धावांवर गडगडला. योगेश संघाच्या पियुष माने याने १३ धावांत दोन आणि अर्णव घाटे याने २८ धावांमध्ये २ गडी बाद केले. अर्णव याने क्षेत्ररक्षणामध्येही कमाल करत दोन धावबाद केले.

## स्लो ओव्हर रेटसाठी लखनऊला दुसऱ्यांदा दंड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** लखनऊ सुपर जायंट्सचा कर्णधार ऋषभ पंतला स्लो ओव्हर रेटसाठी २४ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. याव्यतिरिक्त, प्लेइंग इलेव्हनमध्ये समाविष्ट असलेल्या खेळाडूंना, ज्यामध्ये इम्पॅक्ट प्लेअरचा समावेश आहे, त्यांना ६ लाख रुपये किंवा त्यांच्या मॅच फीच्या २५ टक्के रक्कम, जे कमी असेल ते दंड भरावा लागेल.

२७ एप्रिल रोजी मुंबईत मुंबई इंडियन्स आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात झालेल्या सामन्यात निर्धारित वेळेत पूर्ण षटके न टाकल्याबद्दल लखनऊवर हा दंड ठोठावण्यात आला आहे. या हंगामात लखनऊचा षटकांचा वेग दुसऱ्या क्रमांकावर आहे.

आयपीएल-१८ च्या ४६ व्या सामन्यात, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने दिल्ली कॅपिटल्सचा ६ गडी राखून पराभव केला. अरुण जेटली स्टेडियमवर दिल्लीने ८ विकेट गमावून १६२ धावा केल्या. रविवारी, कृणाल पंड्या आणि विराट कोहली यांच्या अर्धशतकांच्या जोरावर बंगळुरूने १९ व्या षटकात ४ गडी गमावून लक्ष्य गाठले. लखनऊने १० सामन्यांत ५ विजय आणि ५ पराभव पत्करले. हा संघ १० गुणांसह सहाव्या स्थानावर आहे. प्लेऑफमध्ये प्रवेश करण्यासाठी एलएसजीला उर्वरित चारही सामने जिंकावे लागतील.

## एसएआरके क्रिकेट संघाचा बाद फेरीत प्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** निकीत मलके स्पोर्टस मॅनेजमेंट आणि पुणे क्रिकेट क्लब यांच्यावतीने 'युथ करंडक' १२ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब (३०-३० षटकांच्या) क्रिकेट स्पर्धेत एसएआरके क्रिकेट ॲकॅडमी संघाने गेम ऑन ॲकॅडमी आणि क्रिकप्लस ॲकॅडमी या संघांचा पराभव करून बाद फेरीत प्रवेश केला.



वाघोली येथील पुणे क्रिकेट ॲकॅडमीच्या मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत जान्हवी गायकवाड हिने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे एसएआरके संघाने गेम ऑन क्रिकेट ॲकॅडमीचा २१ धावांनी पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना एसएआरके ॲकॅडमीने १४२ धावांचे लक्ष्य उभे केले. दर्शसिंग राजपुत (३७ धावा), जान्हवी गायकवाड (२० धावा) आणि प्रथमेश पाटील (१४ धावा) यांनी संघाचा डाव बांधला. या आव्हानाचा पाठलाग करताना गेम ऑन क्रिकेट ॲकॅडमीचा डाव १२१ धावांवर मर्यादित राहीला. शरण्य धुमाळ याने एकहाती लढत देताना नाबाद ५२ धावांची खेळी केली. अन्श तरल याने ३ गडी आणि सृष्टी भुजबळ हिने २ गडी बाद करून संघाचा विजय निश्चित केला.

दुसऱ्या सामन्यामध्ये जान्हवी गायकवाड हिने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे एसएआरके ॲकॅडमीने क्रिकप्लस ॲकॅडमीचा ३ धावांनी निसटता विजय मिळवला. पहिल्यांदा खेळणाऱ्या एसएआरके ॲकॅडमीने ३० षटकामध्ये १३२ धावांचे आव्हान निर्माण केले. जान्हवी गायकवाड हिने ५५ चेंडूत ७ चौकारांसह ४० धावांची खेळी केली. अथर्व समर्थ याने २४ धावांची खेळी केली. या लक्ष्याचा पाठलाग करताना क्रिकप्लस ॲकॅडमीचा डाव १२९ धावांवर मर्यादित राहीला. ओम झाकणे याने ४८ धावांची तर, प्रगल्भराज सिंग याने नाबाद ३२ धावांची खेळी केली. जान्हवी गायकवाड हिने १६ धावांमध्ये २ गडी बाद करून संघाचा विजय निश्चित केला.

### स्वर्गीय धनंजय भिडे सेव्हन-अ-साईड फुटबॉल चषक स्पर्धेत

# चेतक एफसी, रिअल पुणे संघ उपांत्य फेरीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रमणबाग माजी विद्यार्थी फुटबॉल संघ यांच्या वतीने व पीडीएफएच्या मान्यतेखाली होत असलेल्या स्वर्गीय धनंजय भिडे सेव्हन-अ-साईड फुटबॉल चषक स्पर्धेत चेतक एफसी, रिअल पुणे युनायटेड या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

शनिवार पेठ येथील न्यू इंग्लिश स्कुल रमणबाग मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत पहिल्या सामन्यात प्रसन्ना पिंपळे(18मि.), निखिल पडवळ(26मि.) यांनी केलेल्या गोलाच्या जोरावर चेतक एफसी संघाने गनर्स एफसी संघाचा 2-0 असा एकतर्फी पराभव करून उपांत्य फेरी गाठली.



दुसऱ्या सामन्यात रिअल पुणे युनायटेड संघाने रुपाली स्पोर्टस क्लब संघाचा 2-0 असा पराभव करून उपांत्य फेरीत धडक मारली. विजयी संघाकडून सचिन विश्वकर्मा(11मि.), मयंक चतुर्वेदी(25मि.)यांनी प्रत्येकी एक गोल केला.

बाद फेरीच्या लढतीत वीरेंद्र राजपुरोहित(17मि.) याने नोंदवलेल्या एकमेव गोलाच्या जोरावर टायगर्स कंबाईन ब संघाने नाझ फुटबॉल अकादमी संघाचा 1-0 असा सनसनाटी पराभव केला. अन्य लढतीत चेतक एफसी संघाने उत्कर्ष क्रीडा मंच ब कोथरूड एफसी संघावर 4-1 असा एकतर्फी विजय मिळवला. विजयी संघाकडून निखिल पी.4मि., प्रसन्ना पी 14मि., शार्दुल टी.22मि., अभय 28मि.)यांनी प्रत्येकी एक गोल करून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. तर, विवेक पाटील(12मि.) याने केलेल्या गोलाच्या जोरावर साई फुटबॉल अकादमी संघाने टायगर्स कंबाईन अ संघाचा 1-0 असा पराभव करून आगेकूच केली.

#रा